# कामायनी

मूळ हिंदी महाकाव्यः जयशंकर प्रसाद
मराठी रुपांतरः मो. ग. तपस्वी

महाराष्ट्र राज्य, साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

# कामायनी

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
२८५
१
ग्रंथालय

# कामायनी

[ स्व. जयशंकर प्रसाद यांच्या "कामायनी" या
हिंदी महाकाव्याचे मराठी रूपांतर ]

रूपांतरकार

**मो. ग. तपस्वी**

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : ऑगस्ट, १९८५

●

प्रकाशक : श्री. सु. द्वा. देशमुख, सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.

●

© : प्रकाशकाधीन

●

मुद्रक : व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर–४१६ ००३.

●

**किंमत रु. ५५.००**

# निवेदन

स्वर्गीय श्री. जयशंकर प्रसाद हे आधुनिक हिंदी भाषेचे एक महाकवी. त्यांनी लिहिलेले "कामायनी" हा तर त्यांच्या प्रतिभेचा कळसच. साहित्य संस्कृती मंडळाने अन्य भाषा संपर्क समितीत, आंतरभारती योजनेमध्ये या महाकाव्याचा मराठी अनुवाद करून प्रसिद्ध करण्याचे ठरविले. माझे मित्र आणि प्रसिद्ध पत्रकार श्री. मो. ग. तपस्वी यांनी या महाकाव्याचे भाषांतर करून ते आम्हास प्रसिद्ध करावयास दिले. त्यामुळे आमची कल्पना साकार झाली आहे. कामायनीसारखी इतरही अनेक काव्ये व इतर साहित्य कृती हिंदी, बंगाली, गुजराथी, तामीळी, मल्ल्याळी, इत्यादी भाषांतून मराठीत यावयास पाहिजेत आणि त्याचप्रमाणे मराठीची साहित्यसंपदा इतर भाषेत झिरपली पाहिजे.

वास्तविक हे काव्य एक वर्षापूर्वीच प्रसिद्ध व्हावयास हवे होते. पण श्री. तपस्वी एका भयंकर अपघातात सापडले. त्यामुळे हा काव्यग्रंथ प्रसिद्ध होण्यास विलंब झाला. या काव्याच्या प्रसिद्धीकरणास ज्यांनी ज्यांनी सहाय्य केले त्या सर्वांचे साहित्य संस्कृती मंडळ ऋणी आहे.

४२, यशोधन,
मुंबई–४०० ०२०.
दिनांक : १ ऑगस्ट, १९८५.

**सुरेंद्र बारलिंगे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

## रूपांतरकर्त्याचे निवेदन

हिंदी साहित्याची तोंडओळख असणाऱ्या प्रत्येकाला महाकवी स्व. जयशंकर प्रसाद यांचे नाव माहीत आहे ते त्यांच्या 'कामायनी' या महाकाव्यामुळे. त्याच अपूर्व अशा काव्यकृतीचे मन आणि तन जसेच्या तसे मराठी काव्यप्रेमीजनांना सादर करण्याचा हा प्रयत्न. म्हणजे मूळ कवीच्या प्रतिभा–विलासाने आधीच परिधान केलेल्या या महावेशभूषेवरून मराठीमध्ये त्याच मापाने बेतलेली ही नवी वस्त्राभरणे आहेत. नवे वस्त्र मराठी आहे. नवा साजश्रृंगार मराठी आहे. पण मूळ नैसर्गिक सौंदर्य, तेज आणि वलय सर्व स्व. जयशंकर प्रसादांनी धारण केले तसेच आहे.

डी–२ : ७१,<br>
पंडारा मार्ग,<br>
नवी दिल्ली–३<br>
विजयादशमी<br>
१९८२.

**मो. ग. तपस्वी**

# प्रस्तावना

आर्यांच्या वाङमयात आदिपुरुष मनूच्या कथा आणि गाथा वेद, पुराणे आणि इतिहास यामध्ये सर्वत्र विखुरलेल्या आहेत. श्रद्धा आणि मनू यांच्या सहयोगाने मानवतेचा विकास झाला ही एक रूपक कथा आहे असे प्रतिपादन निरुक्तांनी सर्वच इतिहासाबाबत करण्याचा जसा प्रयत्न केला, तसाच गतकाळातही झाला असला, तरी मन्वंतराचा, म्हणजेच मानवतेच्या नवयुगाचा प्रवर्तक या नात्याने मनूची कथा आर्यांच्या अनुश्रुतीत खोलवर रुजलेली आहे ही गोष्ट मात्र निर्विवाद होय. म्हणूनच वैवस्वत मनूला ऐतिहासिक पुरुष मानणेच योग्य होय. महापुरूषांच्या गाथेत आणि इतिहासात खऱ्या खोट्या उपकथा घुसविणे सामान्यतः लोकांना आवडत नाही. परंतु सत्य हे असत्यापेक्षा जास्त विचित्र असते. आदि-युगात मानवाच्या प्रत्येक चमूने ज्ञानोन्मेषाच्या अरुणोदय-काळात भावनांनी ओथंबलेली इतिवृत्ते संग्रहीत केली होती. त्यांना आज गाथा किंवा पौराणिक उपाख्याने संबोधून वेगळे करण्यात येते, कारण त्या चरित्रांची मधूनमधून भावनांशी सांगड घातलेली असते. त्या घटना कित्येकदा अतिरंजितही वाटत असतात. तथ्य शोधून वेचून घेण्यास निघालेल्या तर्कबुद्धीला अशा घटना रूपक होत्या, दृष्टांता-सारख्या होत्या असा आरोप करून मोकळे होण्याची सोय असते. तरीही त्या घटनांमध्ये सत्याचा अंश असलाच पाहिजे एवढे तरी मान्य करावेच लागते. आजच्या मानवाजवळ त्याच्या वर्तमान संस्कृतीचा क्रमिक इतिहासच असतो. परंतु त्याच्या इतिहासाला जेथून सुरुवात होते, त्याच्याही आधी विद्यमान असलेल्या सामाजिक चेतनेच्या पक्क्या आणि गडद रेखांनी त्याच्या कितीतरी आधी होऊन गेलेल्या घटनांचा उल्लेख त्याच्या स्मृतीपटलावर रेखाटलेला असतो. परंतु तो काहीसा अतिरंजित असतो. त्यामुळे त्या घटना आज काहीशा चमत्कारिक वाटतात. कदाचित म्हणूनच आपल्याला आपल्या प्राचीन स्मृतींचा अर्थ निरुक्तांच्या आधारे लावावा लागतो. असा अर्थ लावताना, आपल्या वर्तमान रुचीशी त्याचे काही सामंजस्य साधता यावे असा हेतू आपल्या मनात असतो.

श्रद्धा आणि मनु म्हणजेच मनन यांच्या सहकार्याने मानवतेचा विकास झाला हे रूपक असले तरीही ते अतिशय भावरम्य आणि श्लाघ्य आहे. मानवतेचा मानसशास्त्रीय इतिहास बनण्यास ते समर्थ आहे. आज सत्याचा अर्थ आपण घटना असा करीत असतो. आणि तरीही त्याच्या तिथीक्रमावरच संतुष्ट न होता, मानसशास्त्रीय संशोधनाच्या साह्याने इतिहासातील घटनांमध्येही आणखी काहीतरी आपण पाहू इच्छीत असतो. याच्या मुळाशी नेमके कोणते रहस्य आहे? आत्म्याची अनुभूती! होय, त्याच भावनेचे स्वरूप ग्रहण करण्याचा प्रयत्नच सत्य किंवा घटना बनून प्रत्यक्षात साकारत असते. मग त्या सत्य घटना स्थूल आणि क्षणिक बनून त्यांचे रुपांतर असत्य आणि अभाव यात होऊन जाते. परंतु सूक्ष्म अनुभूति वा भावना, चिरंतन सत्याच्या स्वरूपात सुप्रतिष्ठित असतेच. त्याच्याच माध्यमातून युगायुगातील पुरुषांची आणि पुरुषार्थाची अभिव्यक्ती होत राहते.

जलप्रलय ही भारतीय इतिहासातील अशीच प्राचीन घटना आहे. तिनेच मनूला देवादिकांच्यापेक्षा विलक्षण अशी एक सर्वस्वी भिन्न अशी मानव संस्कृती प्रस्थापित करण्याची संधी दिली. तो इतिहासच आहे. 'मनवे वै प्रातः' वगैरे या घटनेचा उल्लेख शतपथ ब्राह्मणाच्या आठव्या अध्यायात आढळतो. देवगणांचा उच्छृंखल स्वभाव, अनिर्बंध आत्मसंतोष यात अंतिम अध्याय लागला आणि मानवी भावना म्हणजेच श्रद्धा आणि मनन यांचा समन्वय होऊन प्राणीमात्रास नव्या युगाची सूचना मिळाली. मनू या मन्वंतराचे प्रतीक झाले. मनू भारतीय इतिहासाचे आदिपुरुष आहेत. राम, कृष्ण आणि बुद्ध त्यांचेच वंशज होत. शतपथ ब्राह्मणात त्यांना श्रद्धादेव म्हटले आहे–"श्रद्धा देवो वै मनु:" (का. १ प्र–१४–१५). भागवतात याच वैवस्वत मनू आणि श्रद्धा यांच्यापासून मानव सृष्टीचा प्रारंभ झाला असे मानले आहे.

"ततो मनु: श्रद्धादेव: संज्ञायामास भारत
श्रद्धायां जनयामास दश पुत्रान् स आत्मवान्!"
(९–१–११)

छांदोग्य उपनिषदात मनू आणि श्रद्धा यांच्या भावात्मक व्याख्याही दिल्याचे आढळते. "यदा वै श्रद्धाति अथ मनुते नाऽश्रद्धन् मनुते"

ही व्याख्या काहीशी निरुक्तासारखी आहे. ऋग्वेदात श्रद्धा आणि मनू या दोघांची नावे ऋषींसारखी आढळतात. श्रद्धा सूक्तात सायणाने श्रद्धेचा परिचय देताना म्हटले आहे– " कामगोत्रजा श्रद्धा नामर्षिका ". श्रद्धा कामगोत्रातील बाला आहे, म्हणूनच श्रद्धा या नावाबरोबरच तिला कामायनी असेही म्हटले जाते. मनू प्रथम पथप्रदर्शक आणि अग्निहोत्र प्रज्वलित करणारे तसेच इतर कित्येक वैदिक कथांचे नायक आहेत. 'मनुर्हवा अग्रे यज्ञनेजे; यदनुकृत्येमा: प्रजा यजन्ते' (५–१ शतपथ) यांच्याबद्दल वैदिक वाङमयात बऱ्याच गोष्टी विखुरलेल्या आढळतात. परंतु त्यांचा क्रम स्पष्ट नाही. जलप्रलयाचे वर्णन शतपथ ब्राह्मणाच्या प्रथम कांडाच्या आठव्या अध्यायापासून सुरू होते. त्यात त्यांची नाव उत्तरगिरीच्या बर्फाळ प्रदेशात जाऊन पोहोचल्याचा प्रसंग वर्णिला आहे. तेथे पाणी ओसरल्यानंतर मनूदेखिल ज्या ठिकाणी उतरले त्या जागेस मनोरवसर्पण म्हटले आहे—

" अपीपरं वै त्वा, वृक्षे नावं प्रतिबध्नीष्व,
तं तु त्वा मा गिरौ सन्तमुदकमन्तश्छैत्सीद्
यावद् यावदुदकं समवायात-तावत् तावन्ववसर्पासीति
स ह तावत् तावदेवान्ववसर्पं तदप्येतदुत्तरस्य गिरेर्मनोरवसर्पणमिति !"

(अध्याय १ प्रपा–८–६)

श्रद्धा आणि मनू यांचे मिलन झाल्यावर त्याच निर्जन प्रदेशात उजाड झालेल्या सृष्टीचे पुर्ननिर्माण सुरू झाले. परंतु असुर-पुरोहित भेटल्याने त्यांनी पशुबळी दिला. " किलाताकुली-इति हासुर ब्रह्मावासतु:। तौ होचतु:–श्रद्धादेवो वै मनु:– आवं नु वेदावेति। तौ हागत्योचतु:– मनो। बाजयाव त्वेति। "

या यज्ञानंतर मनूच्या मनात पूर्वपरिचित देवप्रवृत्ती जागृत झाली. त्या प्रवृत्तीमुळेच इडेशी संपर्क येताच मनू श्रद्धेखेरीज दुसरीकडे वळले. इडेबाबत शतपथात म्हटले आहे की तिची उत्पत्ती अथवा पोषण त्या पवित्र यज्ञातून झाले. त्या पूर्ण योषितेस पाहून मनूने विचारले की " तू कोण आहेस ? " इडा म्हणाली, "मी तुमची कन्या " मनूने प्रश्न केला– "ती कशी ?" ती म्हणाली, "यज्ञात तुम्हीच हवन केलेल्या दही आणि तुपातून माझे पोषण झालेले आहे." (शतपथ ६ प्र. ३ ब्रा.)

मनूला इडेचे विलक्षण आकर्षण वाटले आणि ते श्रद्धेपासून काहीसे दूर झाले. ऋग्वेदात इडेचा उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो. तिचे वर्णन मनूची पथप्रदर्शिका, मानवावर शासन करणारी असे केले आहे. "इडामकृण्वन्मनुषस्य शासनीम्" १–३१–११ ऋग्वेद. इडेबाबत ऋग्वेदात अनेक मंत्र आढळतात. "सरस्वती साधयन्ती धियं न इडा देवी भारती विश्वतूर्तिः तिस्रो देवीः स्वधया वर्हिरेदमच्छिद्रं पान्तु शरणं निषद्य' (ऋग्वेद २–३–८) "आ नो यज्ञं भारती तुयमेत्विडा मनुष्वदिह चेतयन्ति। तिस्रो देवीर्बर्हिरेदं स्योनं सरस्वती स्वपसः सदन्तु", (ऋग्वेद १०–११०–८) या मंत्रात मध्यमा, वैखरी आणि पश्यन्ती यांची प्रतिनिधी असलेल्या भारती सरस्वतीबरोबरच इडेचेही नाव आलेले आहे. लौकिक संस्कृतात इडा शब्द पृथ्वी म्हणजेच बुद्धी, वाणी इत्यादींचा पर्यायवाचक आहे. "गो भू वाचस्त्विडा इलाः" (अमरकोश). या इडेशी किंवा वाणीशी मनु किंवा मनाचा विवाद झाला याचाही आणखी एक उल्लेख शतपथात आढळतो. या विवादात दोघेही आपले महत्त्व सिद्ध करण्यासाठी भांडतात "अथातोमनसश्च" वगैरे (४ अध्याय, ५ ब्राह्मण). ऋग्वेदात इडेचे वर्णन धी, बुद्धीचे साधन करणारी मनुष्यास चेतना देणारी असे केले आहे. गतकाळात बहुधा इडा ही पृथ्वी वगैरेशी निगडीत केली गेली असावी, परंतु ऋग्वेद ५–५–८ मध्ये इडा आणि सरस्वती यांच्याबरोबरच महीचा स्वतंत्र आणि सुस्पष्ट उल्लेख आढळतो– 'इडा सरस्वती मही तिस्रो देवीर्मयोभुवः'. यावरून मही आणि इडा या भिन्न आहेत. मेधसवाहिनी नाडिसही इडा म्हणतात.

यावरून बुद्धीचा विकास, राज्य–स्थापना वगैरे मनूने इडेच्या प्रभावानेच केले असे अनुमान करता येते. पुढे तर इडेवरही आपला अधिकार स्थापन करण्याचा प्रयत्न केल्यामुळे मनूवर देवगणांचा कोप ओढवला. 'तद्वै देवानां आग आस' (७–४ शतपथ). या अपराधाची शिक्षाही मनूला भोगावी लागली. 'तं रुद्रोऽभ्यावत्य विव्याध' (७–४ शतपथ). इडा देवांची बहिण होती. मनुष्याला चैतन्य देणारी होती. म्हणूनच यज्ञात इडाकर्म करण्यात येते. या इडेचा बुद्धिवाद श्रद्धा आणि मनू यांच्यात दुरावा निर्माण करण्यास कारणीभूत होतो. सहाजिकच बुद्धीवादाच्या विकासात, माणूस अधिक सुखाच्या मागे लागला की त्याच्या वाटचाला दुःख यायचेच. हे आख्यान इतके प्राचीन आहे की इतिहासात

रूपकाचे अदभुत मिश्रण झाले आहे. म्हणूनच मनू, श्रद्धा आणि इडा ही इतिहासातील पात्रे असूनही सांकेतिक अर्थही व्यक्त करत असतील तर माझी त्याला कोणतीही हरकत नाही. मनु म्हणजे मनाच्या हृदय आणि मस्तिष्क या दोन्ही बाजू. त्यांचा संबंधही श्रद्धा आणि इडा यांच्याशीही अगदी सरळ लावता येतो. "श्रद्धां हृदय्य याकूत्या श्रद्धया बिन्दते वसु !" ( ऋग्वेद १०–१५१–४ ). या सर्व पैलूंच्या आधारे 'कामायनी' चे कथानक रचण्यात आले आहे. आता एक गोष्ट खरी की 'कामायनी' च्या कथानकाचा गोफ विणताना क्वचित प्रसंगी थोडी फार काल्पनिकताही वापरण्याचा अधिकार मी सोडू शकलेलो नाही.

**– जयशंकर प्रसाद**

# अनुक्रमणिका


| सर्ग | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| चिंता | .. | .. | ९ |
| आशा | .. | .. | १३ |
| श्रद्धा | .. | .. | २५ |
| काम | .. | .. | ३५ |
| वासना | .. | .. | ४९ |
| लज्जा | .. | .. | ५४ |
| कर्म | .. | .. | ६१ |
| ईर्ष्या | .. | .. | ८० |
| इडा | .. | .. | ९१ |
| स्वप्न | .. | .. | १०२ |
| संघर्ष | .. | .. | १११ |
| निर्वेद | .. | .. | १२० |
| दर्शन | .. | .. | १३८ |
| रहस्य | .. | .. | १५३ |
| आनंद | .. | .. | २६५ |

# चिंता

हिमगिरिच्या उत्तुंग शिखेवर
बसुन शीतल शिळा-छायीं,
पाहत होता भिजल्या नयनीं
एक पुरुष प्रलय प्रवाहीं !

खालीं पाणी, वर होते हिम,
एक प्रवाही, एक सघन,
दोहोंमधले तत्त्व एकची
म्हणा तया जड वा चेतन.

दूरवरी पसरले शुभ्र हिम
स्तब्ध तयाच्या हृदयासम
निरव शिळेवर फोडुन माथा
परतुन जाई विफल पवन.

तरुण तपस्व्यासम तो करितो
साधना जणू देव–स्मशानीं,
प्रलय–सिंधु लहरींचे खाली
सुरू अवसान दिनवाणी.

त्या तपस्व्यासमान उन्नत
देवदार दो चार उभे,
हिमवृष्टीने काकडून जणु
सर्द धवल पाषाण उभे.

बळकट स्नायू, कणखर बांधा,
वीर्य, ओज, बल, तेज फार,
दृढ धमन्यातुन निकोप शोणित
मुक्तपणाने करी विहार.

कातर चिंता वदनावरती
जयात पौरुष ओतप्रोत,
आंत उपेक्षित तारुण्याचा
वाहत होता मधुर स्रोत.

महावटा बांधली नाव जी
अतां शुष्क वाळूत उभी,
उतरत होता प्रलय–पूर तो
येत चालली वरी मही.

प्रगटत होती मर्म–वेदना
करुण विकल जणु कर्मकथा,
एक निसर्गच ऐकत होता
सस्मित परिचित हृदय–व्यथा

" हे चिंतेच्या पहिल्या रेषे !
व्याली विश्व–वनाची तूं,
भीषण ज्वालामुखि–स्फोटाचा
प्रथम भयानक प्रकंप तूं !

अभावाचिया चपल बालिके,
ललाटिची तूं खल–लेखा,
धावपळच तूं कोमल हिरवी
जलमायेची चल रेखा !

खळबळ तूं या ग्रह–कक्षेची
तरल विषाची लहर लघू,
जरा अमर आयुष्याची, तुज
बहिरे ! कांहि न ये ऐकूं !

हे व्याधीच्या सूत्रधारिणी !
तूंच आधि, तूं मधुमय शाप !
हृदय–नभीचा धूमकेतु तूं,
पुण्य सृष्टितिल सुंदर पाप.

या निश्चित मानवाकरवीं
मनन करविशिल सांग किती ?
अमर कां कधी भरावयाचा ?
खणशी पाया खोल किती ?

गारांचा घन जेवि पिकांवर
तूं हृदयीं दाटशी तशी !
लपून बसशी खोल अंतरी
गुप्त धनाची ठेव जशी.

बुद्धि, आस, मति, मनिषा, चिंता,
नावें हीं किति तरी तुझीं !
पापच तूं, कर काळे येथुन
इथे नसे लव गरज तुझी !

ये विस्मरणा, झाक विषादा
नीरवते ! बस गप्प अतां,
जा नीघ चेतने, जडतेने
शून्य मना मम भर आता ! "

" जितुकी करितो चिंता मी त्या
सौख्याची गतकाळाच्या,
अनंतात साकारत येती
तितुक्या रेघा दुःखाच्या.

हे सृष्टीच्या अग्रदूता ! ही
हार तुझी, हा लोप तुझा,
भक्षक वा रक्षक म्हण कांहीं
केवळ मीनच उरे तुझा.

वावटळींनो ! हे दामिनिच्या
दिवा—यामिनी तव नर्तन,
त्याच वासनेची उपासना
बघ हें तव प्रत्यावर्तन.

तूं तमसावृत मणि--दीपांचें
घोर निराशापूर्ण भविष्य !
सुर-दंभाच्या महान यज्ञीं
सर्वस्वच जाहलें हविष्य !

अमरत्वाच्या लकाकणाऱ्या
पुतळ्या ! सारे तव जयनाद,
कंपित होती आज प्रतिध्वनि
होउनिया जणु दीन विषाद.

निसर्ग हा दुर्दम्य, विसरलों
अम्ही पराजित घमेंडीत,
विलासितेच्या सरितेमाजीं
विहरत होतों खुळे यथेष्ट.

ते सर्व बुडाले ; बुडलें त्यांचें
वैभव, झाला हाहाःकार,
देव-सुखांवर गरजत होता
दुःख-जलधिचा नाद अपार! "

" गेला कोठे सुखविलास तो ?
स्वप्नच तें ? वा आत्मवंचना ?
देवांची सुख-रजनी होती
ओढित ताऱ्यांच्या वसना.

धुंद सुगंधी वस्त्रांमधुनी
निथळत होते मधुमय श्वास,
अणुरेणूतुन बहरत होता
देव जातिचा सुख-विश्वास.

सौख्यें, केवळ सौख्यें होतीं
इतुकी केंद्रीभूत तिथें,
शीत पथीं नव दंव विंदूचें
सघन मिळन जेवीं होतें.

सकल तंत्र स्वायत्त जगाचें
तिथें विभव, बल, हर्ष अपार,
झुळझुळत्या लहरींसम होता
समृद्धीचा सुख-संचार.

कीर्ति-दीप्ति-शोभेचा होता
रविकिरणांसम नाचत मोर,
सप्तसिंधुच्या तरल कणांतुन
द्रुमपर्णातुन हर्ष-विभोर.

अतुल शक्ति सामर्थ्य असें कीं
निसर्ग चरणीं विनत श्रांत,
चळचळ कांपत होती धरणी
रोजच होउन पदाक्रांत.

आम्ही होतों देव, कां न मग
विश्रृंखल व्हावी सृष्टी ?
म्हणुनच झाली अशी अचानक
घोर आपदांची वृष्टी !

गेले सर्वच ! गेला मधुमय
सुरबालांचा सुख-श्रृंगार,
उषा ज्योत्स्नेसम यौवन-स्मित
मधुपासम निश्चित बिहार.

मदमत्त वासना-सरितेचा तो
कैसा अति उन्मत्त प्रवाह,
प्रलय सागरीं संगम ज्याचा
पाहुन उठला हृदयीं दाह !"

" चिर किशोर अन् नित्य विलासी,
सुरभित ज्यानें दिगदिगंत,
आज जाहला लुप्त कुठे तो
रसाळ, मधुर, अनंत वसंत ?

कुसुमित कुंजामधलें आतां
सरलें पुलकित प्रेमालिंगन,
मौन जाहल्या मूर्च्छित ताना
आतां कुठलें वीणा–वादन !

पडे न आतां कपोलांवरी
छाया सुरभित श्वासांची,
अतां न होई स्कंधाखाली
सळसळ ढळल्या पदरांची.

रुणझुणती पैंजणे कंकणे
वक्षावरती रुळती हार,
कलरव होता मुखर, गायनीं
लय स्वरांचा हो अभिसार.

आसमंत चिर धुंद सुगंधी
प्रकाशास आकाश अधीर,
एक अचेतन गति सकलांची
सदैव खाई हार समीर !

प्रत्ययकारी मदन–व्यथेचें
तनविक्षेपांचे नर्तन,
मधुपांच्या मधुचंद्रासम तें
मदिर वृत्तिचें आवर्तन.

सुरा–सुरभिमय अरुण वदन तें
आळसल्या नयनीं अनुराग,
श्रांत कपोलांवर ओसंडे
कल्पतरूचा पीत पराग.

विकल वासनेचे प्रतिनिधी
गेले सगळे कोमेजून,
आपुल्याच ज्वाळेत जाळले
नंतर गेले जळीं विरून ! "

“ अगे उपेक्षामयी अमरते !
        चिरविलासिनी तृषार्तते !
द्विधारहित अनिमिष नयनांच्या
        दर्शनवंशी बुभुक्षिते !

सरली आलिंगनें तुझी ग
        पुलकित स्पर्शहि नुरे अतां,
कातरता मधु–चुंबनातली
        कष्टवी न हें वदन अतां !

रत्न–गवाक्षातून येतसे
        जेथे मधुर मदिर समीर,
असेल आतां तेथे धडकत
        जल–जीवांची धाड अधीर.

देव–कामिनीच्या नयनातुन
        जिथे उमललें नीलकमळ,
आतां तेथे करितें नर्तन
        पिसाट प्रळयंकारी जळ.

प्रफुल्ल पुष्पांच्या गंधाने
        दरवळणाऱ्या मणि–माला,
झाल्या आज श्रृंखला, ज्यांनी
        बद्ध विलासी सुरबाला.

सुर–यजनाच्या पशुयज्ञाची
        ती पूर्णाहुतिची ज्वाला,
जळात जन्मुन जळे कशी ही
        भीषण लाटांची माला !

रडले कां कुणि बघुन तयांना
        आकाशी हें असे अधीर !
कीं लागावें वरून कोसळूं
        व्याकुळ प्रळय–हलाहल–नीर !

हाहाःकार ! माजले क्रंदन
कठिण कुलिशही होती चूर,
दिगंत झाले बधीर, होता
गर्जंत भीषण निनाद क्रूर !

दिशा पेटुनी डोंब उसळला
वा क्षितिजाचे मेघ उधळले !
सघन अंबरीं प्रचंड कंपन
झंझावातीं विश्व लोपलें !

सूर्यहि झाला मलिन, तमीं त्या
अंधुक आभा होई लीन,
वरुण कोपला, क्षणाक्षणाला
दाटत गेली तिमिर–वीण.

पंचभुतांचें भैरव मिश्रण
कोसळतीं तडिता–शकलें,
जणूं हरवल्या प्रभात काळा
शोधिति उल्का अमर बळें.

पुन्हा पुन्हा त्या भीषण नादें
बघुन धरेचें कंपित तन,
अनंत आलिंगन देण्यासी
जणूं उतरले नील गगन.

नाचत गर्जत सागर लहरी
जाळे जणु कलिकाळाचें.
ओकित फेसा उसळत येती
झुंड जणूं विष–व्यालांचे.

खचे धरा, धगधगते ज्वाला,
ज्वालामुखि टाकी निःश्वास,
क्रमाक्रमाने चालू होता
तिच्या अवयवांचा ऱ्हास.

क्रुद्ध जलधिच्या आघातांनी
महाकच्छपासम धरणी,
विचलित, कंपित, क्षणाक्षणाला
होती विकलोद्विग्न मनीं.

विलास–वेगें पुढे चालला
तो अति भीषण जलसंघात,
तरल तमाशी प्रलय–वायुचे
चालू आलिंगन, प्रतिघात.

घटका येई निकट क्षणोक्षण
क्षितिज जाहलें कुंद क्षीण,
बुडवुन सारी धरणी, झाला
जलनिधि मर्यादाविहीन.

तुडवित होते अणुरेणूला
सड–सड गारांचे क्रंदन,
केव्हांपासुन चालू होते
पंचभुतांचें हें नर्तन ! "

" एकच होता पडाव, त्यासही
शीड अथवा वल्हें नव्हतें,
हिंदकळे लाटांवर वेडा
कोण तयां वाली होते !

घडी घडी लाटांच्या थपडा
दडी मारुनी बसे थडी,
कातर हृदयीं भरे निराशा
साथीला नियतीच खडी.

उठती लाटा नभा शिवाया
असंख्य तडिता कडाडती,
गरल घनांच्या झडीत संतत
तुषार निज सृष्टी रचती.

त्या जलमय जगतात दामिनी
स्वयेंच होत्या चकित होत,
जणु विराट वडवानल ज्वाला
क्रंदत होत्या खंडित होत.

उदधीचे तळवासी जलचर
तडफडुनी येती वरती,
गृह डगमगतां मिळे कां कुणा !
कुठे ! कधी ! लव निश्चिती ?

वातावरणी पवन गोठले
श्वासांची गति झाली रुद्ध,
आणि चेतना करुण विव्हळली
विफल जाहली नजर क्रुद्ध

ग्रह, तारे, त्या महामंथनीं
भमती बुडबुड्यासमान,
लुकलुकती त्या प्रलय–पावसीं
काजवेच जणु सान सान.

कुणी वदावें किती लोटले
प्रहर, दिवस, वा मास किती,
या गणनेच्या उपकरणांचीं
चिन्हेंही उरलीं नव्हतीं !

काळे शासनचक्र मृत्युचें
कुठवर फिरलें नसे स्मरण,
गुरु मत्स्याचा एक तडाखा
बसुन पडावा येइ मरण.

तयानेंच परि इथें फेंकिलें
या उत्तरगिरिच्या आश्रयास,
सुरसृष्टीचा ध्वंस अचानक
पुन्हा लागला घेऊं श्वास.

आज इथें मी अमरत्वाचा
जिवंत भीषण जर्जर दंभ,
सर्गाच्या पहिल्या अंकाचा
खल पात्रांचा जणु विष्कंभ !"

"मरु जीवनिच्या मृगतृष्णे !
भीतीच्या अलस विषादा !
हे अगतिक प्राचीन अमृता !
हे मोहयुक्त अवसादा !

मौन ! नाश ! विध्वंस ! निबिड तम !
शून्य होत जो प्रगट अभाव,
एक सत्य तो, अगे अमरते !
अतां तिथे तुज कुठे ठाव ?

मृत्यो ! हे चिरनिद्रे ! ही तव
जंघा शीतल बर्फाळी,
अनंतात तूं लहर बनविसी
कालसागरीं हिंदोळीं.

महानर्तनातील विषम सम
सकल स्पंदनाचें तू माप,
तुझी विभूती बनते सृष्टी
सदैव होउनिया अभिशाप !

अंधाराचा अट्टहास तूं
मुखरित सतत चिरंतन सत्य,
सुप्त सृष्टिच्या रोमरोमिं तूं
सुंदरतम हें गूढ नित्य.

जीवन आहे क्षुद्र अंश
व्यक्त निळया घनमालात,
सौदामिनिच्या सुंदर स्पर्शे
क्षणभर राहि प्रकाशात."

प्राशित होता पवन शद्व हे
        निर्जनतेचा कोंदे श्वास,
तीन प्रतिध्वनि बनुन घुमे तो
        हिमखंडांच्या आसपास.

घूं घूं करीत चालू होतें
        अनस्तित्वाचें तांडव नृत्य,
आकर्षणविहिन विद्युत्कण
        बनले भारवाही भृत्य.

मृत्यूसम शीतल निराशची
        दृश्य दिसतसे दृष्टीला,
परम नभातुन भौतिक अणुसम
        धुकें झाकते सृष्टीला.

बाष्प होउनी उडुन चालला
        आता भीषण जलसंघात,
सौरमंडलीं नव आवर्तन
        प्रलय निशेची येइ प्रभात ! !

● ● ●

# आशा

स्वर्ण शरांची करीत वर्षा
जयलक्ष्मी उषा पातली,
काळरात होऊन पराजित
जळिं अंतर्धान पावली.

निस्तेज सृष्टिच्या त्रस्त मुखीं
पुन्हा उमललें हास्यकमळ,
वर्षा सरली, शरद पातला
पसरे मंद सुखद परिमळ.

नव कोमल आलोक विखुरला
हिमलोकीं भरुनी अनुराग,
जणूं खेळतो श्वेत सरोजीं
तांबुस पिवळा मधुर पराग.

धरणीवरले हिम–आच्छादन
हळूं हळूं विरुं लागले,
वनस्पतींना येइ चेतना
मुख प्रक्षाळिति शीत जलें.

नेत्र किलकिले करीत सृष्टी
पुन्हा प्रबुद्ध होउ लागली,
आळस देउन लहर सागरीं
पुन्हा पुन्हा झोपुं लागली.

सागर–शेजेवर धरा वधू
बसे सावरुन अतां जरा,
प्रलय–रात्रीच्या आठवणीनें
रुसते फुगते मधुन जरा.

मनू पाहती तो अतिरंजित
बिजन जनाचा नव एकांत,
कोलाहलची जणू झोपला
हिम शीतल जडतेसम श्रांत.

इंद्रनिलाचा महाचषक तो
सोमरहित उलटा लटके,
पवन घेतसे श्वास रेशमी
सकल निमाले जणु खटके.

' विराट ' होता हेम कालवित
आज भराया नवा रंग,
कोण ? अचानक प्रश्न उठे हा
उत्कण्ठा होइ दंग दंग.

" विश्वविभो ! सविता वा पूषा,
सोम, मरुत, चंचल पवमान,
वरुण, आदि फिरतात कुणाच्या
नियंत्रणीं हे चिर अम्लान ?

भ्रूभंग कुणाचा प्रलयासम
ज्यात सकल हे होत विकल,
अरे सृष्टिची बलचिन्हें हीं
तरीहि ठरलीं किति निर्बल !

विकल होउनि कांपत होता
सकल भूत चेतन समुदाय,
किती दुर्दशा झाली त्यांची
होते सर्व विवश, निरुपाय.

देव न होतों, हेही नसती,
परिवर्तनाचे सर्व धनी,
गर्व--रथाचा तुरंग बनुनी
खुशाल उधळो किती कुणी.

महानील या परमाकाशीं
होवोनिया ज्योतिर्मान,
ग्रह, नक्षत्रें, हे विद्युत्कण
कुणावर धरती संधान !

क्षणात लपती, पुन्हा प्रगटती
कोणाचें हें आकर्षण,
तृण–रोपें ही हिरवीं होतीं
केलें कोणी रस–सिंचन ?

लववुन माथा सर्व मानिती
सत्ता कोणाची येथें,
मूक प्रवचनें करितीं ज्याचीं
ते अस्तित्व असे कोठें ?

चिर रमणीया ! असशि कोण तूं ?
येइल कसे मज सांगता !
असशी कैसा ? कोठे ? –याचा
विचारही थकवी चित्ता.

विराट पुरुषा ! विश्वविभो ! तव
अस्तित्वाचें होइ भान—
मंद धीर गंभीर स्वराने
हेंच गातसे सागर गान. "—

" झिरझिरीत मधुस्वप्नांसम ही
सदय हृदयीं अधिक अधीर,
व्यक्त होत कां व्याकुळ आशा
आज बनोनी प्राण–समीर !

पहा किती स्पृहणीय जाहली
मधुर जागृती मूर्तिमान,
स्मित–लहरींसम उंच उठोनी
जणूं नाचते मधुमय तान.

जीवन ! जीवन ! हांक उठतसे
खेळ खेळतो शीतल दाह,
चरणीं होतो नम्र कुणाच्या
नवप्रभातिचा शुभ उत्साह ?

'अहं अस्मि ', हें वरदानासम
कां चाले गुंजन कानीं !
मीहि लागल्यें म्हणूं—'मी असो '
शाश्वत व्योमाच्या गानीं.

देते हा संकेत कुणाची
सत्ता सरल विकासमयी,
जीवनतृष्णा आज कां बरें
इतुकी प्रखर विलासमयी ?

जगूं काय मी ? जगोनी परी
फेडावे कुणाचे पांग ?
अमर वेदना घेउन, देवा !
मरण कधी येइल ? सांग !"

"पवन सरकवी एक यवनिका
मायेचा पट फिटे जणू
निरावरण जाहली प्रकृति
हिरवी, होती तशीच जणू.

भाताचीं सोनेरी रोपें
दूर दूरवरी पसरलीं,
शरद–इंदिरा भवनाची
जणूं वाटते वाट भली.

विश्वकल्पनेसम सुभव्य तो
सुखशीतल संतोष निधान,
बुद्‌ध्याशा अचलेचे ठरतो
अवलंबन मणि–रत्न–निधान.

हिमगिरिचें घनदाट सुशोभित
लताविभूषित शुद्ध शरीर,
झोपेंतच सुखस्वप्न पाहुनी
पुलकित झाले जणु अधीर.

चरणांवरती ज्याच्या उसळे
निरवतेची विमल विभूति,
गार झऱ्यांची झुळझुळ होती
विखुरत जीवन अनुभूती.

अमर्याद त्या निळ्या अंचली
हळूच हंसले पहा कुणी,
जणू हिमालय स्वयेंच हंसला
हास्य विखुरले गिरीं वनीं.

शिळांमधोनी शीळ घालुनी
होता पवन करित गुंजन,
त्या दुर्भेद्य अचल दृढतेचा
प्रचार करितो जणु चारण.

संध्येच्या मेघांचें सुंदर
पांघरुनी रंगीत चीट,
गगनस्पर्शी पर्वतश्रेणी
धारण करिती हिम–किरीट.

विश्व–मौन, सन्मान, महत्ता
यांची पसरे तिथे प्रभा,
अनंताचिया प्रागंणात या
जणू भरतसे मूक सभा.

ती अनंत नीलिमा नभाची
होती जी जड, स्तब्ध, शांत,
दूर दूर, अति उंच उंच जी
निज अभावीं होती भ्रांत.

तिला दाविते या जगताचें
सुख, हास्य, उल्हास अजाण,
जगताची जणु प्रचंड उर्मी
हिमगिरीचें तें सुघट उठाण.

बसुन प्रज्वलित वन्हीजवळी
करितो चिंतन मनन तिथें,
मूर्तिमंत जणु एक तपस्या
पानगळीं तेथें वसते.

तरीहि होती धडधड हृदयीं
चिंता उठे कधी नवीन,
जाऊं लागे असेच त्यांचे
जीवन अस्थिर रोज दीन.

उमटत होते प्रश्न नित्य नव
अंधःकाराच्या मायेत,
रंग बदलती जे क्षणोक्षणीं
त्या विराटाच्या छायेत.

अर्ध प्रस्फुटित मिळति उत्तरें
सकर्मक सकल सृष्टि असे,
निज अस्तित्व टिकविण्यासाठी
जीवन होतें पूर्ण मग्नसें.

तपीं मग्न मनु नव नेमानें
कर्मे अपुलीं करूं लागले,
विश्व—रंगी कर्मपटाचे
ताने घन होउं लागले.

अनंताचिया कुशीसारखी
होती गुहा तिथे रमणीय,
तीत मनूंनी स्थान बनविले
सुंदर, स्वच्छ आणि वरणीय.

पहिला संचित अग्नि पेटला
निकट क्षीण रवि किरणांनीं,
शक्ति जागृतीच्या चिन्हांसम
पुन्हा उफाळे ज्वाळांनीं.

जळू लागले पुन्हा निरंतर
अग्नीहोत्र तिथें त्यांचे,
तपाचरणीं पुन्हा एकदा
समर्पीत जीवन मनुचें.

जागी झाली देव-संस्कृती
सुर-यजनांची नव माया,
पुन्हा लागली धरूं तयांवर
कर्ममयी शीतल छाया.

उठले मनू, जेवी उगावा
क्षितिजावरती उषाकांत,
पाहुं लागले लुब्ध दृष्टिनें
सृष्टीची माया रम्य शांत.

शुचि यज्ञाचा करुनी निश्चय
समिधा करिती मनु गोळा,
धूमाचा पट विणूं लागल्या
तिकडे अग्नीच्या ज्वाळा.

वृक्षांच्या सुकलेल्या फांद्या
करिती अग्निशिखा समिद्ध,
आहुतिच्या नव धूम-सुगंधें
नभ कानन झालें समृद्ध.

विचार आला मनात मनुच्या
आहे मी वाचलों जसा,
असेलहि कुणी आणिक कोठे
क्रमीत जीवन-पंथ असा.

अग्नीहोत्रीं अन्न उरे जें
कुठे तरी ठेवुन येती,
यानें होइल तृप्त अपरिचित
असें मानुनी सुखावती.

शिकुन धडा दारुण दुःखाचा
सहानुभूती कळे अतां,
आजवरी प्रिय होती त्यांना
एकांतातिल नीरवता.

नियतीच्या त्या निरव शासनीं
विवश चाललें हें साचें,
जेवी होते प्रशांत स्पंदन
सागर तीरीं लाटांचें.

विजन जगाच्या तंद्रीमध्ये
होतें चालू स्वप्न सुनें,
ग्रहकक्षांच्या परिघावरुनी
काळ आपुला पट ताणे.

प्रहर, दिवस, रजनी, हे येती
निघून जाती शब्दहीन,
विराग भरल्या सृष्टित जेवी
विफल ठरे आरंभ नवीन.

धवल मनोहर शशिबिंबांकित
सुंदर पिठूर त्या रात्रीं,
पुलकित पावन सोमऋचांचें
शीतल पवन पठण करिती.

दूर दूरवर विशाल सागर
खाली व्याकुळला अधीर,
नभात वरती व्यग्र तसाची
होता निशापती गंभीर.

त्या सुरम्य दृश्यात उघडले
अलस चेतनेनें डोळे,
उमललीं अचानक हृदयांचीं
मधु भरलेलीं कमलदळें.

अतींद्रीयशा स्वप्नलोकिंचें
रहस्य अधिक जटिल करून,
व्यक्त निळया नभिं चल तेजाचें
कंपन गाजे सुख बनून.

नवजागृत अनादि वासना
मधुर प्राकृतिक क्षुधेसमान,
चिरपरिचितसें चाहत होते
द्वंद्व, सुखद करूनी अनुमान.

दिवस रात्र वा रवि वरुणाच्या
बालेचा अक्षय श्रृंगार,
हंसूं लागले मीलन त्यांचें
जीवन–सिंधूच्या त्या पार.

तपस्संयमाचें संचित बल
तृषार्त व्याकुळ होतें आज,
अट्टहास करी अधीर तम तो
रितेपणाचें सुनें राज्य.

संथ–पवन स्पर्शानें पुलकित
विकल होतसे श्रांत शरीर,
आशेच्या अलकातुन येते
मधुगंधाची लहर अधीर.

होते झाले विकल मनीं मनु
संवेदनेमुळे आहत,
जी देई जगताला जीवन
आणि करी कटुतेचा अंत.

"अहा ! कल्पनेचे सुंदर हें
विश्व भासतें मधुर किती,
स्वप्नवाटिका पुलकित होउन
जागे, झोपे, सुखें किती.

संवेदना आणि अन्तर्मन
संघर्ष ना कधी यांचा,
कमतरतांचा, असफलतांचा,
हवा कशाला परवचा ?

अजून कुठवर एकटाच मी ?
सांग जीवना ! बोल जरा,
कुणा ऐकवूं कथा ? वदुं नको
मूठ झाकली ठेव जरा !

तिमिराच्या सुंदर भेदा तूं
कांति किरण रंजित तारा !
व्यथित जगाच्या सात्विक बिंदो !
तूं भरशी नव रस सारा !

तप्त जीवना सुखदात्या
प्रशांत छायेच्या देशा !
अनंताचिया मापा ! देशी
किती मधुरतम संदेशा.

अगे शून्यते ! मौन–साधनीं
कां असशी एवढी चतुर;
इंद्रजाल–जननी ! रजनी ! तूं
इतकी कां झालीस मधुर ?

कामना पातली सिंधु–तटीं
घेउन सायंतारा–दीप,
स्वर्ण वस्त्र फाडून तिचे तूं
हंसशी कां ग अशी प्रतीप ?

तिमिर—काजळीं अश्रु कालवुन
अनंत काळचा सत्तेचा—
इतिहास लिहित ती बसे जई
करिशि यत्न मृदु हास्याचा.

विश्वसुमाच्या नाजुक भ्रमरी
रजनी, तूं कोठुन येशी ?
येशी, चुंबुन लगेच जाशी
कोठे हा टोणा शिकसी ?

कुठल्या दिगंत रेषेमध्ये
हुंदक्यांसम भरुनी श्वास,
समीराच्या धापा टाकित
निघून जाशी कुठे खास ?

कां चढविशि हास्याचे मजले ?
नकोस इतकी हंसू व्यर्थ,
दंवबिंदू येतिल फेसाळुन
माजेल पुन्हा अति अनर्थ.

कुणा पाहुनी काढुन बुरखा
स्मित उधळित येशी थबकत ?
निर्जन गगनी कुण्या चुकीसम
जाशी तूं कुणा आठवत ?

रजत फुलांच्या परागसदृश
नको शिपूं असें चांदणे,
या ज्योत्स्नेला पुरते ठावें
तुलाच तव भुरळ पाडणे.

वेडे, हं घे सावरुनी बघ
ढळला आहे तुझा पदर,
पहा विखुरले माणिक मोती
बेभान चंचले ! सावर.

विदीर्ण होते नील वसन कां
तुझें, यौवन मस्तानी !
पहा अकिंचन दुनिया लुटते
तव भोळे रूप कामिनी !

असतां अतुल अनंत वैभव
कां सुचला तुज तीव्र विराग ?
भ्रांत वृत्तिनें धुंडिसि अथवा
जीवन–वक्षावरले डाग !

मीहि विसरलो आहे कांही
स्मरे ना परी काय नेमके,
प्रेम, वेदना, भ्रांती, अन्य वा—
ज्यांत मन सुखशायी होते ?

आढळले जर तुला अचानक
लुटवुन त्यासही देउं नको,
देइन बघ, तव वाटा तुजला
कधी तयाला विसरुं नको ! "

• • •

## श्रद्धा

" कोण तुम्हि जगजलधीच्या तटीं
फेंकिला लाटांनी मणि एक ?
करीतसा विराणावर मूक
प्रभेच्या धारांनी अभिषेक ?

मधुर विश्रांत आणि एकांत—
जगाचे उमगलेले रहस्य
एक करुणामय सुंदर मौन
आणि चंचल मनिंचे आलस्य ! "

अधोमुख करुनी कमलवदन
भ्रमरीसम ते जई सानंद,
ऐकिले मनुनें मधु गुंजन
आदि कविचा जणु सुंदर छंद.

लागला झटका एक सहर्ष
निरखती भान हरपुनी, कोण
गातसे हे सुंदर संगीत ?
कुतूहल राही ना मग मौन.

आणि दिसले तें सुंदर दृश्य
नयनिंचे इंद्रजाल अभिराम,
कुसुम–वैभवी लतिकेसमान
चंद्रिकेला बिलगे घनःश्याम.

भावना जणूं मूर्त, साकार,
तनुलता उंच आणि उन्मुक्त,
मधु–पवनें जेवी शिशु साल
सुशोभित झाला सौरभयुक्त.

मऊ गांधार देशिच्या नील
रोमयुत मेषाचें वर चर्म,
झाकित होते तनु तेजाळ
भासे तें जणु कोमल वर्म.

निळचा वसनातुन त्या सुकुमार
खुले मृदु अर्धे उघडे अंग,
उमललें जणु विजेचें फूल
घनवनीं घेउन अरुणिम रंग.

अहा ! तें सुवदन ! पश्चिम नभीं—
वळोनी येतांची घन शाम,
अरुण रवि बिंब तया भेदून
दिसूं लागले जणूं छविधाम.

इंद्रनीलाचें अथवा श्रृंग
फोडुनी धगधगतो जणुं कांत,
एक लघु ज्वालामुखी सुषुप्त
माधवी रजनीमधे अशांत.

भुरु भुरू उडती कुरळे केस
स्कंधीं, वदनीं, वारंवार,
विधुकडे घ्याया जाती सुधा
नील–घन–शावक जणु सुकुमार !

आणि किति गोड लाघवी हास्य !
करुनी अरुण–अंकुरी विराम,
रवीचा किरण एक अम्लान
अधिक आळसला जणु अभिराम !

नित्य यौवन–तेजानें दीप्त
जगाची करुण कामना मूर्ति,
स्पर्शाच्या ओढीने पूर्ण
प्रगटवी जडांत जेवी स्फूर्ति.

उषेची पहिली लेखा कांत
मुदें माधुर्यानें सुस्नात,
पहाटेच्या तारांची कूस
मदें झाली जणु लज्जितगात.

कुसुम–वनी धुंद मंद मलयें
पसरला जणु सौरभ साकार,
रचित परमाणु पराग शरीर
ठाकले घेउन मधु आधार,

आणि त्यावरती पडे टिपूर
चांदणें मनीषा–पुनवेचे
स्मिताचे मदविह्वळ प्रतिबिंब
खेळते खेळ मधुरिमेचे.

म्हणाले मनु—"पृथ्वी, आकाश,
यांपुढे होउनिया निरुपाय,
जळतसे उल्केसम मी भ्रांत,
भटकतो शून्यतेत असहाय.

शैल, निर्झर, नव्हतो ना ! हंत !
नव्हतो वा वितळता हिमखंड,
उदधिनें घेतले न उदरीं
खचित मी दुर्दैवी पाखंड.

जाहले जीवन कोडे गूढ
सुटेना, व्यर्थ होइ अभिमान
विस्मृतीच्या मार्गावर मी
चालतो होवोनिया अजाण.

बुडतसे विस्मृतींत दिनरात
सजल अभिलाषायुक्त अतीत,
तिमिर–गर्भात वाढते नित्य
दीन जीवनिंचे हे संगीत.

म्हणूं कां, आहे मी उद्भ्रांत ?
निळ्या गगनाच्या विवरीं आज
वाट चुकलेली एक झुळूक,
शून्यतेंचे वा उजाड राज्य !

स्तूप विस्मृतिचा एक अचेत,
ज्योतिचें अंधुकसे प्रतिबिंब,
आणि जडतेची जीवनरास,
यशाचा मी संकलित विलंब.

कोण तूं ऋतुराजाचा दूत
निरस या पानगळीं सुकुमार !
घन तमीं सौदामिनिची रेघ
तपनीं पवन तरंग अति गार.

ग्रहांची आशा रश्मिसमान
हृदयरूपी कविच्या तूं कांत—
कल्पनेचा लघु तरंग दिव्य
करिशी खळबळ मनिची शांत !

लागली बोलुं नवागत व्यक्ति
शमवुनी उत्कंठा सविशेष
देतसे जणु कोकिळ सानंद
फुलाला अमृतमय संदेश—

"होता मनीं नव उत्साह
शिकावें ललित कलेचें ज्ञान—
राहुनी गंधर्व प्रदेशात
पित्याचें अतिप्रिय मी संतान.

भटकणें आवडता मम छंद
वाढला मुक्त नभतळीं नित्य,
कुतूहल शोधित होते व्यग्र
हृदय-सत्तेचें सुंदर सत्य.

दृष्टि वळतां या हिमगिरिकडे
प्रश्न करि अधीर होउनी मन,
धरेचें आकुंचन भयभीत
हाय हें कसें ? असे पीडन ?

आपुल्या मधुरिमेमधे मौन
एक निद्रित संदेश महान,
करी जागृत होउन संकेत
न कळत चैतन्या ये उधाण.

चाललें मन, पडलीं पावलें,
शैलमालांचा हा श्रृंगार
पाहुनी फिटे नयन–पारणें
अहाहा ! किती सुंदर संभार !

एकदा सहसा सिंधु अपार
नगतलां टकरा देई क्रुद्ध,
एकटें हें जीवन निरुपाय
आजवर फिरत असे सश्रद्ध.

इथें दिसलें हवनाचें अन्न
भूत–हित–रत कोणाचें दान !
असे कुणी अजुन इथें सजीव
मनीं केलें ऐसे अनुमान.

तपस्वी ! कां तुम्हि इतके क्लांत ?
वेदनेचा कैसा आवेग ?
अहो ! झालां हे किती हताश ?
कशाला धरिला हा उद्वेग ?

नसे कां हृदयामधे अधीर
लालसा जगण्याची लव शेष ?
नाहि ना करीत वंचित त्याग
मानसीं धरूनी सुंदर वेश !

भयानें दुःखाच्या अज्ञात
करोनी विघ्नांचे अनुमान,
होतसां कर्मपराङ्मुख आज
भविष्याविषयी बनुन अजाण.

महाचैतन्य येउनी जाग
हर्ष-लीलामय करितें व्यक्त,
विश्व–उन्मीलन हे अभिराम
सर्व होतात यात अनुरक्त.

कर्ममंडित मंगल उत्सर्ग
उद्‌भवे इच्छेतुन अविराम
चुकीनें करून तिरस्कृत त्यास
बनवितां तुम्ही व्यर्थ भवधाम."

"विगत रजनीतुन दुःखाच्या
सुखाची उगवे नवल प्रभात
एक हें तलम निळें आवरण
झाकिते सौख्याचें तन आंत.

वाटतें जें तुम्हास अभिशाप
विश्व–ज्वाळांचे उद्‌गमस्थान,
असे तें गूढ ईश–वरदान
नका हें विसरूं तत्त्व महान.

विषमतेच्या पीडेनें त्रस्त
टाकितें धापा विश्व महान,
हेंच सुख, दुःख, प्रगतिचें सत्य
हेंच धरणीचें मधुमय दान

नित्य समरसतेचा अधिकार
उसळतो कारण सिंधुसमान,
व्यथेतुन निळ्या निळ्या लहरींत
विखुरती सुख मणि गण द्युतिमान."

लागले बोलूं मनु सविषाद—
"मधुर पवनासम हे उच्छ्वास
अधिक उत्साह-लहर निर्बाध
निर्मिती मानसात सविलास.

प्र २६६/१ ग्रंथालय

किती परि जीवन हे निरुपाय !
पाहिलें, अता न लव संदेह,
निराशा असे जिचा परिणाम
सफलतेचें तें कल्पित गेह."

नवागत व्यक्ति वदे सस्नेह—
"अहो तुम्हि त्यजला इतका धीर !
गमावुन बसलां जीवन-डाव
जिंकिती ज्यास मरोनी वीर.

तप नसे केवळ जीवन-सत्य
करुण तो क्षणिक दीन अवसाद,
तरल आकांक्षांनी परिपूर्ण
सुप्त जणु आशेचा आल्हाद.

सृष्टिच्या जीवन-श्रृंगारास
कुणी ना घेती सुकलें फूल,
शीघ्र तें गळेल कीं हमखास
भेटण्या तयास उत्सुक धूळ.

खपेना जीर्ण पुरातन कात
मुळी या सृष्टीला क्षण एक,
नित्य नूतनतेचा आनंद
असे तिज परिवर्तन ही टेंक.

युगांच्या पाषाणांवर सृष्टि
चालते पद टाकित गंभीर,
देव, गंधर्व असुर, सगळेच
तिला अनुसरती बनुन अधीर.

एक तुम्हि, हा विशाल भूखंड
भरला सृष्टि—वैभवें अमंद,
समन्वय कर्म भोग यांचा
हाच जडतेचा चित्—आनंद.

एकटे तुम्हि कसे असहाय
हवन करुं शकतां ? तुच्छ विचार !
तपस्वी ! जे आकर्षणशून्य
करुं न ते शकले निज विस्तार.

आपुल्या भारें झुकतां तरी
घेतही नाहीं लव अवलंब,
होउनी तुमची सहधर्मिणी
कां न मी उऋण होऊं अविलंब ?

समर्पण घ्या, सेवेचें सार
करिल ते संसृतिसागर पार
आजपासुन या चरणांवरी
जीवनार्पण हें विगत विकार.

दया, माया, ममता, घ्या आज
मधुरिमा घ्या, अगाध विश्वास,
आमुचा हृदयरत्ननिधि स्वच्छ
खुला हा अतां तुम्हास्तव खास.

बना संसृतिचे मूळ रहस्य
तुम्हां करवीं ती वेल फुलेल,
अखिल जग व्हावें सौरभयुक्त
सुचित्तें खेळा सुंदर खेळ.

" आणि कां नाहीं येत ऐकूं
तुम्हा ब्रह्म्याचें शुभ वरदान—
' शक्तिशाली व्हा, विजयी बना '
जगीं हे निनादतें जयगान. "

" भय नको तूं अमृत संतान
अग्रेसर ही मंगलमय वृद्धि,
करी जीवन आकर्षण–केंद्र
स्वयें येईल सकल समृद्धि.

सुरांच्या असफलतांचा ध्वंस
प्रचुर उपकरणें जमवुन आज,
मानवाची बनला संपत्ति
पूर्ण होवोत मनींचे काज.

चेतनेचा सुंदर इतिहास
अखिल मानव–भावांचे सत्य,
अंकित व्हावें दिव्याक्षरीं
जगाच्या हृत्पटलांवर नित्य.

विधात्याची कल्याणी सृष्टि
सफल या भूवर होवो पूर्ण,
हटो सागर, विखुरो ग्रह–पुंज,
आणि ज्वालामुखि होवो चूर्ण.

यांना गर्वे ठिणगीसमान
जावो चिरडीत ती सानंद,
यापुढे मानवतेची कीर्ति
अनिल, भू, जलीं न राहो बंद.

जलधिचे निघो कितीही प्रवाह
बनो जलवासी चिंतातूर,
परि, ती सदैव असो दृढ मूर्ति
अभ्युदय प्रभा पसरवित दूर.

जगाची दुर्बलता बल बनो
वाढत्या हार अपयशातून,
वदनी हास्य फुलावें तिच्या
सामर्थ्याच्या क्रीडेमधून.

शक्तिचें विद्युत्कण जे विकल
विखुरले होउन निरुपायच,
त्या सकलांचा घालुन मेळ
विजयिनी मानवता व्हावीच."

• • •

# काम

" जीवन–वनिचा मधु वसंत तूं
वाहत लहरींवरी नभाच्या,
आलिस केव्हां चोर पावलीं
उत्तर प्रहरीं मध्य रातिच्या !

बघुन अशी कां तुज येतांना
कुहू कुहू कोकीळ बोलले !
निरवतेत त्या आळसलेल्या
कलिकांनी निज नेत्र उघडले !

लीलेनें तूं शिकलिस जेव्हां
लपुन बसाया मृणालांतरीं,
तेव्हां मंद सुरभिनें धरणी
वद, निसरट नव्हती खरोखरी ?

करीत होतिस अंकित जेव्हां
सरस हास्य निज फुलांफुलांवर,
होतिस मिळवित कोकिळ–कंठें
सूर झऱ्यांच्या सुर–तालांवर.

निश्चित अहा ! तो किति होता
उल्हास पिकांच्या मधुर स्वरीं,
हर्षाचा प्रतिध्वनि निनादे
दिगंत जीवनाच्या नभांतरी.

शिशु चित्रकार चांचल्यानें
अनंत आशा चित्रित करिती,
अस्पष्ट एक ज्योतिर्मय लिपि
जगताच्या नेत्रीं रंगविती !

लता–घुंघटातील दृष्टिची
ती पुष्पधवलशी मधु धारा,
पवन रिझवितो मनास, वाटे
तुच्छ विश्व–गौरव सारा.

तीं फुलें, हास्य तें, सौरभ तो,
निःश्वास गाळुनी आलेला
तो कलरव, तें संगीत, अहा !
कोलाहल एकांत जाहला ! ''

मनू बोलती गूज मनींचें
सोडुन निश्वास निराशेचा,
विचार येती मानसीं, परी
थांबे न वेग अभिलाषेचा.

'' जगताच्या हे नीलावरणा
दुर्बोध न तूं इतका गमसी
तेज–बिंब मिटल्या नयनींचें
जितुके वाटे गूढ मानसीं.

वरुणाच्या ज्योतिर्मय चक्रा
व्याकुळलें कां भ्रमण तुझें ?
तारांचीं फुलें विखुरली हीं.
अपयश करण्या जाहीर तुझें !

डोलतात नव नीलकुंज हे
कुसुम कथाहि न बंद जाहली,
अंतरिक्ष भरलें आमोदें
हिमकणिका मकरंद जाहली.

या इंदिवराच्या गंधाने
जाळी विणते अमृतधारा,
मन–मधुपासम अनुरागमयी
बनतसे मोहिनीची कारा.

परमाणूंना विश्राम कुठे ?
        कर्मण्य वेग हा जबर किती,
कंपन करिते अविरत नर्तन
        झाला उल्हास सजीव किती !

त्या नृत्य-श्रांत निश्वासांची
        कीर्ति असे मोहमय ही माया,
समीर झरतां झरतां ज्यातुन
        बनतो या प्राणांची छाया.

बुजलीं रंध्रें आकाशाचीं
        विश्व जणूं घन होऊं लागलें,
मूर्छित, निद्रित तेजें सगळीं
        डोळे थकुनी रडूं लागले.

सौंर्यपूर्ण चंचल रचना
        गूढ बनोनी जणूं नाचती,
मम नेत्रांना तिथेच अडवुन
        कसुन तयांची झडती घेती.

जें कांहीं मज आज दिसतसे
        काय सर्व तो भ्रम वा छाया ?
सुंदरतेच्या बुरख्यामध्यें
        दडले अपरिचित धन वा माया ?

मम अक्षयनिधे ! काय रूप तव—
        ओळखतां मज नच येइल कां ?
प्राणतंतुचा गुंता कां तू ?
        सोडविण्याचे गमक मानुं कां ?

माधवी निशेच्या आळसल्या
        अलकीं लुकलुकता तारा तूं,
कीं विराण मरुप्रदेशातल्या
        अंतःसलिलेची धारा तूं !

कानांत ओततें हळू हळू
मधुरसधारा चुपचाप कुणी,
नीरवतेच्या पडद्यामागे
जणु कजबुजते कांहि कुणी !

हा स्पर्श चंदनी झिरझिरता
संज्ञेला अधिकच गुंगवितो,
पुलकित होउन मिटून डोळे
तंद्रेला समीप बोलवितो.

लज्जा असे किती चंचल ही
गोंधळून जरि घुंघट घेते,
लपून बसतां मृदुल करांनी
डोळे माझे हळुच झांकते !

प्रबुद्ध क्षितिजाची शाम छटा
छायेत उदित या शुक्राच्या,
उषेसारिखें रहस्य घेउन
कायेत झोपली किरणांच्या !

येते ती किरणांच्या वरती
नवांकुरांची विभा जशी,
रोमरोमिं मधु स्वर झंकारे
जेवि दूर वाजावी वंसी.

सर्वच म्हणती—उघडा उघडा
छवी पाहुं या जीवनश्रीची !
स्वयेंच वनतीं नव आवरणें
दाटी होई बघणारांची.

चांदण्यासारखें जर फिटलें
अवगुंठन हे आज सुशोभित,
दिसेल अथांग चिदानंद तो
लाटा फेकित, रत्नें उधळित—

आहे जागृत झालेला
फेसाळ फणा निज आपटीत
उसळत थिरकत नाचत आहे
उन्मत्त होउनि गाणे गात."

"असो काही तें, नकोच मला
हे ओझे मधुर जीवनाचें,
येवोत थवे हवे तेवढे
पथि दमी संयमी बाधांचे.

नक्षत्रांनो ! बघायची कां
लालिमा उषेची असे कशी ?
संकल्प पेटल्यावरी उरीं
संदेह मालिका उरे कशी ?

कौशल्य असे हें कीति कोमल
दुर्भेद्य चांदणे होइल कां ?
जाणीव इंद्रियांची माझ्या
माझाच पराभव बनेल कां ?

प्राशितो, होय आज प्राशितो
मी स्पर्श, रुप, रस, गंधयुक्त
मधुलहरींच्या आघातांनी
स्वनीं केवढे गुंजन मुक्त.

तारे बनुनी आज विखुरतो
कां हा स्वप्नांचा उन्माद !
मदालसी निद्रेत बुडूं कां
भरुनिया मनामध्ये अवसाद ?

शिथिल चालली होत चेतना
लहरींमध्ये अंधाराच्या,
मनु बुडत चालले हळू हळू
त्या प्रहरीं उत्तर रात्रींच्या.

दूर क्षितीजीं आकारा ये
सृष्टि स्मृतीच्या छायेने,
या मनास पडते चैन कुठे
चंचल तें अपुल्या मायेनें.

जागी जाण दडे विस्मरणीं
सुखस्वप्नांची दुनिया जागे,
कौतुक मनुच्या मनिचें बनुनी
जणु झाले क्रीडांगण जागें.

आळसून करि विचार मानव
चेतना दुहेरी सजग असे,
कानांचेही कान होउनी
अंतरिचा घन रव श्रवत असे. "

"तृषार्त मी राहिलो अजुनही
प्रलय–जलेंहि तुष्ट न झालो,
आलें, परि तें गेलें निघुनी,
तृष्णा लवहि न शमवूं शकलों.

सृष्टि सुरांची विलीन झाली
माझ्या अनुशीलनात अनुदिन,
मम अतिचार न बंद जाहला
उन्मत्त राहि सकलां वेढुन.

उपासना करिती ते माझी
मम संकेत विधान जाहला,
माझा विस्तृत असे मोह जो
देव–विलास–वितान जाहला.

मी काम असे सहचर त्यांचा
त्यांच्या आनंदाचे साधन,
हंसलो आणि हंसविलें, त्यांचें
होतो मीच कृतिमय जीवन.

आकर्षण बनुनी हंसली जी
रति ती, अनादि वासना तीच,
अव्यक्त सृष्टि–उन्मेषाच्या
अंतरीं होती आस तिचीच.

होतें अस्तित्व अम्हां दोघांचें
त्या प्रारंभिक आवर्तासम,
ज्यांत सृजन नव ये अकारा
नाम–रुपाच्या सुनर्तनासम.

त्या सृष्टिलतेच्या यौवनात
पुष्पवतीचा माधवासवें
मधुहास जाहला तो पहिला
दो मधुर रुपें जन्मलीं सवें."

" ती आदि शक्ति राहिली उभी
अपुला आळस दूर फेंकुनी.
लघु परमाणू धावत सुटले
तिचा रम्य अनुराग घेउनी.

कुंकुमचूर्ण उधळती जणूं
अलिंगनास आतुर होउन,
अंतराळिच्या मधु महोत्सवीं
मिसळले चमकते विद्युत्कण.

ते आकर्षण अन् ते मीलन
सुरू जाहले मधुरिम छायेत,
यासच म्हणती–सारी सृष्टी
जाहली प्रमत्त निज मायेत.

प्रत्येक नाश–विश्लेषणही
संलग्न होइ, जन्मे सृष्टी,
वसंतगेहिं कुसुमोत्सव होता
मकरंदाची होती वृष्टी.

सरितांच्या भुजवेली पडुनी
शैलशिखरें सनाथ जाहलीं,
सागर व्यजन धरेचें झाला
दोघें दोघें सवें चाललीं.

मृणालांकुरांसम जन्म गमे
आम्ही दोघें मत्त जाहलों,
त्या नवलसृष्टिच्या वनांतरीं
मृदु मलयवायुसम मस्त जाहलों.

तृषा क्षुधेनें जाग ये अम्हां
कांक्षा–तृप्तीच्या समन्वयीं
रतिकाम जाहलों त्या सृजनीं
राहिलें नित्य जें तरुण वयीं."

" रति सखीच होती सुरबालांची
त्यांच्या हृत्तंत्राची लय ती,
मनें तयांची उलगडणारी
अनुरागमयी मधुमय होती.

जागवीत मी होतो तृष्णा
ती देत असे तृप्ति तयांना,
आनंद–समन्वय होत, अम्ही
ठेवित होतों मार्गी त्यांना.

ते ना उरले, प्रमोद नुरला,
चेतना उरे, होउन अनंग—
अस्तित्वास्तव असा भटकतो
प्रारब्धाशी पडला प्रसंग."

" हें घरटें सुंदर कृत्यांचें
हे जग कर्माचे रंगस्थल,
परंपरा सुस्थापित येथे
टिके तोच जयात जितुकें बल.

ऐसी असतीं माणसें किती
जी केवळ बनतात साधनें,
प्रारंभ आणिक अंताचे
बनतात स्वयें ताणेबाणे !

उषेची भिजटली लाली जी
विरघळते या निळचा अंबरीं,
ती काय असे ? —दिसे कां तुला
वर्णांच्या मेघावडंबरी !

अंतर असे दिवस रात्रीचें
हा साधक कर्मे विखूरतो,
मायेच्या या नील अंचलीं
आलोकाचा स्रावच झरतो. "

" उत्पत्तीचे वादळ पहिलें
होत सृष्टिची प्रगती आतां,
मानवाचिया शीतल छायीं
सकल ऋणांची करिन सांगता.

दोघांचे उचित प्रत्यावर्तन
आणी जीवनीं शुद्ध विकास,
प्रेरणा जाहलीं अधिक स्पष्ट
विप्लवीं जाहला जई नाश.

जिची लीला ही अशी विकसे
मूल शक्ति ती प्रेम कला,
संदेश आपुला देण्यास्तव
जगात ती पातली निर्मला.

तीच अपत्य अम्हां दोघांचें
किती मनोहर, साधे, भोळे,
खेळ खेळले रंग ज्यांसवें
असे कुंज तें जणू फुललेलें.

जड–चैतन्याची गांठ तीच
उकल असे ती सकल चुकांची,
आहे शीतलता शांतिमयी
जीवनिच्या उष्ण विचारांची.

तिच्या प्राप्तिची असेल इच्छा
तर हो 'लायक'– असे म्हणोनी,
तो ध्वनि सहसा मौन जाहला
जणुं मुरली व्हावी मूक मधुनी.

मनु नेत्र उघडुनी विचारती—
"मार्ग कोणता तिथें पोंचवी ?
देवा ! वद, त्या ज्योतिर्मतीची
प्राप्ति मानवा केवी व्हावी ?"

देइल उत्तर कोण पण तिथे !
स्वप्न अलौकिक भंग पावलें,
पूर्व नभीं तिकडे प्राचीनें
अरुण रंग रस खूप विखुरले.

त्या कुंजाच्या पानोपानीं
सुवर्ण रश्मी खेळुं लागली,
सुरांच्या सोमसुधा रसाची
मनुच्या हातीं वेल राहिली.

× × ×

चालली दो मनें कधिचीं पांथ जणु अश्रांत,
इथें भेटायास भटकत राहिले जणुं श्रांत.
एक गृहपति, एक होता अतिथि विगत विकार,
प्रश्न जर कां एक, तर उत्तर द्वितीय उदार.

एक जीवनसिंधु, तर दुसरा लहर लघु लोल,
एक नवल प्रभात, दूजा स्वर्ण रश्मि अमोल.
एक नभ वर्षा ऋतूतिल घनगहन अभिराम,
दूसरा रंगीत किरणें शोभतो घन श्याम.

नदीकांठी तिन्हीसांजा क्षितीजावर मेघ
ओढितो दो दामिनींसह मनोहर आलेख
युगल–मनि संघर्ष अविरत ओढ घेती पाश
कोणिहि दुसऱ्यास घालूं शकत नव्हता फांस !

निहित होता त्या समर्पणि स्वीकृतीचा भाव,
होइ प्रगति, आड संतत ये परी अटकाव.
विजय–मार्गी हात होता मधुर जीवन-खेळ,
दो अपरिचित जीवनांचा नियति चाहे मेळ.

नित्य परिचित होत असुनी राहि कांहीं शेष
लपुन राही तरी उरिंचा गूढ भेद विशेष,
काननीं घनदाट जेवीं मार्गान्तिचा प्रकाश
होत जाई दूर, रोखुन अधिर दृष्टि भकास.

कोसळे निस्तेज रवि जलधीमधें असहाय
तिमिर पटलीं बुडत होता तो किरण समुदाय.
नाश कर्माचा करितसे दिनाशी छळ छंद
मधुकरीचा सुरस संचय होत जाई बंद.

कालिमा धूसर क्षितीजीं उठत होती क्षीण
भेटतो अंतिम अरुण–आलोक वैभवहीन,
हें क्षुद्र मीलन विरचितें एक करुणा–लोक
शोकभारें विलगती निर्जन गृहातुन कोक.

अजुनही मनु करित होते मनन लावुन ध्यान
काम–संदेशें भरोनी घेत होते कान.
आंत गेहीं जमत होतीं साधनें सामान,
अन्न, धान्ये, पशू यांनीं भरे गेह–वितान.

नवी इच्छा ओढ घेते, अतिथिचा संकेत
तिथे चाले सरल शासनयुक्त सुरुचिसमेत.
बघत होते अग्निशाळेतून कुतुहलयुक्त
चकितसे मनु निज नियतिचा खेळ बंधनमुक्त.

काय माया ! एक देई पशू अतिथिस साथ
होत होता मोह करुणेने सजीव सनाथ !
चपल कोमल स्पर्श कुरवाळी पशूचे अंग
तोहि डुलवी पुच्छ– चामर येत संगेसंग.

क्षणीं होउन रोम–पुलकित उडचा मारी जीव,
क्षणीं गिरक्या घेइ अतिथीभोंवतीं रेखीव,
क्षणीं निज निष्पाप नयनीं बघुन अतिथि–शरीर
दृष्टि पंथे सकल संचित ओति स्नेह–सुनीर.

आणि त्यां चुचकारण्याचा स्नेहमिश्रित भाव
मंजु ममतायुक्त झाला हृदयिचा सद्‌भाव.
पाहतां बघतां उभयतां पातलींत समीप
करित क्रीडा मधुर शोभन मुग्ध सरल अमूप.

विरक्तिची राख विखुरे ईर्ष्या–पवनावर,
फुलती निर्धार–निखारे होउनी प्रखरतर,
एक जळतां घोट गिळतां येइ गुचकी हाय !
कोण देई अंतरा या वेदनामय दाह ?

" अहा ! हा पशु आणि त्याची ही सुंदर स्नेही
दिल्या अन्नावरी यांचे पोषण मम गेहीं,
मी ? कुठे मी ? सकल घेती घेउनी निज भाग
आणि देती फेंकुनी मम प्राप्य तुच्छ विराग !

कृष्ण कातळास चिकटल्या शेवाळासमान
कृतघ्नते ! किति हृदयांचे करशील अवसान.
हृदयनिधि लुटला, लुटारू करून घोर अपराध
वांछिती मजकडुन आतां सुख सदा निर्बाध.

जगीं या ज्या ज्या सरल सुंदर विभूति महान
सर्व माझ्या, नित्य द्यावें तयांनी प्रतिदान
हेंच तर, मी ज्वलित वाडव–वन्हि नित्य अशांत
सिंधुलहरींसम करो जग मला शीतल शांत."

खेळकर अभ्यागता आली समीप उदार
चूक करता जेवि भासे शिशू मधुर अपार.
म्हणाली— "हे काय, अजुनी चाललें का ध्यान,
दृष्टि शून्यांतरीं, असती कानही बेभान—

मन असे तिसरीकडे, हें काय ? कसला भेद ?"
मानिनी ईर्ष्या विनमली, लीन आज उमेद.
आणि गोंजारी हळुहळु करपद्म कोमल कांत
पाहुनी ती रूप–सुषमा कांहिसे मनुशांत.

म्हणाले, "अभ्यागते ! होतीस कुठे अज्ञात,
आणि हा सहचर तुझा जणु करित मनिची बात—
सुलभशा भावी युगाची, कां बनुन अधीर
भेटतो तुज हा चिरंतन स्नेहवत् गंभीर ?

कोण तूं अपुल्याकडे मज घेशि आकर्षून
आणि ऐसे लालचावुन जाशि दूर निघून !
सुधा–सरिते ! नजर जाते दिपुन तुज निरखून
तुला जाणून घेण्याचे भान जाइ हरवुन.

सुप्त कुठलें गूढ तुझिया अंतरीं छविमान
लता पल्लव देत जाती ज्यास छायादान.
पशू वा पाषाण, नाचे सर्वांत नव छंद
एक आलिंगन निमंत्रण देतसे सानंद.

ठाइं ठाइं विखुरलेल्या प्रेमराशी शांत
दीन जग त्या वाहुनी ठेवी उधार निवांत.
चकित मी बघतो लतांचा ललित लास्यविलास,
अरुण मेघांच्या सजल छायेत संध्या–वास—

आणि होतो त्यामधें जेवी सहज सविलास
मदिर माधव–यामिनीचा मंद पदविन्यास.
ध्वस्त भवनाचा इथें हा रिता कोना दीन
सुना पडला त्यांत वसण्या कोणिही येइ न—

त्यातची विश्राम मायेचा अचल आवास,
अरे ही सुखझोप कसली, होतसे हिम–हास !
वासनेची मधुर छाया ! स्वास्थ्य बलविश्राम !
हृदयिची सौंदर्य–प्रतिमा ! कोण तूं छविधाम !

कामनांचे किरण देती जिला अपुले ओज
कोण तूं , या श्रांत चित्ताचा चिरंतन शोध !
कुंद मदिरसे स्मित उमले चांदणें वाटून,
कां न तैसे हृदय खुललें कपाटें उघडून ?"

हंसुन वदली, "मी अतीथी अधिक परिचय व्यर्थ
नव्हता कधी उद्विग्न इतके तुम्ही एतदर्थ !
चला, येतो पहा वरती बोलवाया आज
सरल हंसरा चंद्र सजवुन मेघवाहन–साज.

• • •

# वासना

काळोख हा लागला विरुं पसरतो आलोक
याच एकांतांत वसतो अता अनंत लोक,
गोरज वेळेचे सुधामय मधुर स्मित पाहून
अनुभूती निज दुःखांची जाऊं या विसरुन.

उंच शिखरांचे बघुन घ्या व्योम–चुंबन मस्त
बघा मावळतीस कैसा होतसे सूर्यास्त
चला, या चांदण्या रातीं घेऊं पाहुन आज
जग चंदेरी स्वप्नांचें साधनेचें राज्य.

हंसूं लागे सृष्टि नयनीं उमलता अनुराग
चंद्र न्हाला रांगरंगी उडे सुमन–पराग,
धरून मनुचा हात हंसली अभ्यागता प्रेय
स्वप्न–पंथे चालतीं ती, स्नेह हें पाथेय.

देवदार निकुंज गव्हर सर्व ज्योत्स्नास्नात
सकल करिती एक उत्सव जाग्रणाची रात.
येत होता मदिर ओला माधवीचा गंध
पवन–मेघां वेढुनी तो करि तयां मधुबंध,

पेंगुळोनी शिथिल पडली निशा–छाया शांत
शिशिर कणांच्या शेजेवर पहूडली विश्रांत.
आसमंती धुंद त्या हृद्‌भाव झाले भ्रांत,
करित होती सृजन छाया कुतुहलाचे कांत.

वदति मनु, " अभ्यागते ! तुज पाहिलें कितिवार,
परी नव्हता कधी इतुका तुज रुपाचा भार !
मदिर मेघीं निनादे तें वासनेचें गीत—
पूर्वजन्म अथवा होता सुरम्य मधुर अतीत ?

विसरुनी दृश्यास ज्या मी आज इथे अचेत,
तेंच सस्मित लाजुनी मज दावितसे संकेत.
'होत आहे मी तुझा' हा एकची निर्धार
जाणिवेच्या परीघावर फिरे चक्राकार.

चंद्रकिरण सुधा वर्षती थिरकती सुकुमार
भरे पवनीं पुलक शिरशिर वाहुनी मधुभार.
तुझ्या सान्निध्यात इतुके कां अधिर हे प्राण ?
मोहिले कुठल्या सुरभिनें तृप्त होउन घ्राण ?

कां उगा शंका मनीं ये—रुसलीस मजवरी ?
काढण्या रुसवा तुझा मी असमर्थ, कां परी !
करी रोमीं रुधिरासवें वेदना संचार,
कंप पावे उरीं स्पंदन घेउनी लघुभार.

रंगित ज्वालेच्या परिघीं चेतना सानंद
दिव्य सुख मानून कांहीं गातसे नव छंद !
शलभासमान अंतरात जळे अति उत्साह,
तरीही जीवंत उरतो, ना फोड, ना दाह !

कोण तूं या विश्व—मायेचें कपट साकार
प्राण—सत्तेचा मनोहर भेद जणु सुकुमार !
शांत छायीं घेइ ज्याच्या मानस हे निश्वास,
श्रांत पथिकासम करी निज ग्लानीचा विनाश."

मधु किरणांसम नील नभीं पुन्हा तो मृदु हास,
सिंधुचा आंदोल आणिक दक्षिण—पवन—विलास !
कुंज निकुंज गुंजतात आत्म्यासम अव्यक्त,
वदली अतिथी पुन्हा, मनू ऐकिती अनुरक्त—

" चंचल मन मित्रा तुमचे प्रमत्त वासनाही
भारावले संवाद ते, तापले निःश्वासही
काही विचारूं पुसूं नका बघा केवी मौन
पुनवेची मूर्ती निर्मल बनुन बसले कोण !

वैभवें नटल्या धरेचे धुंद नीलावरण
विखुरले भरभरून ज्यावर लाजा होमाचे कण—
नक्षत्रपुंजांनी, जणु कुसुमार्चनी अश्रांत
उधळला मनींचा विकार चारु-चरणि निवांत. "

जसजसे मनु निरखिती त्या यामिनीचें रूप
ती अनंत प्रगाढ छाया पसरते अपरूप,
मदिर तुषार वर्षत होता सतत स्वच्छ अनंत
होऊं लागलें होतें मीलन–संगीतहि रसवंत.

फुटत होते अग्निकण, उत्तेजना उद्‌भ्रांत,
धगधगते ज्वाला मधुर, व्याकुळ वक्ष अशांत.
वातचक्रासम भिरभिरत चढे मनि आवेश
अंतरीं नुरला मनूच्या धीर तो लवलेश.

कर धरोनी मदमत्तसे मनु, म्हणाले, " आज
पाहतो मी आगळाची मधुरिमामय साज
तीच छबी ! हो तीच जणू ! भूल परि ही काय ?
भोंवऱ्याच्या विस्मरणाच्या स्मृति–नाव असहाय !

जन्मसंगिनी एक होती, श्रद्धा जिचें नाम,
कामबाला मधुर ती, या प्राणांचा विश्राम,
देत होतीं फुलें तिजला अर्घ्यातुन मकरंद
दिव्य कांती देत होती सुषमाहि सानंद.

वांचलो प्रलयातही मग पुनर्मीलन–मोद
मीलना उरले जुने जग, किती क्रूर विनोद !
स्वच्छ ज्योत्स्ना प्रगट झाली. धुके करुनी पार
प्रणय विधु ठाके घेउनी नभी तारा–हार !

कुरळे कुंतल गुंफतात गाल–माया जाल,
निळे डोळे तुझे रचिती तमिस्रेची माळ.
घन तमींची गाढ निद्रा जणू निर्मे दृष्टि
मधुर हास्य तुझे जागवी जणू स्वप्नसृष्टी.

जाहली केंद्रीतशी जणु साधनेची स्फूर्ति
सकल सुकुमार्यामधे दृढ रम्य नारी मूर्ति
उन्हातान्हातून श्रमतां व्याकुळ आणि श्रांत
पुरुष मी, भटकलो शिशुसम आजवरी विश्रांत.

शशीची विश्राम–राका, बालिकेसम कांत,
विजयिनीसम भासशी तूं माधुरीसम शांत.
जेवी सदा तुडविलेली पायवाट श्रांत
शस्यश्यामल धानक्षेत्री विलोपते अशांत,

तेवि मानस अहा ! माझे तुझ्यात होइ लीन
कामनार्पण तुला करिता काम होती पूर्ण.
विश्वराज्ञे ! रमणिके ! ग तू जगत–अभिमान !
आज घेई चेतनेचे हे समर्पण दान ! ”

शिशिर रात्रींच्या दंवानं जेवि होउन लीन
धूम–लतिका उंच गगनी चढावया दीन
वाकली तेवी तनुलता लज्जेच्या भारें
मोहरली पुरुषाच्या त्या सुखमय आधारें.

आणि या नारीपणाची मूळ मधु अनुभूति
हंसुनिया जणुं आज हृदयीं चेतविते प्रीती
मधुर लज्जामिश्र चित–सवेची उल्हास
घेउनी पिक मानसींचा करि कूजन–विलास.

पापण्या मिटतात, झुहते नासिकेचे अग्र,
भ्रूलता श्रवणीं चढे निर्बाध किंचित व्यग्र,
स्पर्श लागे करूं लज्जा काना–कपोलांस
रोमरंध्री फुले कदंब घुमारुन बोलांस.

परी वदली, " काय देवा ! आजचे समर्पण,
होईल कां स्त्री–मनाचे सदैव चिरबंधन ?
उपभोगाया दान आज व्याकुळ पंचप्राण !
दुबळी मी परि, शकेन कां घेऊं तुमचे दान ? "

• • •

## लज्जा

" कोमल अंकुरांच्या अंचलीं
कळी सानुली जेवी लपते,
गोरजाचिया धूसर पटलीं
दीपासमान जणू लुकलुकते,

मधु स्वप्नांच्या विस्मृतीमधे
मनिचा उन्माद खुले जेवी
छायेत सुगंधी लहरींच्या
बुद्‌बुद् विभव विखुरतें जेवी,

तैशीच गुरफटुनी मायेंत
ओठावरती बोट ठेवुनी
सुरस वसंती कुतूहलाचें
सतेज नयनीं भरुनी पाणी,

निरव मध्यरात्रीं लतिकेसम
पुढे येतेस सांग कोण तूं ?
कोमल कर निज फैलावोनी
आलिंगनाची टाकित जादू !

इंद्रजाल–पुष्पातुन कुठल्या
सुगंध कण घेउन प्रेमभरें
अधोवदनें माळ गुंफिसी
ज्यातून माधवी धार झरे ?

पुलकित कदंब–मालाच जणूं
अंतरामधें देशी घालुन,
आपुल्याच फलभार भयानें
फांद मनाची जाते वाकुन.

वरदानासम टाकितेस तूं
कलाबतूंनी विणलेला,
पदर मऊ नाजूक किती हा
गंध सुगंधांनी भिनलेला.

रोम रोम मेणासम बनतो
सुकमार्यी मी मुरकुन जात्यें,
संकोचें होत्यें अर्धी मी
परिहास–गीत ऐकूं येतें.

मुक्त हास्य प्रकटते स्मित बनुनी
नयनात फुलतसे जादु–लता
प्रत्यक्षात दिसे जें कांहीं
तें स्वप्न बनोनी जात अतां.

माझ्या स्वप्नात कलरवांची
सृष्टी जेव्हां जागी होते,
येउन समीरावर तरंगत
अनुरागाची माया डुलते.

अभिलाषा अपुल्या यौवनांत
करिते स्वागत त्या सौख्याचें,
जीवनातल्या बल–विभवानें
सुयोग्य अर्चन करिते त्याचें.

किरणांचा रज्जू आवरशी
चढत्यें मी ज्याच्या आधारें,
सुरस निर्झरीं शिरोनिया मी
बघण्या जात्यें प्रमोद–शिखरें.

स्पर्शाचा संकोच, पाहतां
नेत्र–संपुटें मिटुनी जातीं,
निनाद कलरव परिहासांचे
अधरीं येउन तिथें थबकतीं.

संकेत करिते रोमावली
गुपचुप वरजत उभी ठाकली
वनोनिया भुवयांची भाषा
काळ्या रेषेसमान भ्रमली—

कोण तूं ? मनाची परवशता ?
सर्व स्वातंत्र्य हिसकुन घेशी,
स्वच्छंद उमललीं जीं पुष्पें
जीवन–उद्यानातुन खुडशी !"

संध्येच्या लालीत हंसोनी
घेउनी आश्रय तिचाच जणूं
पडछाया गुणगुणली ऐसी
श्रद्धेला उत्तर देत जणू—

"चकित नको होऊंस बालिके !
हितचिंतन करी निज मनाचें,
एक पकड मी सांगे जगतां—
थांबा, चिंतन करा कृतीचें.

नभचुंबी हिमशिखरावरुनी
कल–कोलाहल घेउनी साथ
विद्युन्मय प्राणमयी धारा
सळसळते जिच्यांत स-उन्माद,

जिच्यांत मंगल कुंकुम–शोभा
खुलवीतसे उषेची लाली,
भोळा सुगंध पसरविणाऱ्या
जिच्यात रम्य अनेक हिरवळी,

नयनांचें फेडीत पारणें
आनंद फुलांसम जिथें फुले
वासंती वन–विभवी ज्याचा
पंचम स्वर पिकांसमान खुले,

मूर्च्छेसमान व्याकुळलेला
रोमरोमिं जो गुंजत राही
नेत्रांच्या सांच्यात येउनी
सुरम्य स्वरुपें दावी कांहीं,

नयन–नीलकांताच्या रेषा
ज्या गडद रंगामधें रंगती,
ती चमक जिनें अंतरातल्या
शीतलतेला मिळते शांती,

आवेग ज्यांमध्ये ऋतुपतिचा
गोधूलीसमयासम ममता
प्रभातीसम हंसे जागृती
माध्यान्ह असे जयांत खुलता,

चकित निघोनी आली सहसा
जी अपुल्या प्राची–गृहातुनी
त्या नवचंद्रिकेवरुन घसरे
जी मानसिच्या लहरींवरुनी,

पुष्पाच्या कोवळया पाकळया
विखुरती जिचिया अभिनंदनीं
मकरंद आपुला मिसळविती
स्वागताचिया रक्तचंदनीं,

कोमल अंकुर सळसळ करुनी
जयघोष जियेचा ऐकविती
मनिची सुखदु:खें जयांमध्ये
आनंदोत्सव प्रमोद करिती,

उज्वल वरदान चेतनेचें
जग संबोधे सौंदर्य जयां
जयांत अनंत अभिलाषेच्या
स्वप्नांची बहरून ये किमया,

मूर्तिमंत मी तीच चपलता
गौरव महिमा मी शिकवीत्यें
बसणार असे जी ठेंच उद्या
आजच ती समजावुन देत्यें.

मी सुर–सृष्टीची रति–राणी
मदनापासुन वंचित अपुल्या
बनल्यें वर्जित दीन मूर्ति जणुं
अतृप्तीसम संचित अपुल्या.

अपुल्या विगत अतीतासम मी
उरल्यें केवळ अनुभवांतरीं,
थकलेल्या विषण्ण रमणीसम
लीला विलास बोचतो उरीं.

रतीच दुसरी–मी लज्जा
शिकवीतसे मी शालीनता
प्रमत्त सौंदर्याच्या चरणीं
नूपुर मी जणु रुणझुणता.

भोळ्या गालींची मी लाली
नयनांत काजळासम खुलत्यें
कुरळ्या कुरळ्या अलकांसम मी
भुरळ मनाची बनुन जागत्यें.

चंचल किशोर सौंदर्यांची
करीत असत्यें मी रखवाली
मीच असे हळुवार चुरड जी
कानांवरही चढवी लाली."

"तें सर्व खरें, परि वदशिल कां
जीवन–पथ मम असे कोणता ?
या निबिड रात्रीत संसृतिचा
आलोकमय सुलेख असे कोणता ?

समजलें असे हें आज मला
दौर्बल्यीं मी आहे नारी,
कोमल सुंदर अवयव घेउन
हरतच आल्यें सदा बिचारी !

परंतु हें मन स्वयेंच इतुकें
शिथिल कां बरें होउन जातें !
नयनाकाशीं श्याम घनासम
सहसा पाणी कां तरारतें ?

महातरूच्या सावलीत मनीं
सर्वस्व समर्पण करण्याची
मोहित ममता का जागतसे
चुपचाप पडुनी राहण्याची ?

अंधारातिल नक्षत्रांसम
चमचम करण्याची मधुलीला
अभिनय करते कां हृदयीं या
कोमल निरीच्छता श्रमशीला ?

निराधार होउनी पोहत्यें
आज मी या अथांग मानसीं
कधी न यावी जाग, वाटते
स्वप्नसृष्टि ही हवीहवीशी.

हेंच चित्र कां स्त्री-जातीचें ?
भरतेस विकल तूं रंग किती !
चौकटींत अस्फुट रेखेच्या
कला तुझ्या आकारा येती.

थबकत्यें जरा, पुन्हा थांबत्यें
विचार परि मज येइ न करतां,
वेडीपिशी मनाशीच जणुं
बडबडत्यें मी मुळीं न थकता !

तोलमाप करण्यास बैसतां
स्वत:च मी तोलली जातसे,
भुजलता गुंफुनी नर–वृक्षीं
हिंदोळ्यासम हिंदोळतसे.

या समर्पणीं अन्य न कांहीं
केवळ उत्सर्ग ओसंडतो,
मी द्यावें, परि कांहि न घ्यावें
इतकाच अर्थ त्यातुन निघतो. "

" काय म्हणसी ? तूं थांब नारी !
संकल्पें अपुल्या अश्रु–जलानें
आधीच दान तूं केलीस ग
जीवनिचीं सोनेरी स्वप्नें.

नारी, तूं केवळ श्रद्धा ग
विश्वास–हिमगाच्या चरणीं
पीयुष–स्रोतासम वाहत जा
जीवनिच्या सुंदर मैदानीं.

देवांचा जय, हार दानवी
यांचे सुरुं नित्य युद्ध इथें,
संघर्ष सदा उरीं अंतरीं
जिवंत परि नित्य विरुद्ध इथें.

अश्रूंनी भिजल्या पदरावर
लागेल सर्वस्व पसरावें,
निज स्मितरेषेनें तुजला हें
संधिपत्र लागेल लिहावें. "

• • •

## कर्म

कर्म-सूत्र संकेत वाटली
सोमलता तई मनुतें,
प्रत्यंचेसम चढवुन तिजला
ओढी जीवन–धनुतें.

त्याच पथीं झाले अग्रेसर
सुटल्या तीरासम ते
यज्ञ यज्ञ या कटु हांकेने
राहुं न शकले स्थिर ते.

काम–कथन कानात गुंजतें
मनात नव अभिलाषा,
विचार करिती मनु अतिरंजित
उसळत होती आशा.

लालचावते ललित लालसा
सोम–सुधा पानासी,
जीवनिच्या त्या दीन वैभवीं
मनिची जेवि उदासी.

अविराम साधना जीवनिची
सोत्साह उभी होती,
जेवी प्रतिकुल पवनीं तरणी
खोल परतली होती.

श्रद्धेचे उत्साह–वचन अन्
काम-प्रेरणा मिळुनी,
पर्वत बनला पुन्हा राइचा
भ्रांत अर्थ होवोनी.

आधी तत्त्व बनतसे, नंतर
पुष्टी होते त्याची,
बुद्धी घेउन तें ऋण करिते
सदा घमेंड तयाची.

मन जेव्हां करितें निश्चित कीं
हीं अमुक अपुलीं मतें,
बुद्धि दैव यांच्या आधारें
संतत स्वप्न निरखितें.

वारा त्यांची लाट उठवितो
तेंच मग तरळे जळीं,
खोल उरीं त्याचाच प्रतिध्वनि
व्याप्त होइ नभ तळीं.

सदा समर्थन करितें त्याचें
तर्काची सर्व पिढी,
"अगदी हेंच सत्य ! हीच असे
उन्नति सुखाची शिडी."

हे सत्या ! हा एक शब्द तव
किती गहन रे बनला,
मेघेच्या क्रीडा-पंजरिचा
पाळिव पोपट ठरला.

धृपदासम गीताच्या चाले
सत्र तुझ्या शोधाचें,
परि तर्काच्या स्पर्शे होशी
रोपच 'लाजाळूचे'

किरात आकुलि असुर पुरोहित
तेथें भटकत होते,
कष्ट साहुनी अनेक दोघे
प्रलयीं तगले होते.

बघून मनुचा पशू, तयांच्या
तोंडा सुटले पाणी,
अमिष–लोलुप चंचल रसना
मुखर होइ नयनांनी.

"काय किलाता, गवत खाउनी
आणिक किती जगावें ?
जिवंत पशु हा पाहुन कुठवर
अपुले रक्त गळावें ?

यां भक्षावें ऐसा कांही
उपाय मुळिच नसे कां ?
बहुत दिसांनीं एकदा तरी
सुखभोज मिळेल न कां !"

आकुलि वदला—'दिसे न तुज कां
त्या पशुच्या सभोंवती,
सदैव असते एक सुस्मिता
मार्दव ममता–मूर्ती.

अंधारा ती दूर पळविते
किरणांसम तेजाच्या,
मेघासम विरते मम माया
ममता शरांनी तिच्या.

तरीहि चल, मी विक्रम कांही
दावीनच करोनिया,
येवोत कितीही सुख दुःखें
घेइन तीं साहुनिया.'

ऐसा करुनी विचार दोघे
कुंज द्वारीं आले,
ध्यानस्थ मनू जेथे होते
चिंतन करीत बसले.

" कर्म यज्ञ जीवन–स्वप्नांचा
देतिल स्वर्ग मिळवुनी,
या विपिनीं मानस आशेचें
येइल पुष्प उमलुनी.

परंतु होइल कोण पुरोहित ?
प्रश्न नवीन उठतसे,
कुठल्या नियमें यज्ञ करावा
हा पथ कुठे जातसे ?

श्रद्धा ! पुण्याई ती माझी
अनंत चिर अभिलाषा,
मग निर्जनि या शोधे आणिक
कुणास माझी आशा ! "

करुनी वदनें गंभीर अती
असुर मित्र ते वदले,
" ज्यांच्यास्तव हा यज्ञ, तयांनी
अम्हां असे पाठविलें.

आहांत यज्ञ करणार तुम्ही ?
मग प्रतीक्षा कुणाची ?
पुरोहिताची ? कराल कुठवर
दैना अशी जिवाची !

रजनी प्रभात जन्मा येती
ज्या प्रतिनिधिच्या योगें
तम प्रकाश छाया बनुनी
दिसती ज्याच्या योगें,

दाखवोत पथ 'मित्र वरूण' ते
करूं सर्व विधि पूर्ण,
चला, पेटवा, पुन्हा उठूं द्या
वेदीतुन वन्ही स्वर्ण. "

" परंपरागत कर्माच्या त्या
लडी अप्रतीम किती !
जीव साधनेचे सुखकर क्षण
ज्यांत गुंतले असती,

जयांत असती सांठवलेल्या
बहुत प्रेरकशा कृती,
रोमांचित सुखदायक पुलकित
मादक बनोनी स्मृती.

सामान्याहुन जरा निराळी
मधुर त्वरेच्या यतिनें
उत्सवलीला करुं घटकाभर
नुरे विषण्णता जिनं,

श्रद्धलाही बघूनिया ती
वाटेल विस्मय फार.
नाविन्याचें लोभी मानस
हर्षुनि नाचे अपार ".

यज्ञ समाप्त जाहला तरिही
ज्वाला भडकत होती,
दारुण दृश्य ! सडा रक्ताचा !
विखुरलेल्या अस्थी !

वेदीची निर्दय प्रसन्नता,
पशुची कातर वाणी,
यांनी केलें वातावरणा
अति कुत्सितसा प्राणी.

सोमपात्र होतें भरलेलें
पुरोडाशही होतें,
श्रद्धा नव्हती तिथें, मनूचे
झाले भाव जागते.

,, उल्हास पहाया हवा जिचा
तीच इथें ना आली,
कां मग हा सायास ? वासना
गर्वे गर्जु लागली.

जिच्यांत संचित सुख जीवनिचें
सुंदर मूर्ती बनलें !
हृदय करोनी उघडें तिजला
कसें सांगु तें अपुलें ?

नाहीं तीच प्रसन्न ? यामधें
रहस्य असेल कांहीं,
आज सुखीं बाधक होइल कां
तो पशु मेल्यावरही ?

श्रद्धा रुसली, तर काय तिचा
रुसवा मी काढावा ?
स्वयेंच वा ती समज दाखविल
मार्ग कोणता घ्यावा ?

पुरोडाशासवें सोमाचें
पान मनु करुं लागले,
प्राणांच्या रित्या पेल्यामधें
मादकता भरूं लागले.

संध्येच्या धूसर सांवल्यांत
शैलशिखांची रेखा
अंकित होती विशाल व्योमीं
मळलेली शशि–लेखा.

श्रद्धा निज शयन–गृहेमध्यें
व्यथित होउनी आली,
वैराग्याचा बोझ उरावर
मनोमनीं तळमळली.

सुक्या काटक्यांमधून चंचल
वन्ही ज्वाळा जळती,
त्या कुंद गृहीं निज तेजानें
अंधाराला छळती.

मधेंच जाती पार विझोनी
शीत पवन झोतानें
दुसऱ्याच क्षणीं पुन्हा पेटती
तयाच्याच झुळुकेनें.

कामायनी पहुडली होती
चर्मासनीं आपुल्या,
श्रममूर्ती विश्राम देतसे
जणु निज गात्रां थकल्या !

हलके हलके जगत चाललें
अपुल्या सुगम पथानें,
हळू हळू उमलती तारका
विधु–ग्थ नेती हरिणें.

पदर लोंबता ठेवी रजनी
आपुला धवल रुपेरी,
ज्याच्या छायेमधें सुखावे
दुःखी सृष्टी सारी.

उंच शैलशिखरांवर हंसते
चंचल प्रकृति बाला,
शुभ्र हास्य उधळते आपुलें
पसरुन मधुर उजाला.

जीवांनिची उद्दाम लालसा
लज्जेनें जी नटली,
उन्मादाची मनोव्यथेची
सवेंच जोडी जमली.

मधुर विरक्ती व्याकुळलेली
भरली हृदयाकाशीं,
तरीहि होता चालू स्नेहल
अंतर्दाह मानसीं.

उघडझांप असहाय चालली
भीषण नेत्रपुटांची,
आज स्नेहपात्रास लागते
आंच कुटिल कटुतेची. "

" दुःख किती हें, प्रियकर माझा
कांही भिन्नच बनला,
चितारलें जें चित्र मानसीं
स्वप्नभास तो ठरला.

जागृत झाली दारुण ज्वाला
इथें अनंत मधुवनीं,
कशी विझावी, सांगा कोणी
अतां नीरव निर्जनीं.

अनंत आकाशाचें घरटें
ज्यांचा व्यथित निवारा,
त्याच वेदना जाग्या नयनीं
फुलवुन अलस फुलोरा.

थरथर कांपति चरण वायुचे
विदिशा उदासवाणी,
विरघळे महा नीरवतेसम
विशाल मलीन गगनीं.

व्याकुळतेला मिठी मारुनी
उरिचीं तृष्णा वाढते,
युगायुगाच्या वैफल्याच्या
अवलंबानें चढते.

विषम आतपें आपुल्याच जग
विपुल तप्त त्रस्त असे,
दाह भयंकर अंतरातला
दाट निळें पसरितसे.

हेलकावतो उदधी, लाटा
ओसरती व्याकुळुनी,
धूसर रेघ चक्रवालाची
जणु जात होरपळुनी.

सघन धूम वलयात कशी ही
नर्तन करिते ज्वाला,
तिमिर–फणी जणु धारण करितो
आपुलीच मणि–माला !

तीव्र विषारी विषमता असे
क्रंदन धरतीवरचें,
शल्य उरातिल हे सलणारें
दारुण निर्ममतेचे.

जीवनिंची निष्ठूर दंशनें
ज्यांची आतुर पीडा,
कलुषचक्रासमान नाचते
बनुन नयनिंची क्रीडा.

चैतन्याच्या कौशल्याचें
स्खलन म्हणती भूल ज्यां
एक बिंदु तो, ज्यांत उसळती
उद्विग्नतेच्या नद्या.

हाय ! तोच अपराध, जगाच्या
दौर्बल्याची माया,
धरणीची वर्जित मादकता
चिरसंचित तम–छाया.

निळसर गरळानें भरलेलें
चंद्र कपाल घेउनी,
याच निमीलित तारां द्वारें
घेई शांती पिउनी.

अखिल जगाचें जहर प्राशितां
पुनरपि जगेल सृष्टी,
इतकी होते कुठुन तुम्हांवर
अमर्त्य शीतल वृष्टी ?

अचल अनंत निळ्या लहरींवर
बसलां ठाण मांडुनी,
कोण विभो ! स्वेदासम तारे
झरती देहावरुनी !

समर्थ ते देण्यास पदीं या
अंजली कर्मसुमांची,
श्रांत पथिक जणु नभगंगेतटिं
रीघ लाविती साची ?

परंतु दुर्लभ स्वीकृति तुमची
त्यांना ना मिळणारी !
असफल ते परतविले जाती
जेवी नित्य भिकारी !

भीषण विनाशाच्या नर्तनीं
विपुल जगाची माया,
क्षणाक्षणाला नूतन बनुनी
प्रगटते तिची काया.

पूर्णत्वासाठींच सर्व जण
चुका करित जाती कां ?
जीवनात यौवन आणाया
जगुन पुन्हा सरती कां ?

हा व्यापार महा गतिशाली
　　कुठेच नसे वसत कां ?
क्षणिक विनाशी सुस्थिर मंगल
　　हळूच हा हंसतो कां ?

हा विराग संबंध मनाचा
　　कशी असे ही मानवता !
प्राण्यांबद्दल प्राण्यांमध्यें
　　उरे फक्त निर्ममता !

जीवनिचा संतोष दुजाचें
　　रुदन बनुन हंसतो कां ?
एक एक विश्राम प्रगतिला
　　परिकरसम कसतो कां ?

एकाच्या दुर्व्यवहारा कैसे
　　दुसऱ्यानें विसरावें ?
कुण्या उपायें कशा प्रकारें
　　विषाचे अमृत व्हावें !"

जागी झाली तरल वासना
　　मस्ती मादकतेची,
आता कोण येथे जावया
　　अडविल वाट मनूची !

तुकतुकीत उघड्या भुजवेली
　　खुले निमंत्रण देती,
आलिंगन सौख्याच्या लहरी
　　सुघट उरोजीं तिरती—

डोळे जें वर खाली होई
　　धीम्या निश्वासांनी,
जीवनास ये भरती जेवी
　　हिमकर परिहासांनी.

जागृत होतें सौंदर्य तिचें
निद्रित जरि सुकुमारी,
रूप–चंद्रिकेमधें उजळतें
आज निशेसम नारी.

मांसल अणुरेणू किरणांसम
विद्युत्कण पसरविती,
अलकांच्या पाशांत जिवाचे
कण कण गुंता होती.

विगत विचारांचे श्रमबिंदू
बनले होते मोती,
वदनावरती करूण कल्पना
त्यांना ओवित होती.

स्पर्शिती मनु आणि कंटकित
होत होती वेल ती,
मधुर व्यथेच्या लहरींसम जी
स्वस्थ पसरली होती.

ते पागल सुख या जगताचें
होतें विराट बनलें,
अंधार मिश्रित प्रकाशाचें
होतें वितान सजलें.

कामायनी जागी कांहींशी
सकल जाण गमावुनी,
भावनेच्या आकृत्या स्वयेंची
बनती पुन्हा विरोनी.

हृदय सदैव समीप जयाच्या
तेंच दूर की जातें,
क्रोध होतसे त्याच्यावरती
ज्याशीं कांही नातें.

प्रियास अव्हेरुनहि मनाची
माया गुंतुन घेते,
प्रत्यावर्तनात प्रणयशिला
तिला परतवुन देते.

श्रावण पवनींच्या वेलीसम
कोमल कर श्रद्धेचा
हळुच घेतला मनुनें हातीं
रोमां फुटली वाचा.

नयनीं सजली गोड व्यंजना
अनुनय भरल्या वचनीं
म्हणूं लागले मनू, " कशी ही
माया तुझी मानिनी !

स्वर्ग बनविला आहे मी जो
करुं नकोस विफल तया,
फुलव अप्सरे ! अतीताचिया
नवगानांची माया.

या एकांती ज्योत्स्ना–पुलकित
विधुयुत नभोवितानीं,
घेऊं नकोस झाकुन डोळे
इथें न तिसरें कोणी !

आकर्षणयुत धरा असे ही
केवळ भोग्य आमुची
जीवांच्या दो थडींत वाहे
श्रम–नदी वासनेची.

याच अभावाची दुनिया ही
तिचीच ही व्याकुळता,
ज्या क्षणीं विसरूं शकूं आपुली
आपण ही चेतनता.

स्वर्गाची बनुन अनंतता
तोच येथें हांसतो,
दो थेंबात जीवनाचा रस
बळेंच इथें वाहतो.

मधुमिश्रित हा देवसमर्पित
सोम चाख अधरांनी,
मादकतेच्या झुल्यावर प्रिये
झुलुं ये दोघें मिळुनी ! "

जागी होती श्रद्धा तरिही
मादक गुंगी होती,
मधुर भाव तिचिया तनीं मनीं
अपुली धुंद ओतती.

स्वाभाविक मुद्रेनें वदली—
" हें काय तुम्ही म्हणतां ?
आज या क्षणीं तर कुठल्याशा
भाव–नदीत वाहतां—

उद्यांच जर झालें परिवर्तन
तर जगेल कोण पुन्हा ?
कुणास ठावें. कुणि नव साथी
नव यज्ञ रचील पुन्हा !

अन् होइल बलिदान पुनरपी
कोणा देवासाठी !
घोर वंचना ! याहुन बरवें
आपण राहूं कष्टी.

या अचला सृष्टीचे हे जे
प्राणी असती उरले,
त्यांना कांहीं अधिकार न कां ?
व्यर्थच कां ते सगळे ?

हीच काय मनु तुमची भावी
उज्ज्वल नव मानवता ?
जी सर्वस्व घेणें जाणें
हाय ! उरे मग शवता ! "

" श्रद्धे ! तुच्छ नसे सुख अपुलें
स्थान त्यासही कांहीं,
दोन दिसांच्या या जीवांचे
तेंच गुरुतम सारही.

इंद्रीयांची सकल लालसा
सतत यशस्वी होते,
जिथें उराची तृप्ति विलासी
मधुर मधुर गुणगुणते.

रोमांचित त्या ज्योत्स्नेमध्यें
होउन स्मित उमलावें,
आकांक्षांवर श्वास समर्पुन
गळां गळे घालावे.

विश्व माधुरी ज्याच्या सन्मुख
मुकुर बनोनी जाते
तें अपुले सुख स्वर्ग नव्हे ! हें
काय असें तूं वदते ?

मी हिमगिरिच्या निविड अंचलीं
शोध जयाचा करितो,
तो अभाव या चंचल जीवनि
स्वर्ग बनोनी हंसतो.

वर्तमान जीवन-सौख्याशी
मीलन जेथें होतें,
छवी अदृष्ट अभाव बनवुनी
तेथेंच कीं प्रगटते.

परंतु सकल कृतींची सीमा
स्वत: आम्हीच असतों,
पूर्ण कामना व्हावी अमुची
ना तर यत्न विफल तो ! ”

पसरवीत एक अचेतनता
सविनय श्रद्धा वदली,
“ प्राण वांचले या सुविचारें
जाण सृष्टिला आली !

निर्मम भेदबुद्धि ममतेची
कल्पुन, असेल उरली
प्रलय–पयोनिधिची भरतीही
असेलची ओसरली,

स्वत:त सर्व भरोनी कैसा
करील विकास व्यक्ती
हा एकांत स्वार्थ अति भीषण
नष्ट करिल निज शक्ती !

इतरांना हंसते बघा मनू,
स्वयें हंसा, सुख मिळवा,
विशाल करुनी घ्या सुख अपुलें
सर्वांस सुखी बनवा.

रचनामूलक सृष्टि–यज्ञ हा
असे यज्ञ–पुरुषाचा,
संसृति सेवा भाग आमुचा
विकास करण्या त्याचा !

सुखास करुनी स्वत:त सीमित
केवळ दु:खच उरेल,
इतरांची पाहुनिया पीडा
तुम्हीच पाठ फिरवाल.

मिटलेल्या कळचा जर निज दलीं
सौरभ करतिल बंदी,
उमलतांच त्या मरतिल, नसल्या
जर भिजल्या मकरंदीं.

सुकतिल, झडतील, अन् मिळेल मग
सौरभ तुडवियलेला,
आणाल कुठोनी मग वसुधेवर
प्रमोद मधु भरलेला !

केवळ अपुल्यासाठी असते
तेवढेच सुख नाही
इतरांनाही दिसे, सुखावे,
तेच खरें सुख पाही.

निर्जनांत कां एकल्या तुम्हां
मिळतील प्रमोद साचे ?
त्यानें नाहीं फुलावयाचें
हृदय–सुमन कोणाचें.

तुमचा हा एकांत वास्तविक
मर्यादा संसृतिची,
सुख पवनें जी वाढे बनुनी
धारा मानवतेची."

श्रद्धेच्या हृदयि उत्तेजना
पसरे वदतां वदतां,
तिचिया ओठां पडते कोरड
अंतर्दाह सोसतां.

तिकडे मनु घेउन सोमपात्र
वदले वेळ जाणुनी
" श्रद्धे ! घे हें चाख बुद्धिचे
जातिल बांध वाहुनी.

करिन तेंच तूं खरेंच म्हणसी
सुख ना एकलेपणीं ! ”
ही मनधरणी ! अधर थांबतिल
कां मग सोमप्राशनीं ?

नजर मिसळली प्रियकर–नयनीं
भिजले अधर रसानें,
रोमरोमिं चैतन्य उसळलें
धुंद हृदय विजयानें.

छद्मी वाणी करी वंचना
हृदयातिल शिशुतेची,
त्या निर्मल प्रमुतेस घालते
कसली भुरळ भ्रमाची.

जीवनिंचा उद्देश प्रगतिची
दिशा क्षणार्धामध्यें
अपुल्या मधुर इंगितानें जी
बदलवि कपटामध्यें

तीच शक्ति आधार मनोहर
होती देत मनूला
जी अपुल्या तनविक्षेपांनीं
देई सौख्य मनाला.

“ श्रद्धे ! बघ हीं नटली रजनी
सवें घेउनी चंद्रमा,
होई तूंही या जीवनिंची
मम सौख्याची सीमा.

लज्जेचें आवरण झांकतें
प्राणाला अंधारीं,
त्यास अकिंचन करुनी टाकी
‘ तूं मी ’ भेद उभारी.

आनंद उसळतो सार दूर
हीच असे गे बाधा
आपुल्याच सुखीं मस्त होऊं ये
व्यवहार असे साधा."

आणिक घेतां आतुर चुंबन
रक्त रोमि सळसळलें
प्रशांत हृदयीं आग भडकली
तन झालें तहानेलें

दो काष्ठांच्या मीलनांतरीं
ज्वाला त्या गुहेतली,
विझुनी गेली नुरे जागता.
जेवी सुखस्वप्नाली.

• • •

म.रा.सा.सं.मं. ग्रंथालय
प्र 286
9
ग्रंथालय

# इर्ष्या

दोन घडीच्या चचलतेनें
सरला हृदयाचा स्वाधिकार !
श्रद्धेची ती मधुमय रजनी
पसरविते आता अंधकार.

मनूस उरले नव्हतें आतां
मृगयेवाचुन दुसरें काम
मुखीं लागली चव रक्ताची
हिंसा—सुख लालीनें ललाम.

हिंसाच नव्हे, आणिक कांहीं
शोधित होतें हृदय अधीर
फाडुन अवसादा जी वाढे
प्रभुतेची सुख—सीमा रुचीर.

करतलीं मनूच्या होतें जें
तयांत नुरे कांहींच नवीन,
श्रद्धेचा साधा विनोदही
रिझवी न मनूला होइ दीन.

उफाळुनी येते उरातुनी
प्रबळ लालसा दुर्ललित कांत,
तेजाळून इंद्रधनूसम ती
विरोनी स्वयेंच होई शांत.

"निज उगमाचें दार लावुनी
निजतील कुठवरी अलस प्राण ?
चिर चंचल ती हांक जिवाची
रडेल कुठवरी ? कोठें त्राण !

श्रद्धेचा प्रणय आणि त्याची
प्रारंभिक साधी अभिव्यक्ती,
ज्यात नसे आतुर आलिंगन
भासे न कुठेहि कुशल सूक्ती.

भावनामयी ती स्फूर्ति नसे
नवनव्या स्मितरेखेत विलीन,
अनुनय नाहीं, उल्हास नसे
उमलत्या फुलांसम चिर नवीन !

कधी न येई वाणीमध्यें
ज्वानीची सळसळ, अवखळता,
बरसात नुरे नेत्रशरांची
नुरली नवतीची चंचलता.

केव्हांहि बघा दिसते बसली
निवडीत शालिका अविश्रांत !
अथवा अन्नधान्य सांठवितां
कधी न भासे थकली, क्लांत.

सांठवी बियाणें अन् तिकडे
तकलीवरती उमटतें गीत,
सर्वस्व व्यापुनी ही बसली
मम अस्तित्व जाहले अतीत !"

मृगया करुनी मनू परतले
पुढेच होतें गुहेचें दार,
परि आणिक पुढती जाण्याची
इच्छा नव्हती, करिती विचार !

टाकून दिला मृग, धनुहि तसे
मनु बसले होत शिथिल शरीर
अस्ताव्यस्त पडलीं साधनें
आयुध, प्रत्यंचा, श्रृंग, तीर !

" मावळतीची सांज तांबडीं
पडत चालली निस्तेज क्षीण
परि न परतला अजुन शिकारी
आढळली का शिकार नवीन ! "

श्रद्धेच्या मनि भाव उमटती
मंदावते तकली बोटांत,
उदासवाणें मानस होतें
मृदु बटा गुंतती पापण्यात.

केतकीच्या गाभ्याची आभा
मुखीं, नयनी आळसला स्नेह,
नवकृशता थोडी लाजाळू
कंपित लतिकेसम होत देह !

मातृत्वाच्या भारें झुकले
बांधले पुष्ट पयोधर आज,
मृदु कोमल काळचा लोकरिची
कंचुकी खुलविते रुचिर साज.

सोनेरी वाळूतुन वाहे
कालिंदी जणु भरुन उसास
नभगंगेतिल इंदिवरांची
एक पंक्ति वा करिते हास !

फिक्क्या अस्मानी रंगाचें
केलें होतें नवल परिधान,
सोसते मधुर गर्भवेदना
सहज उद्याची जननी महान.

स्वेदकणांसम झळकत होता
भावी जननीचा सरस गर्व,
वन–पुष्पांची वर्षा भूवर
पातलें समीप सुदिव्य पर्व.

पाहिलें मनूने श्रद्धेचें
तें नैसर्गिक विषण्ण रुप,
आशेच्या विपरीत नेमकें
ज्यांत नसती ते भाव अनूप.

कांहींच न वदले परी मनू
चुपचाप पाहती साधिकार,
श्रद्धा करिते मंद मधुर स्मित
जणुं कळले तिज मनुचे विचार.

स्नेहभरानें वदली श्रद्धा—
" भटकलां कुठे दिनभर विराम,
ही हिंसा तुम्हास प्रिय इतकी
हरवी घरादाराचें भान !

काननीं तुम्ही असतां जेव्हां
धावत मृगयेपाठीं अशांत,
मीइथें एकटी वाट बघत
घेते चाहूल, मनीं आकांत !

ढळला दिनकर पिवळा पिवळा
तुम्हि फिरतां होउन रक्तस्नात,
बघा चुंबिती विहग युगलही
अपुल्या शिशूंना निज घरट्यांत !

घरात त्यांच्या किलबिल चाले
परि सुनें आज मम गुहाद्वार !
तुम्हांस सांगा उणें कशाचे ?
बाहेर नेतो कवण विचार ?"

"श्रद्धे ! तुज कांही नसे कमी
परी सतावतो मला अभाव,
विस्मृतसे मधुर कांहीं तरी
जणु करती जातें विकल घाव.

चिरमुक्त पुरुष तो कशास्तवें
घेईल सांग, अवरुद्ध श्वास !
गतिशून्य पांगळा होवोनी
कां बनेल तो निर्जीव रास ?

जेव्हां जड मोह बंधनासम
कसतो प्राणांचें मृदु शरीर,
व्याकुळता आणिक कसण्याची
मग तोडे बंध होत अधीर."

हंसून वदले, "बोलत असतां
झरावें सुरम्य निर्झर–गान,
गानीं त्या उल्हास असावा
प्रमत्त डुलावे ज्यांत प्राण,

आतां कोठे ती व्याकुलता
जिच्यांत पडे सर्वांची भूल,
आशेच्या नाजुक धाग्यासम
तूं या तकलीमधे मशगूल.

कां ? नाहीं तुजला मिळत काय
छाव्यांचे सुंदर मृदुल चर्म ?
कां निवडितेस बीज–वियाणें ?
नाहीं शिथिल मम मृगया–कर्म.

अन् ही पिवळी कांती कसली ?
विणण्याचे कां हे श्रम सखेद ?
हे कोणासाठी ? सांग जरा
दडला असे कवण यांत भेद ?"

"आत्मरक्षणासाठी जर कां
असतील चालत तुमचीं अस्त्रें
समजूं शकत्यें तें कांहींसें
हिंस्रापुढे रक्षिती शस्त्रें.

परंतु जे निष्पाप, जगुनही
        उपकारक व्हावयास समर्थ,
कां न जगावें त्यांनी होउन
        उपयोगी, मज कळला न अर्थ !

चर्म आवरण असो तयांचें
        लोकर भागविल माझे काम,
जगात राहुन धष्ट पुष्ट ते
        दोहुं या तयां, ते दुग्धधाम.

ते न आमुचे वैरी ज्यांना
        पाळूं शकतो अम्ही सहेतू
पशूंहुनी जर श्रेष्ठ असूं, तर
        बनुं या भवजलधीचा सेतू."

"मंजूर नसे मज कालत्रयीं
        सुलभ सौख्य जावें निसटुन,
जीवन संघर्षी आम्हाला
        हरवावें कुणि छळुन छळून.

काळधा नयनांच्या तारकांत
        मला दिसावें मम चित्र धन्य,
माझ्या अंतरिच्या दर्पणात
        उमटावें बिंब तुझे अनन्य.

चालणार ना संकल्प तुझा
        श्रद्धे ! लघु जीवन अमोल,
जें सुख डोले इथें गौरवें
        उपभोगीनच, हा सत्य बोल !

पाहिले न कां कधी सांग तूं
        स्वर्गीय सुखावर प्रलय–नृत्य ?
पुनर्नाश, चिरनिद्रा आहे,
        मग इतका कां विश्वास सत्य ?

ही चिर प्रशांत मांगल्याची
मनात अभिलाषा कां जागे ?
का करिसी स्नेहाचा संचय ?
कुणास्तवें ? इतुक्या अनुरागें ?

हें जीवनिचे वरदान, मला
दे राणी हा प्रेमोपहार !
केवळ माझ्याची चितेचा
तव चित्त सदैव वाहो भार !

मम सुंदर विश्राम बनोनी
आकारा येवो विश्व एक,
ज्यात प्रवाहित मधुमय धारा
लहराव्या लहरी एक एक."

"मी तर आहे एक बनविले
चला बघाया माझे कुटीर,"
असे म्हणत कर धरुनी श्रद्धा
नेई तेथे मनुला अधीर.

गुहेजवळ त्या वनकाष्ठांची
होती कुटी जणु शांतिपुंज,
कोमल लतिका कर गुंफोनी
बनविती जियें घनदाट कुंज.

वातायनेंहि होतीं तेथें
पर्णपुष्पांच्या भिंती शुभ्र,
झुळझुळु वाहत होता वारा
डोकावुन होते जात अभ्र.

कुटीत होता एक पाळणा
नव वेतलतेचा सुरुचिपूर्ण,
भूमीवर घाली रांगोळी
सुमनांचे कोमल सुरभिचूर्ण.

किती गोड होत्या अभिलाषा
तयांत झालेल्या प्रतिबिंबित !
मांगल्याचें गान मनोहर
होतें कोना कोना चुंबित !

मनू पाहती चकित होउनी
गृहलक्ष्मीचें तें नववितान !
परि मना न रुचले, प्रश्न उठे—
'कोणाचें हें सुख साभिमान ?'

स्तब्ध मनू परि श्रद्धा वदली,
"घरटें तर हे झाले तयार
परी न येथें येई अजुनी
किलबिल–रवाची गोड बहार.

जातां आपण दूर जेधवां
मी या इथें राहत्यें बसून,
तकली घेउन सूत कातत्यें
एकांतीं या खोल बुडून.

तकलीच्या आवर्तावरती
माझे स्वरहि घेती आकार—
'तकली ! हळूच घे ग गिरकी
गेले प्रभु खेळण्या शिकार.

जीवाचा मृदु तंतू वाढो
या तुझिया मंजुळतेसमान,
चिरनग्न प्राण दडो त्यांमधें
सौंदर्याचा वाढोच मान.

विणुनी दे तूं या किरणांसम
माझ्या जीवनिची प्रभात,
घेइल झाकुन अपुली गात्रें
ही निर्वसना सृष्टी जिच्यांत.

त्या नेत्रांतिल वासनेवरी
आवरण घाल तूं कांतिमान,
उजळून निघूं दे सौंदर्या
लतेवर फुलल्या फुलांसमान.

या गुहेंत आतां तो अतिथी
पशूसम नसो निर्वसन नग्न,
जडतेंत आपुल्या अभावाचिया
राहूं न शको तो कधी मग्न.'

सुनें न राहिल आतां माझे
लघु जग तुमच्या अनुपस्थितीत,
पसरवीन मी त्याच्यासाठी
पराग केसर मधु सुगंधित.

पाळण्यांत झुलवीन तयांतें
खेळवीन मुख घेइन चुंबुन!
माझ्या छातीशी बिलगुनिया
फिरेल मोदें दरि-खोऱ्यातुन !

मृदु मलयासम नाचत येतां
जावळ भुरुभुरु उडेल त्याचें,
अधरांवर बहरेल तयाच्या
प्रवाळ मधुमय मंद स्मिताचें.

बाळ सोनुला मधु रसनेनें
गोड बोबडे बोलुन बोल,
कुसुम-रजीं मकरंद घोळुनी
मम व्यथेवरी शिंपुन देइल.

त्या निर्विकार नयनांमध्ये
पाहिन मी अपुलें चित्र मुग्ध,
मम नयनींचीं सर्व आंसवें
जातील बनुन मग सुधास्निग्ध."

" वेल तुझी येईल बहरुनी
पसरवीत सुख–सौरभ–तरंग,
मी भटकावें शोधित सुरभी
वनीं बनुनिया कस्तुरि–कुरंग.

शल्य मला हें मुळि न साहवें
पाहिजे मला माझे ममत्व,
या पंचभुतांच्या संसारीं
मी रमण करावें बनुन तत्त्व—

हें द्वैत, अरे ही द्विधा वृत्ति
प्रेमाचे नको दावेदार !
मी कां याचक ? छे, न कदापी
घेइन मागे निज विचार.

दातृत्वानें नकोस अपुल्या
जलद बनोनी वर्षवूं बिंदु,
संचरेन मी या सुख–गगनीं
होऊन कलाधर शरद–इंदु.

चुकुन कधी बघशील मजकडे
नेत्रकटाक्ष स्मिताळ फेकुन,
मायाविनि ! वरदान मानुनी
ना घेइन तो गुडघे टेकुन !

माझ्यावर या दीन कृपेचा
भार लादण्या आपण समर्थ,
ऐसे नकोस समजूं श्रद्धे !
होईल यत्न तो सदा व्यर्थ.

सुखी रहा तूं अपुल्या सौख्यीं
दुःख साहुं दे मला स्वतंत्र
' परवश मन हेची महादुःख '
घोकीन हाच मी महामंत्र.

हा बघ जातो इथें टाकुनीं
साऱ्या संवेदनांचा पुंज
कांटेच मिळोत मला सदोदित
लखलाभ तुला हे कुसुमकुंज ! "

असे वदोनीं, जळत्या हृदयें
गेले मनु, झाला शून्य प्रांत,
' थांब जरासा हे निर्मोही ! '
श्रद्धा म्हणतच राहिली श्रांत.

• • •

## इडा

" कुठल्या गहन गुहेतुन अधीर ।।
प्रभंजनासम निघतो हा प्रक्षुब्ध जीवन महासमीर
घेउनी विकल परमाणुपुंज नभ, अनल, अनिल, क्षिति आणि नीर ।।
भयभीत भिवविती सकलांना भयाच्या उपासनेत विलीन
प्राणी हा कटुता वाटतसे, करितसे जगाला अधिक दीन
नाश, निर्मिती, यांतच मिरवित पदापदाला अपुली क्षमता
संघर्ष कधीचा करतो हा, विरक्त परि सकलांवर ममता
अस्तित्वाच्या चिरधनुवरूनी केव्हांचा सुटला विषम तीर
भेदण्यास कुठले लक्ष्य अधीर ।। "

" पाहिलेत मी ते शैलश्रृंग ।।
जे अचल हिमाने आच्छादित, उन्मुक्त, उपेक्षापूर्ण तुंग
आपल्याच जडतेचे प्रतीक, वसुधेचा करुनी मान–भंग ।।
अपुल्याच समाधीमधे सुखी, वाहत जाती सरिता अबोध
घेउन त्यांचे लव स्वेद–बिंदु हे उभे स्तिमित गतशोक–क्रोध,
नको अशी जड मुक्ति, प्रतिष्ठा, मजला माझ्या या जीवनिची,
मरुतासम निर्बाध गती मज हवी असे माझ्याच मनाची,
जो चुंबुन जातो चराचरां प्रत्येक पदीं कंपन–तरंग
तो जळता गतिमय मी पतंग ।। "

" निज ज्वालेने पसरून प्रकाश ।।
सोडुन आलो जेव्हा सुंदर प्रारंभिक जीवनिचा विकास
कुंजवनातुन, रानगुहातुन, मरु देशि शोधितो निज विकास ।।
वेडा मी, कधि सदय जाहलो ? तोडियल्या ना साऱ्या ममता ?
कधी कुणावर द्रवलो ? केली सर्वांशीच ना प्रतियोगिता ?
वैराणी मम हांक घुमतसे प्रतिसादाचे उत्तर नाही,
झळेसारखा भाजत सुटलो फूल कधीच फुलविले नाहीं.
उध्वस्त स्वप्न मी पाहतसे कल्पना–लोकीं करून निवास
पाहिला कधी वसंत–विलास ! ।। "

" या दुःखी जीवनिचा प्रकाश ।।
आकाशलतेच्या पानावर अपुल्याच सुखें झाला हताश
वाटल्या मला ज्या मृदु कलिका, कांटे ते माझ्या आसपास ।।
दुर्गम पंथे किती चाललों, थांबलों कुठे होउनी श्रांत
हंसती शिखरें उन्मुक्त मला, रडतो मी निर्वासित अशांत
भीषण छाया इथें नाचते नियति–नटीच्या अभिनयाची
पोकळ शून्यत्वीं पदोपदीं जाण बोचते वैफल्याची
पावस–रजनीमधे धावुनी काजवे पकडतां मी निराश
त्या ज्योतिकणांचा करुन नाश ! ।। "

" जीवन रात्रींच्या अंधारा. ।।
नील तरल जलनिधी बनोनी किती पसरला तुझा पसारा
किरण कितितरी चैतन्याचे बुडुन चालले त्यजुन विकारा ।।
मादक भासे तिमिर किती हा, ग्रासतो निखिल विश्वा अभंग
मूर्त होउनी पुन्हा लोपसी, हर घडी बदलता तू अनंग
ममतेची क्षीण अरुण रेखा साकार तुझ्यात ज्योति–कळा
सुवासिनींच्या कुरळ्या अलकीं भांगातिल जणु सोनसळा
तूं निवास विश्राम जिवाचा, मोहघन छायेचा निवारा
हे माया कुंतल संभारा ।। "

" जीवन–रात्रीच्या अंधारा. ।।
अभिलाषेच्या नवधूमासम भटकतोस तू सैरावैरा
अतृप्त लालसा–पीडेचा फुलतो ज्यातुन प्रखर निखारा ।।
यौवन मधुवनिची कालिंदी वाअते चुंबुनी दिगदिगंत
शिशू मनांच्या क्रीडा–नौका खेपा करिती जिथे अनंत
जादुगार नयनिच्या अंजना ! तुझ्यात हसते सुंदर छलना
धूसर रेखांनी नटलेल्या चंचल चित्रांची नव–कलना
या प्रवासिच्या श्यामल मार्गी कोकिळ–स्वर येती आकारा
शिवे प्रतिध्वनि नील अंबरा ।। "

" हा उजाड विराण नगर–प्रांत ।।
सुखदुःखांची परिभाषा जणु भग्नावशेषांसम नितांत
विकृत वक्र रेखांनी अपुल्या भविष्य सांगते इथे अशांत ।।
सुखद स्मृती, अतृप्त भावना होउनिया भिरभिरती विकीर्ण
दुःखी दुर्वासना दबे या ढिगाऱ्यात बनुनी पर्ण जीर्ण
सुन्या सुन्या त्या कोपऱ्यामधे देइ आंचके ममता आता
शुष्क तरुवर मनोभावना अमरलतेसम होती हरिता
जीवन–समाधिच्या अवशेषांवर जळती जे दीपक अशांत
ते स्वयेंच जाती विझुन शांत ।। "

" चाले चिंतन असे, मनु श्रांत ।।
श्रद्धेचा सुखसाधन–निवास सोडुन आले जेव्हां प्रशांत
रस्तोरस्ती भटकत थांबत बघती इथें हा उजाड प्रांत ।।
वाहे सरस्वती वेगाने निस्तब्ध जाहली निशा श्याम
अनिमेष निरखिती नक्षत्रें वसुधेची ती गति विकल वाम
वृत्रघ्नीचा गजबजलेला तटप्रदेश आतां किती सुना
देवेंद्राच्या जयगाथेची स्मृती वाढवी दुःखवेदना
तो पावन सारस्वत प्रदेश दुःस्वप्न पाहतां पडुन क्लांत
चहुंकडे पसरला ध्वंस भ्रांत ।। "

" जीवनिचा घेउन नवविचार ।।
जइं द्वंद्व जाहले, असुरांनीं केला प्राणपुंजेचा प्रचार
तिकडें देव आत्मविश्वासें तारस्वरें सांगती विचार––।।
' मी स्वयेंच आहे चिराराध्य निज मंगल उपासनेत निमग्न
उल्हासाचे शक्ति–केंद्र मी कां जाऊं कुणाला व्यर्थ शरण ?
शक्ति–स्रोत आनंदें उसळत जीवन विकास वैचित्र्यपूर्ण ?
अपुली नवनिर्मिती करोनी ठवितो विश्व हे हरितपूर्ण '
प्राणांच्या सुखसाधनेतची संलग्न असुर करिती सुधार
करिती नियम अति दुर्निवार ।। "

" एक वरित होता तनुपूजन ।।
अपूर्ण गर्वी समजत होता स्वतःसी दुसरा सर्वांगीण
दोघांचा हेका दुर्निवार, दोन्हीं होते विश्वासहीन ।।
तर्कास जोड जर शस्त्रांची, होईल कां न मग घोर युद्ध ?
संघर्ष तयांचा चालतसे ते भाव अहर्निश चिरविरुद्ध
माझ्यात अस्मिता, आत्ममोह, स्वातंत्र्यपूर्ण उच्छृंखलता,
प्रलयभयानें देहरक्षणा पूजा करण्याची व्याकुळता
जुनें द्वंद्व हें नव्या रुपाने मजला करीतसे अधिक करुण
मी खराच आहे श्रद्धाशून्य ! ।।

" मनू तुम्ही श्रद्धेस विसरलां ।।
क्षुद्र धूळ मानुनी झटकिलें पूर्ण आत्मविश्वासमयीला
जीवनतंतूवरी लोंबता जंतू मानिलें तुम्ही जगाला ।।
सुखाराधनीं गेले जे क्षण, सत्य समजलां तुम्ही तयांना
वासनापूर्ति स्वर्ग मानली व्यर्थ दवडिलें तुम्हीं ज्ञाना
विसरला पौरुषाच्या मोहीं नारीलाही अधिकार असे
अधिकार–अधिकारी यांचा समरसतेचा संबंध असे "
अशी गर्जतां करडी वाणी, गगनाला थरकांप जाहला
शूल मनुस जणु वेधुन गेला ।।

' कोण तें ? अरे पुनरपी काम ! ।।
ज्यानें या संभ्रमीं टाकिलें, लुटले जीवनिंचे सुखविराम
साकारल्या पुन्हा त्या घटना, ज्या होत्या उरल्या शेषनाम ।।
वरदान आज विगत युगाचें करितसे कंपित अंतरंग
संतप्त ज्वाळेत शापाच्या जळतसे आज मन आणि अंग '
वदले मनु " मी, आजवरी कां केली केवळ भ्रांत साधना ?
श्रद्धेचा स्वीकार करावा, तूंच ना दिली मला प्रेरणा ?
केला मी स्वीकार, तिनेही निज हृदय दिलें मज अमृतधाम
मग कां न तरी मी पूर्णकाम ? ।। "

" मनु ! तिनें तर तुम्हा दिलें दान ।।
तें हृदय प्रणयपरिपूर्ण सरल, ज्यांत जीवनिचा भरला मान
विशुद्ध चेतनताच ज्यांमधे निज शांत प्रभेनें ज्योतिमान ।।
परि तुम्ही मिळवला असे सदा तिचा कमनीय जड देह मात्र
रूप–जलधितुन भरून घेतलें तुम्हि अपुलें केवळ गरळ–पात्र
अबोध तुम्हीं, अपूर्णतेला आपुल्याच ना समजूं शकलां
देई परिणय ज्यास पूर्णता त्यानेंच तुम्ही स्वयें थबकलां
' माझें कांही हवें' भावना ही पूर्णता संकुचित अजाण
मानस–जलधींचें क्षुद्र यान. ।।"

हो, होण्या अतां तुम्ही स्वतंत्र ।।
खापर फोडुन दुसऱ्यावरती अनुसरतां अपुले अलग तंत्र
द्वंद्वाचा उद्‌गम तर सदैव शाश्वत असतो हा एक मंत्र ।।
शाखांवरती कांट्यांसगें नवनवीं फुलें येति बहरून
निज रुचिने होउन विद्ध तुम्ही हवें तें घेताहांत खुडून
तुम्हीं प्राणमय ज्वालेच्या त्या प्रणय–प्रकाशा ग्रहण न केले
जीवनिच्या भ्रम तिमिरीं केवळ वासना–मत्सरा स्थान दिले
दुखद प्रवर्त्तन आता होइल नियति–चक्राचे एक यंत्र
होइल शापित तव प्रजातंत्र ।।

ही अभिनव मानव प्रजा सृष्टि ।।
द्वैतामध्यें गुंग निरंतर वर्णींची राहो करित वृष्टि
दुर्बोध समस्या घडवोनी रचो अपुल्या मरणाच्या यष्टि ।।
चालो अनंत कलह कलत्र ऐक्य नासुनी वाढोत भेद
अभिलाषित वस्तू पळोत दूर, परि मिळो अनीच्छित दुःख खेद
हृदयें असोत सदा झाकलीं अपुल्या वक्षींच्या जडतेने
ओळख नुरो परस्परांची ठेचाळो जग अंधत्वानें
सकल सुवस्ता समीप असली तरीहि राहिल दूरच तुष्टि
दुःखच देइल संकुचित दृष्टि ।। "

उठावे अविरत नाना रंग ।।
अश्रु–जलधरांनी चुंबावे अभिलाषांचे शैल–शृंग
जीवन–नद हाहाःकारपूर्ण उसळावे पीडेचे तरंग ।।
दिवस लालसामय ज्वानीचे गळोत सुकुनी पानगळीसम
संदेह नवे उठोत त्यातुन संतप्त सदा भयभीतासम
पसरेल स्वकीयांचा विरोध अवसेच्या कृष्ण निशेसमान
ही शस्य श्यामला सृष्टि रमा दारिद्रचे होईल विगत त्राण
बनुन इंद्रधनु दुःख–ढगांतरि बदलेल नर हा अनेक रंग
जणु तृष्णा–ज्वालेचा पतंग ।।

ते प्रेम न राहिल चिर पुनीत ।।
स्वार्थावरणीं मंगल रहस्य दबून बसेल सदा भयभीत
सकल सृष्टि होइल विरहाकुल वाऱ्यावर विरेल करूण गीत ।।
आकांक्षा–जलधीची सीमा होईल निराशा–क्षितिज रक्त
राग–विराग करा सर्वांशीं करुन स्वतःला शतशः विभक्त
बुद्धी करील वैर मनाशी सद्भाव दोघांमधें तुरेल
दाविली तिने जर एक दिशा, मन दुसऱ्याच दिशेने पळेल
रडरडुनी सरेल वर्तमान, रम्य स्वप्नची ठरेल अतीत
हिंदोळे घेइल हार जीत ।।

संकुचित असीम अमोघ शक्ति ।।
जीवनास बाधामय मार्गी जाईल घेउनीं गूढ भक्ति
अथवा अपूर्ण अहंकारी वाटेल रागमयी आसक्ति ।।
नियतिची प्रेरणा बनोनी असीमासही पडेल सीमा
विद्या ज्ञानाचा क्षुद्र अंश बनुनी गाइल अपुला महिमा
होईल सकल कर्तुत्वाची नश्वर छायेसम ललित कला
सातत्य विभागुन क्षणांमध्ये काळ निरंतन दिसेल ढळला
उमजेल ना तुम्हां, कटुतेहुन असतं सदिच्छेत महाशक्ति
होतील विफल त्या तर्क–युक्ति ।।

जीवन जाईल बनुनी युद्ध ।।
त्या रक्ताग्नींच्या वृष्टिमधें जातील वाहुनी भाव शुद्ध
अपुल्या शंकांनी कळवळुनी वागाल तुम्हीं अपुल्या विरुद्ध ।।
सदैव झांकुन तुम्ही स्वतःला दाखवाल निज कृत्रिम स्वरुप
या धरेवरचा बनाल तुम्हीं चालता बोलता दंभ–स्तूप
श्रद्धा सृजनाचें महागूढ विश्वासाची मूर्त माउली
निज नव–निधि सर्वस्व अर्पुनी तुमच्या हातुन गेली छळली
होऊन वंचित वर्तमाना रहा अपुल्या भवितव्यीं रुद्ध
सर्व प्रपंच होवो अशुद्ध ! ।।

तुम्ही जरा–मरणीं नित्य अशांत ।।
आजवरी समजलां जयाला जीवनिचें परिवर्तन अनंत
अमरत्व तेंच विसराल अतां तुम्हि म्हणा व्याकुळुन त्यास अंत ।।
दु:खी शाश्वत चिंतन–प्रतिका ! श्रद्धावंचक अधीर बनुनी
तव संतति ग्रह–रश्मि–रज्जुनें तडफडो फुका भाग्य बांधुनी
'कल्याण–भूमि हा लोक' हीच श्रद्धा रहस्य जाणो न प्रजा
समजुन त्या अतिचारी मिथ्थ्या परलोक वंचनेमागे जा
निराश अपुल्या आशांमध्यें निज बुद्धिवैभवीं राहुन भ्रांत
कराल भ्रमंती सदैव श्रांत ! ।।"

शापवाणी जाहली विलीन ।।
नभ–जलधींच्या विशाल उदरीं जणुं लुप्त जाहला महामीन
मृदु मलय तरंगी फेनोपम तारांगण लुकलुकतात दीन ।।
निस्तब्ध जाहला अखिल लोक तंद्राळू होता विजन प्रांत
निबिड निशेच्या पुंजासमान मनू होते उसासत अशांत
विचार करितीं—"आज पुन्हा मम अदृष्ट तेंच आलें घडून
ज्याचें काळे सावट होते पूर्वी बसले जीवन ग्रासुन
गेलें तें आज लिहून भविष्य ! यातना चालतिल अंतहीन
आतां अवशिष्ट उपाय ही न ।।

करिते सरस्वती मधुर नाद ।।
वाहत होती दरि–खोऱ्यातून निर्लेप भावनेसम अबाध
राहिले उपेक्षित उपल सर्व जेवी ते निष्ठुर जड विषाद ।।
होती प्रसन्नतेची धारा जिच्यामधें केवळ मधुर गान
कर्म निरंतरतेचें प्रतीक चाले आत्मवश अनंत ज्ञान
हिमशीतल लाटा पुन्हा पुन्हा कांठावरती टकरा घेती
आलोक अरुण किरणांचे निज छाया तयांवरी उधळती
अद्‌भुत सगळे ! निज निर्मित पथि चालतो पथिक तो निर्विवाद
पुटपुटतो कांही सुसंवाद ।।

उगवती गातसे मधुर गान ।।
जिच्या प्रांगणीं एक उमललें कमल घेउनी सुवर्ण पराग
परिमळे जयाच्या कळवळुनी श्यामल कलरवा आली जाग ।।
किरणांच्या धाग्यांनी विणल्या उषा–अंचली कंपन अमंद
निर्मितो पहाटेचा वारा दशदिशी पसरण्यास मकरंद
त्या रम्य फलकावरी प्रगटली नवल छवीसम सुंदर बाला
नयनांचें फेडीत पारणें जणुं प्रफुल्ल नलिनांची माला
सुषमा मंडल मंद स्मितानें पसरवी जगावर मधुर राग
झोपला जीवनिचा तम विराग ।।

मोकळे केश जणु तर्क–जाल ।।
विश्व–किरीटासम अति उज्वल शशि–बिंबासम रेखीव भाळ
दो नयनपद्मदल चषक जणू करितात अनुरागें धायाळ ।।
मधुपाच्या गुंजनें भारल्या मुकुल–आननीं खेळतें गान
वक्षावर एकत्र बांधले सृष्टिचे सकल विज्ञान ज्ञान
करात कर्म–कलश वसुधेचा जीवनरस–सारें भरलेला
दुसऱ्या करें विचार–नभाला निर्भय मधु अवलंब दिलेला
होती त्रिदली त्रिगुणी चंचल आलोक वसनही मस्तवाल
चरण चालती धरुनिया ताल ।।

प्राणांची हांक ध्वनीस मुके ।।
जीवन-सर मूर्छित स्तब्ध शांत, पसरले दशदिशीं दाट धुकें
चंचल झुळुकहि आळसावुनी झोपली, जणूं निज वाट चुके ।।
स्वयेंच निज मधु बिंदू पीते मुकुलित कलिका सुप्त मनाची
मधुर मौन, ध्वनि-रुद्ध दिगंतीं, वाणी झाली जागी मनुची
" उजळ स्मिताच्या चैतन्याची सांग कोण तूं सुवर्ण छाया ?"
तंद्रा स्वप्नशृंखला तुटली विखुरे केवळ उज्वल माया
रोमांचित हळुवार स्पर्श तो दे हांक अतीता, परी हुके
नाचतात लहरी पुन्हा निकें ।।

प्रतिभा-प्रसन्न उघडुन आनन ।।
ती वदली, " मी इडा, कोण परि आहां निमग्न येथें आपण ?"
चाफेकळिचीं दलें फडकतीं स्मिते उधळुनी मंगल आनन ।।
" हे सुभगे ! म्हणती मनु मजला, मीं विश्वपथिक साहतो क्लेश "
" स्वागत ! परि हा इथें पसरला विराण सुना सारस्वत देश
होता हाची प्रदेश माझा चंचल बनला भौतिकतेनें
येतील फिरोनी दिन अपुले, मी इथें तिष्ठते या आशेनें."

× × ×

" बघ मी आहे इथें ठाकलों, काय जिवाचें या मूल्यांकन
सांग उघडुनी भविष्य-दालन ! ।।

या विश्व-गव्हरीं इंद्रजाल ।।
रचिले ज्यानें हे ग्रह तारे प्रकाश ताडिता नक्षत्रमाळ
जलधीच्या भीषण लाटेसम खेळतो खेळ तो महाकाळ ।।
मग कां या वसुधेच्या लघुतम प्राण्यास करावया भयभीत
त्या काळाची निर्दय रचना केवळ सर्वनाशाची जीत ?
कां मग मूर्ख आजवर म्हणती सृष्टी तिजला जी नाशमयी
तिचा अधिपति असेल कोणी, अर्त हांक ज्यां ऐकु न येई
सुखधामा वेढून बैसतो सतत विषादाचा चक्रवाल
सोडला कुणी हा पट विशाल ! ।।

दूर शनीचा तो नील लोक ।।
ज्याच्या छायेसमान पसरे वरती खाली हा गगन–शोक
म्हणतात पलिकडे त्याच्याही आहे एक विराट आलोक ।।
तो देउनि निज एक किरण मम स्वातंत्र्य सुदृढ करिल काय
नियतीच्या जाळ्यातुन मुक्ती देण्याचा योजुनिया उपाय ?"

× × ×

"कुणीही असो वदेल हेंची, नरें न अवलंबून रहावें
दुर्बळता सामर्थ्य सांवरुन ध्येयपथावर सदा चलावें
कर न पसरता चला निज बळें, गतिची अभिलाषा ज्यास नेक
त्याचा मार्ग सदैव निर्धोक ।।

तुम्हीच तुमचे साह्यक व्हावें ।।
अव्हेरुन बुद्धीचा सल्ला नरें कुणाला शरण रिघावें ?
विचार आणिक संस्कारांना अन्य उपायच नसती ठावे ।।
ही प्रकृति अति रमणीय सकल ऐश्वर्ययुक्त शोधकविहीन
करण्या तिजला अनावृत तुम्ही कटिबद्ध बना, व्हा कर्मलीन
नियमन–शासन चराचरांचें करित वाढवा अपुली क्षमता
तुम्हीच याचे निर्णयकर्ते–विषमता असावी वा समता
विज्ञानसुलभ ज्ञान असें, नव चैतन्य जडासी द्यावें
यश दिगदिगंतात पसरावे ।। "

हंसले गगन, तो शून्य लोक ।।
ज्याच्या उदरी वसुन नष्टले किती तरी जीवन–मरण–शोक
कितिक उरांची मधुर मीलनें आक्रंदती बनुन विरह–कोक ।।
घेतला मनूने अपुल्या शिरीं अपुलाच भार विषतम आज
उषेस आलें हंसु पूर्वेला, नर आज बघतसे राजकाज
कौतुक बघण्या त्वरें निघाली चंचल मलयाची ती बाला
गालीचीं लाली बघुन तिच्या ओघळती तारांच्या माला
पेंगुळल्या कमलवनीं होती चालू मधुपांची नोकझोक
विसरली वसुधा सगळे शोक ।।

" तमिस्रा जीवन रात्रीतली ।।
तुला पाहुनी तोंड झाकुनी पळतसे क्षितिजाच्या अंचलीं
तू इडे ! उषेसम आज इथें किति उदार होउनी पातली ।।
कलरव करीत जागे झाले मम मनोभावनांचे विहंग
हंसते प्रसन्नता उत्साहें बनोनिया किरणांचे तरंग
अवलंब सोडुनी इतरांचा बुद्धिवाद मी जेव्हां वरिला
सहज निघालों पुढे, तर जणुं खुद्द बुद्धिचा लाभ जाहला
संकल्प बनोत विकल्पांचे, कर्म ही साद जीवनातली
'सुख–साधने असोत परतलीं ।। "

• • •

## स्वप्न

घेउन अरुण जलज केशर तें संध्या रिझवित मन होती,
कोमेजून गळालें केव्हां कमल, कुठे जाणत होती !
क्षितिज भाळिचें कुंकू पुसतो मलीन कालिमा निज करें,
कोकिळ-कूजन उगाच आतां भिरभिरतें कलिकांवरती.

कामायनी कुसुम–वसुधेवर, अतां न तो मकरंद उरे,
रेखाचित्रच उरलें हातीं, त्यांत एकही रंग नुरे !
प्रभातिचा तो कलाहीन शशि, किरण कुठे कुठे चांदणी
ती सांजच, तारे रवी शशी यांचा मागच जिथें नुरे !

जिथें कोकनद इंदीवर वा श्वेत शतदलें मगरळलीं,
ती पुष्पकरणी श्रद्धा होती, जिथें न मधुप–दलें आलीं
मेघावली जींत तडिता वा श्यामलतेचें नांव नसे,
ती शिशिर–कलेची क्षीण धार गोठून जाइ जी हिमतलीं.

निर्जनतेची मौन वेदना, किरकिर ना रातकिडयांची,
जगताची अस्पष्ट उपेक्षा कळ आकारा ये साची,
केवळ हरित–कुंज–छायाची देइ धरेला आलिंगन,
ती विरहनदी एक सानुली, पैल थडीच नाहीं जिची.

विहगबालिकांसमान किरणें नील नभीं उडतां उडतां,
थकुनी चालली स्वप्नलोकीं मिळवण्या जरा निवांतता,
विरहिणीच्या जीवनांत परी एक क्षणही विश्राम नसे,
सौदामिनी स्मृतीची चमके तम घन अंधारुन येतां.

संध्यानील सरोजातुन जें श्याम पराग गळत होते,
गिरि खोऱ्यांचें आंगण–प्रांगण हळूच ते भारित होते,
तृण गुल्मांनी रोमांचित नग ऐकतात करुण कहाणी
श्रद्धेच्या सुन्या निश्वासांत जे निज स्वर भरीत होते—

" जीवनात सुख वा दुःख अधिक, मंदाकिनी  सांगशिल कां ?
नभि नक्षत्रें अधिक, सागरीं वा बुडबुडे, मोजशिल कां ?
तुझ्यांत प्रतिबिंबे ताऱ्यांचीं, सिंधु–मीलना निघालीस,
वा दोन्हीं बिंबें एकाचीं हें कोडें उलगडशिल कां ?

आवकाशाच्या या पटावरी चित्रें जीं बनतीं पुसतीं,
तयांत असती रंग किती जे सुर–धनुतुन गाळुन येती,
परी सकल अणु क्षणात विरुनी व्यापक निळचा शून्यतेसम
जगताचें आवरण, वेदनेचा धूसर पट हा विणती.

दग्ध उरातुन आंच न उठते सजल आवसीं आज इथें
अगणित स्नेह जाळुनी जळतो जसा असे लघु दीप कुठे ?
विझो न ती संध्या–किरणांसम दीपशिखा या कुटीतली
बरवें शलभा समिप अन्यथा, सुखें एकटें ज्वलन इथें !

आज ऐकणें मौन होउनी कोकीळ वदो काहींही,
परी परागांची पूर्वीसम धमाल ती उरली नाहीं,
पानगळीची सुनी फांद ही आणि प्रतीक्षेंची संध्या,
कामायनि ! तूं कर कठोर मन हें सर्व हळुहळू साही !

विरल निकुंजें सकल टाकिती दीन उसासे दुःखाचे
त्या स्मृतिचा समीर वाहतसे, मिलन कथा मग कुणा रुचे ?
गर्विष्ठ विश्व जणु रुसत असे कुठल्याहि अपराधाविना
नेत्रदलांची आसवांजली पद प्रक्षाळील कुणाचे ?

अहो मधुरतम, कष्टपूर्णही, जीवनिचे क्षण गेलेले !
जेव्हां अनाथ होउन कोणी जोडी दुवे विखुरलेले,
निज चिर–सुंदरतेत जाहलें होतें जें एकलें सत्य,
तें दडें, मग कसे सुटावे सुखदुःखाचे गुंताळे !

विसर पडो त्या गत गोष्टींचा सार ज्यांत नुरले कांहीं,
ती छाती नुरली धगधगती, शांत प्रेम उरलें नाहीं,
होत चालल्या लीन अतीतीं आशा, सुमधुर अभिलाषा,
निष्ठुर विजय प्रियाचा झाला, परि मम हार खचित नाहीं !

आलिंगने तीं पाशच होतीं, स्मित होतें जणुं गगनलता,
आणि मधुर विश्वास खरोखर भ्रमित मनाचा मोहच होता,
आज कुठे तें ? वंचित जीवन ! समर्पणाचा दंभ फुका,
कधी तरी अर्पियलें कांहीं हेंच उरे अनुमान अतां !

प्राणांचा विनिमय हा कसला व्यवहार अहो भीतीचा !
देशिल तितकें दे खुशाल तूं, घेणें हा भाव फुकाचा !
प्रतीफळाची तुच्छ अपेक्षा पूर्ण कधी ना व्हायाची,
रवि देउन संध्येस लाभतो भव्य व्याप नक्षत्रांचा !

घेवोन फुलांच्या ताटव्यातुन गोड गुंजन इंद्रजालें,
अरुण अंचलातून नभाच्या हंसत हंसत जे दिन आले,
पसरली स्मितांची जइं माया क्रीडेने चंद्रकलेच्या,
येऊं ही भुलथाप देत ते कायमचे निघून गेले !

मधुर शिरीष सुगंधें भरल्या जइं ऋतुरात्री मानिनी,
जागृतिचे आघात न साहुन रक्त–मुखें जाती रुसुनी,
गोड गोड आलाप–कथेसम गगन–अंचलीं दिन पसरतो,
उडुगण रुपें स्मित करितीं तइं मम स्वप्नें जाग येउनी. "

वनबालांची कुंज–निकुंजे सगळी वेणु रवें भरलीं,
हांक घराची ऐकुन सृष्टी होती त्वरेनें परतली,
परि न परतला तो परदेशी प्रतीक्षेत लोटलीं युगें,
रजनीच्या ओल्या नयनांतून दंव–वृष्टी होउं लागली.

मानस–कमळ स्मृतीचें उमलें, मकरंदाचे सर ओघळती,
टणक पारदर्शी मोती हे यांत किती चित्रें नटतीं,
भोळे अश्रु, तरल तडिता कण, विरह–तिमिरीं नयनालोक,
पाथेय घेत हें, प्राण पथिक जगत कल्पनेचें रचितीं.

कोकनदांचे शोण कोण नव तुषारकणांनी भरले,
कलिका होतीं चूर्ण घेउनी बिंबांचें विश्व सानुलें,
स्मित प्रेमळ तें अनुरागाचें जातें झोपायास तमीं,
वर्षा–विरह–आवसीं स्मृतिचे जळति काजवे म्यालेले.

सुन्या गिरिपथीं ध्वनी निनादे गंभीर श्रृंगनादाचा,
दुःखसरितेच्या कांक्षा-लहरी घेती आश्रय वाळूचा,
नभ–दीप लागले, अभिलाषा–शलभ त्यावर झेप घेती,
तरारले नयनीं पाणी परि ज्वाळ विझे ना ज्वालेचा.

"आई"—उठली हांक एक मधु दुमदुमली ती कुटी सुनी,
लगेच जननी धाव घेतसे शतगुणित उत्कंठा मनीं,
कुरळे केस, धुळीनें भरल्या सान दोन भुजा विलगल्या,
रजनी तपस्विनीची झाली जागी पुन्हा विझती धुनी !

"होतास खटयाळा ! कुठे सांग तूं प्राक्तन माझे बनुनी,
अरे पित्याच्या प्रतिका ! तूंही दिलेस सुखदुःख मिसळुनी,
चंचल तूं या वन–हरिणांसम स्वच्छंद उधळतो जेव्हां,
कशी करूं मी तुला मनाई, मी भीत्यें जाशिल रुसुनी !"

" रुसेन मी, तूं कर मनधरणी, किती बरवी कल्पना ही,
घे, आई ! हे मिटले डोळे, बोलणार बघ मी नाहीं,
भरलें पोट रसाळ फळांनी, उघडणार ना झोप अतां."
चुंबन घेता प्रसन्न श्रद्धा, सवेंच मनिं विषाद कांहीं.

लघु जीवनिंचे मधुर मधुर क्षण हलकेच प्रज्वलित होती,
मुक्त उदास नभाच्या हृदयीं फोड बनोनी ठसठसती,
दिवा–श्रांत तेजाचीं किरणें नीलनिलयीं लपलीं कुठे,
तोंच करुण स्वर क्षीण होउनी जाई विरुनी या जगतीं.

प्रणयरश्मिचें कोमल बंधन मुक्ति बनोनी वाढतसे,
दूर तरीही क्षणाक्षणां तें हृदय किती समिप गमतसे !
मधुर चांदण्यासमान तंद्रा धुंद मना झांकी जेव्हां,
अभिन्न प्रियकर तेव्हां त्यावर अपुलें चित्र चितारितसे !

कोमल कुसुमदलांनी होतें अंकित जें वाऱ्यावरती,
कामायनि निज सर्वस्वाचें सुखस्वप्नच तें पाहत होती,
युगायुगाची विकल प्रतारित जणुं पुसलेली ती लेखा,
हांक चातकाची बनोनिया नभीं रेघ उमटत होती !

इडा अग्निज्वालेसम पुढती जळत असे उल्हासांनी,
मार्ग मनूचा उजळवीत ती विपदनदीं झाली तरणी,
उन्नतिचें आरोहण, महिमा गिरिश्रृंगासम श्रांति नसे,
तीव्र प्रेरणेच्या स्त्रोतासम वाहतसे उत्साहांनी.

ती सुंदर आलोक–रश्मिसम अन्तर्भेदी दृष्टीनें,
पाही जिकडे, पंथ उघडतीं ग्रासले जयां तिमिरानें,
मनुच्या संतत साफल्याची ती विजयी तारा होती,
होते दिले श्रमोपहार निज आश्रय–व्याकुल जनतेने !

वसले सुंदर नगर मनूचें सकल जाहले सहकारी,
कोट उभा दृढ, आंत जाहली भवनांची दाटी भारी,
तिन्हीं ऋतूंत निवाऱ्याचीं तीं सर्वच लाभलीं साधनें,
स्वेदकणांचे मोती लेवुन नांगर फिरवी शेतकरी.

धातू वितळुन घडण चालली अलंकार वा शस्त्रांची,
कुणीं साहसी घेउन येती भेट नवनव्या मृगयेची,
माळिणी वेंचती पुष्पांच्या अर्धोन्मीलित नवकलिका,
गंध–चूर्ण अन् लोध्र–कुसुम–रज लयलुट या प्रसाधनांची.

एकीकडे उठे कर्कश ध्वनि प्रचंड घण–आघातांचा,
तर तिकडे हृदयास मोहवी मधु स्वर–विलास रमणींचा,
वर्ग बनवुनी आपआपुले परिश्रमांचे सत्र चाललें,
त्यांच्या त्या श्रमदान प्रथेनें प्रकाश वाढे पुरश्रीचा.

देश–काल वाटती लघु तयां भारी चंचल तडफ असे,
सुखसाधनें जमविती सगळीं जें जें त्यांच्या जवळ असे,
परिश्रमाच्या सामर्थ्यानें वाढले ज्ञान, उदीमही,
मानव–यत्नें वरती येई जें जें धरती–तळीं असे.

रक्षिलें मनूनें प्रलयीं जें जें त्यांची दुनिया नटली,
सृष्टि–बीज अंकुरले, फुलले, धनधान्यें फळास आलीं,
आज स्वचेतन प्राणी अपुल्या कुशल नव्या कल्पकतेनें
स्वावलंबनाच्या धरणीवर निर्भय उभा, भीती सरली.

मलय बालिकेसमान श्रद्धा त्या अद्भुत जगीं पोंचली,
वेस–रक्षकां हूल देउनी सिंहद्वारें नगरीं शिरली,
उंच उंच गुढया तोरणें, तसे रम्य प्रासाद उभे,
धूप–धूम दरवळे, गृहातुन आभा ज्योतींची खुलली.

स्वर्णकलशमंडित भवनांच्या प्रांगणात फुलल्या बागा,
प्रशस्त वाटा अधुनी मधुनी, कोठें कुंजांच्या रांगा,
त्यांत जोडपीं मुदें विहरतीं, गळा घालुनी प्रणयमिठी,
चाले गुंजारव मधुपांचा मदिरा–मोद मनीं जागा !

देवदारुच्या उंच तरु-भुजीं गुरफटती समीर तरंग,
सजिव अलंकारासम कलरव करिती चारू बालविहंग,
वेळु–वनातुन शीळ निघे जी सुस्वर आश्रय तिज लाभे,
नागकेशरी ताटव्यांतुनी खुलती कुसुमांचे नवरंग.

सिंहासनासमोर मंडपीं कितीक मंचकें मांडलीं
सुंदर सुंदर चर्मांनी जी कौशल्यें होतीं मढलीं,
आल्हादपूर्ण गंध दरवळे शैल–सुगंधी धूपाचा,
श्रद्धा विचार करिते स्वप्नीं ' आल्यें मी कवण अंचलीं ?'

आणि तिनें पाहिलें समोरी चषक घेउन निज दृढ करीं
मनु, तो ऋतुमय पुरुष ! तेंच मुख संध्या–लालिमा ज्यावरी,
मादक भावें समोर सुंदर चित्रासम हें कोण इथें
बघावयाला ज्याला जीवन मरमरून पुन्हा जनन वरी ?

ओतीत होती आसव इडा, तृषा न ज्यानें कधी शमे,
यथेच्छ प्राशुनही कंठाचा ज्यात लव न विश्वास रमे,
वैश्वानर–ज्वाळेसमान ती मंचाकवरी बैसोनी,
सौमनस्य विखुरविते शीतल जडताभास मुळी न गमे.

मनु विचारिती, " करावयाचें आहे कां उरलें काहीं ? "
इडा म्हणाली, " येइल कैसे फळ कर्मातें लवलाही !
वश झालीं कां सकल साधनें ?" " नाहीं, रिक्तच मी अजुनी,
देश वसविला, परंतु माझी उजाड मानस–नगरी ही.

सुंदर वदन, नयनिंची आशा, झाले हे परि कवणाचे,
चंद्रकोर जणूं प्रतिपदेची, व्यक्तविते रोष मनाचे,
मानभंग करण्याचा लव अनुनय खुणावतो नयनांमधुनी,
बोल बोल माझ्या चेतनते ! तूं कुणाची ? हें कुणाचें ? "

" प्रजा आपुली, प्रजापती मी सर्वांचाच तुम्हां गणित्यें,
मग संदेह कशास्तव ऐसा, नवा प्रश्न आज ऐकत्यें. "
" प्रजा नव्हे, तूं माझी राणीं, भुलवूं नकोस मज आतां,
मधुर मराळी ! बोल–' अतां मी प्रणय मोती वेंचत्यें. '

माझ्या धूसर भाग्याकाशीं स्वर्णपटासम प्राचीच्या,
प्रगटलीस तूं स्वयें अचानक उधळित ओंजळी प्रभेच्या,
मी अतृप्त आलोक–भिकारी, हे प्रकाशबालिके सांग,
केव्हां शमेल तृषा आमुची रसात या मधु अधरांच्या ?

ही आमोद–साधनें आणिक चंदेरी रात्रीची छाया,
स्वर–संचार दिगंती गुंजे, मन उन्मत्त, शिथिल काया,
तर तूं प्रजा बनु नको राणी." जागा जाहला नरपशू,
आणि पसरली मदिर घटेसम अंधाराची घन माया.

आलिंगन ! अन् भय आक्रंदन ! वसुधेला भरे कांपरें !
त्या अतिचारीं दुर्बल नारी परित्राण–पंथास वरे !
महारुद्र हुंकारे व्योमीं माजे उत्पात भयानक,
शाप बने पाप–परिभाषा ! मनु–आत्मजा प्रजा अरे !

वरती गगनीं क्षुब्ध जाहल्या देवशक्ति त्या क्रोधाने,
रुद्र–नेत्र उघडला अचानक नगर व्याकुळे भीतीनें,
प्रजापती बनला अतिचारी शिवच रहावे देवांनीं ?
छे, म्हणुनीच चढे शिवधनुवर प्रत्यंचा ती सूडानें !

सृष्टि गांजली, भैरवनाथें तांडवार्थ चरण उचलला,
सकल चराचर भूत–सृष्टिचा महानाश होऊं घातला,
आश्रयार्थ तळमळती सगळे, कलुषीं स्वतः मनु संदिग्ध,
घडणार पुन्हा कांहीं मानुन देह धरेचा थरथरला !

प्रलयावेगें चळचळ कांपत सर्वच शंकाकुल जंतू
जो तो करितो अपुली चिंता, छिन्न जाहला स्नेह–तंतु,
प्रजा–रक्षणीं दक्ष अहर्निश ती सत्ता लोपली कुठे
इडा क्रोध–लज्जेने तेथुन बाहेर चालली परंतु.

पाहिलें तिनें व्याकुळ जनता राजद्वार उभी अडवुनी,
प्रहरीगणही वरमुन गेले शुद्ध भाव न त्यांचे मनीं
नियमन वृत्ती दबे जराशी, हटावें वा परतावें !
आज प्रजा ही पार बदलली जी राहिली अनुगामिनी !

कोलाहल भोंवती माजला, मनु दडुनी विचार करिती,
द्वार बघोनी बंद, प्रजेचे सकल धैर्य संयम विरती,
शक्ति–तरंगीं प्रबल प्रकंपन, रुद्र–क्रोध भीषण झाला,
महानील लोहित ज्वालेच्या नर्तन लहरी धगधगती.

ती विज्ञानमयी अभिलाषा पंख लावुनी उडण्याची,
जीवनिंची असीम आकांक्षा कधीं न कोठे झुकण्याची,
अधिकारांची दुनिया आणिक त्यांची मोहमयी माया,
वर्गांची जाहली दरी, ती कधीं न आतां बुजायची !

अपेशी मनू क्षुब्ध जाहले, आकस्मिक बाधा कैसी !
झालें काय कळेना, जमली प्रजा कशास्तव ऐसी !
परित्राण–प्रार्थना कळवळे, सुर–क्रोधें द्रोह माजला,
इडा असे कीं तेथें ! स्पष्टच तो घटना–कुचक्र जैसी !

" 'बंद करा ती द्वार–कवाडें, यांना आंत न येऊं द्या,
निसर्गांत उत्पात होतसे, मजला थोडें पहुडूं द्या."
क्रोधें ऐसे वदोनिया मनु शयन–मंदिरास चालले,
जुळवित जमाखर्च जीवनिंचा, मनिं भय ' होते काय उद्या ! '

श्रद्धा घाबरलीं स्वप्नांतरिं, दचकुन येई जाग तिला,
मी काय पाहिलें आतां ? तो इतका का कपटी बनला ?
स्वजनप्रेम पापशंकी किती, काहुर उठते भीतीचें,
होइल काय अतां ही चिंता ग्रासुन टाकी रजनीला.

• • •

# संघर्ष

श्रद्धा बघतें स्वप्न, परि तसें घडलें होतें
इडा संकुचित, लोक अंतरीं क्षुब्धच होते.
भौतिक अनर्थ बघुन विकल ते घाबरती
नृपचरणीं परित्राण तयांची मनें मागती.

परी मिळे अपमान आणि दुर्वर्तनहि तसे,
मनस्तापें सकलां हृदयीं रोष होतसे.
क्षुब्ध निरखिती तनू इडेची पिवळी पिवळी,
तिकडे तांडव नृत्य सृष्टिचें अग जग ढवळी.

अपार दांटी होत पातले सर्व प्रांगणीं
प्रहरी होते दक्ष द्वार तें बंद करोनी.
निशा घन तिमिर पटीं हलकेच लपुनीछपुनी
पुन्हा पुन्हा प्रगटते मेघज्योति लवलवुनी.

मनु चिंतित कांहिसे मंचकीं, विचार करितीं
क्रोध आणि शंका उरिंचे लचके तोडिती.
" मी ही प्रजा रचुनी खरोखर तुष्टच होतो,
सांगावें परि कधि मी यांवर रुष्टच होतो !

कितीं जवें लावियलें यांचें चक्र फिराया
भिन्न भिन्न हे एक होइ परि यांची छाया !
नियमनार्थ मी बुद्धिबलानें प्रयत्न करुनी
राज्यशकट हांकितो विविधतम नियम बनवुनी.

मीदेखिल परि विनिमय सगळे कां मानावे ?
लवहि न मी स्वच्छंद, स्वर्णसम सदा झिजावें !
माझींच असे जी सृष्टि तिची मलाच भीती,
हक्क न मज उन्मुक्त करावी मी निज वृत्ती ?

श्रद्धेचा अधिकार समर्पण दिलें न परि मी,
प्रतिपल गेलो पुढे, थांबलो तिथें कधी मी !
इडा नियमपरतंत्र पाहते करण्या मजला
अनिर्बन्ध अधिकार मुळी ना मान्यच तिजला.

विश्व एक बंधनविहिन परिवर्तनच असे
गतींत त्याच्या रवि, शशि, तारे, हे सर्व कसे—
रुप बदलती, सदैव वसुधा जलनिधि बनते.,
उदधि बने मरुभूमि, सागरीं ज्वाला जळते.

तरल अग्निची शर्यत चाले सकल अंतरी
वितळुन स्रवती हिम–नग–सरिता सहज भूवरी.
स्फुल्लिगांचे नर्तन क्षणभर आलें गेलें !
स्थिरावण्यासी इथें कुणाला कधी फावलें ?

असंख्य तारे अनंताचिया महान विवरीं
लास्य रास रचतात लोंबुनी या अधांतरीं.
पवनाच्या थरांमधून किती लहरी उठती
हे असंख्य चीत्कार आणिक परवशता किती !

हें नर्तन उन्मुक्त जगाचें स्पंदन द्रुततर
गतिमय होत चालले धरूनी अपुले लय स्वर.
कधी कधी आपणां दिसे तें पुनरावर्तन
त्यासच म्हणती नियम चालतें ज्यानें जीवन.

रुदन हास बनतें परि नयनीं तें तरारतें
प्राण पांखरू फडफड करुनी मुक्ति शोधतें.
जीवनात अभिशाप, ताप हा शापात असे,
विनाशात या सृष्टि–कुंज हें हरित होतसे.

'विश्व बद्ध हे एका नियमें', धृती जणूं ही
प्रचारामुळें आज व्यापिते जन हृदयें हीं.
नियम पारखुन यांनी गणिलें तें सुखसाधन
शासित असावे नियामक हे मज मंजूर न.

मी चिरबंधनमुक्त मृत्यु–सीमा उल्लंघुन
संतत जाइन पुढे असे हा माझा दृढ प्रण.
महाविनाशाच्या सृष्टित या जे क्षण अपुले
चैतन्याचा तोष तोच, मग स्वप्नच सगळे.

प्रगतिशील मन थबकले जरा कूस बदलुनी
इडा पुन्हा अविचल सामोरी सर्व देउनी !
आणि वदतसे–" नियामकच जर नियम न पाळिल
निश्चित जाणा सर्वस्वाचा विनाश होइल ! "

" आँ ! तूं आज इथें ही पुनरपि कशी पातली,
कुठल्या नवीन उपद्रवाची माया रचली ?
आज पोंचलें सर्व कांहि हें ज्या थरावरी
संतोष न कां ? काय राहिलें आहेच करीं ? "

" मनु, सकलांनी सदैव तुमचे स्वत्व जपावे
अन्य सौख्य संतोष तयांना कधी नसावे !
हे, प्रजापती ! असें न घडलें, घडेल न कधीं
अनिर्बन्ध अधिकार भोगला इथें कुणि कधी ?

हा मनुष्य आकार चेतनेचा नव विकसित
एक विश्व अपुल्या आवरणीं आहे निर्मित
संघर्ष तयांच्या अंतरात सतत चालतो
द्वैताची भावना सदा जो मनात भरतो—

विसरून तया हे ओळखिती आतां स्वतःस,
राहुन समीप जोडत जाती नित अनेकांस.
स्पर्धेमाजी उत्तम ठरतिल, तेच उरावे
त्यांनी जगकल्याण करून शुभ पथ दावावे.

व्यक्तिचेतना म्हणोनीच परतंत्र कांहिशी,
रागपूर्ण, परि द्वेष–पंकि नित बरबटलीशी,
ठरल्या मार्गी पदापदावर ठोकर खाते,
थकून भागुन निज ध्येयाच्या समीप जाते.

हा जीवन–उपयोग हीच ती बुद्धि–साधना,
ज्यांत आपुलें श्रेय ती खरी सुखाराधना.
घेतिल आश्रय सुखी होत जन जर त्या छायीं,
प्राणांसम तर रमा तुम्ही त्या स्वराष्ट्र–कायीं.

काळ प्रवाहीं देशकल्पना स्वयें लोपते,
चिरचैतन्यीं कालचक्र निज क्षया शोधते.
तें अनंत चैतन्य नाचते उन्मादाने
तुम्हीहि नाचा निज विस्मरणीं द्वैतबुद्धिने.

क्षितिजाचा पट उचलून शिरा मह्य विवरात,
घननादाचा निनाद ऐका विश्व–गव्हरात.
ताल धरोनी चला, चाल ही लय ना सोडो
नकळतही उरवीणा बेसुर स्वर ना छेडो."

"अस्से ! तर मग नकोच आता समजविणे तुज,
प्रेरणामयी तूं किति असशी कळले बघ मज.
आजच जावोनिया परंतु परतलीस ना,
कैसे सुचले तुजला ऐसे साहस करण्या !

अधिकार अटळ प्रजापतीचा हाय हाच कां ?
घेणे हें पाप ठरावे ? मी साहावें कां ?
दिलेस कां प्रतिदान कुणाला, सांगशील तूं ?
पाजित केवळ ज्ञानच मजला जगशिल ना तूं ?

हवें मला जें तेंच नसे जर पदरीं पडलें
घे मागे ते बोल व्यर्थ तूं जे जे वदले !"

× × ×

"इडे ! मला तें सर्व पाहिजे जें चाहिन मी
तुजवर सत्ता नसे तर वृथा प्रजापती मी !
तुज पाहुनिया सकल बंधनें जाती तुटुनी
जनसत्तेची, अधिकारांची हाव ना मनीं.

या दुर्धर्ष सृष्टिचें सगळे भयाण प्रकंपन !
परि या हृदयापुढे तयाचें क्षुद्रच स्पंदन !
कठोर हें, तो प्रलय खेळहीं हंसुन खेळले !
अतां एकल्यापणीं परि किती कोमल बनलें ?

आहे जग लय एक, लीन मी व्हावे तिच्यात
म्हणशी तूं ? परि सांग, सुख कुठे आहे अशात !
आकांतांचे एक अलग आकाश रचिन मी,
रोदनीं त्या असेल निग्रह तुज मिळविन मी !

पुन्हा उफाळो उदधि आपुली सीमा सोडुन !
वज्रगतीनें झंझा उसळो मन जन ढवळुन !
डगमगत पुन्हा तरणी जावो लहरींवरुनी,
रवि, शशि, तारे, सावध होवो पुन्हा दचकुनी.

परंतु राही जवळी माझ्या, मम राणी तूं
खेळणें न मी, नको खेळूस खेळ असा तूं !"

" सद्विचार माझे रुचती ना कसे तुम्हाला,
उत्तेजित झाल्यानें मुकतां तुम्ही ध्येयाला.
क्षुब्ध प्रजा बाहेर उभीसे, शरणागत ती,
क्षणाक्षणाला भयकंपित नित होत प्रकृती.

सावधान ! मी शुभाकांक्षिणी, अन्य न कोणी
सांगायाचें सांगुन चुकल्ये, जाऊं निघुनी ?"

"मायाविनि ! बस एवढ्यात तूं घेशी सुट्टी,
भातुकलीतिल पोरें जेवी करिती कट्टी !
मूर्तिमंत अभिशाप बनुन तूं सन्मुख आलिस,
संघर्षाची भूमिका मला तूंच दाविलिस !

रक्तस्नात या वेदीमधल्या भीषण ज्वाला,
विमोचनाचा उपाय त्यातुन तूंच शिकविला !
चार वर्ण जाहले विभागुन परिश्रमांना,
शस्त्रें यंत्रें बनलीं, ज्यांची नव्हति कल्पना !

आज शक्तिचा खेळ खेळण्या नर आतुरला,
संघर्ष नित्य प्रकृतिसंगें, भीति कशाला ?
नियमांची ती बाधा आता नकोस आणूं
या हताश जीवनीं सुखाचे क्षण दे आणूं,

राष्ट्रस्वामिनी ! हें घे सगळे वैभव अपुलें
केवळ तुजला सकल उपायें म्हणुं दे अपुलें !
हा सारस्वत देश समज तूं ध्वस्त पुन्हा कीं
अग्नीच स्वत: तूं अन् हे सगळें धूम्रपटल कीं !

" विसरुन मम कर्तृत्व मनु, अतां ऐसे न म्हणा
मिळालें तुम्हां त्यांत एवढा गर्व न माना !
प्रकृतिसंगें संघर्ष तुम्हां मीच शिकविले
केंद्र बनवुनी तुम्हांस, अनहित मी ना केलें !

आज तुम्ही आहांत जियेच्या अंतर्यामी
त्या विखुरित सृष्टिचा तुम्हां मी केले स्वामी.
परी तोच अपराध आमुचा आज ठरतसे
हों शी हो न लावतां भीषण गुन्हा घडतसे !

मनू ! पहा चालली लोपुनी श्रांत निशा ही,
उदयाचलीं जिंकिते तमाला अरुण उषा ही.
अजुन न गेली वेळ, मजवरी विश्वास धरा,
स्थिरावेल हें क्षणांत सगळें धीर लव धरा. "

आणि प्रमादाची ती घटका पुन्हा पातली,
महालद्वाराकडे त्वरेनें इडा निघाली.
आलिंगन पाशात परी मनु घेती तिजला !
बावरल्या हरिणीसम राही बघतच अबला !

" हा सारस्वत देश तुझा तूं याची राणी
वागतसे स्वच्छंद मला निज अस्त्र करोनी !
कपट हें अतां जाण पांगळे चालायातें
अपुल्या जाळयातून मान तूं मुक्तच मातें !

आतां सहजच शासन–प्रगती कुंठित होइल,
पराधीनता आतां मजला असह्य होइल.
मी शासक, चिरस्वतंत्र मी, तुजवरही माझा—
अधिकार असावा, जन्म सफल होवो माझा !

छिन्नभिन्न होऊन अन्यथा पळापळाला,
सकल व्यवस्था बघ ही जाते रसातळाला.
दिसतें वसुधा अति भीतीनें पावे कंपन,
ऐकूं येतें आणि नभाचें निर्दय क्रंदन !

आज परी तूं पूर्ण बंदिनी मम करपाशीं.
मम छातीशी. . ." शेष निमालें सर्व उसासीं !
सिंहद्वार करकरलें, जनता आंत पातली,
"हे सम्राज्ञी !" एकच ऐसी हांक उसळली.

निज दौर्बल्यीं मनूस होती धाप लागली,
स्खलन–विकंपित चरणांची थरथर न थांबली.
सावध मनु निज वज्रदंड घेऊन तेधवां
गरजुन वदले,– "ऐका, त्रिवार ऐकून ठेवा—

सकल तृप्तिचीं सौख्यसाधनें तुम्हां दाविलीं,
मीच विभागुन श्रम वर्गांची सोय लाविली.
प्रकोप निसर्गाचे आपण सोशित होतों,
थोडाही प्रतिकार न करतां, मौनच होतों !

आज परंतु नुरलों आपण पशू, वनचरें,
काय तुम्हां या उपकारांची स्मृतीही नुरे ?"
वदले मनीं डोंब उसळुनी क्रोध–दुखाचा—
"बघा बघा हो, आज पातकां फुटली वाचा !

योगक्षेमाहुनी अधिक तूं सांठवण्याचा
लोभ शिकवुनी दिला जाच हा नवविघ्नांचा.
संवेदनक्षम अम्ही जाहलो, हेंच मिळे सुख,
जाणुं लागलों कष्ट बनवुनी निज कृत्रिम दुख !

प्राकृत बल सकलांचे हरलें तूं यंत्रांनी !
जर्जर केले सारे जीवन शोषण करुनी !
आणि इडेवर असला अत्याचार कराया
जन–जीवावर काय पोशिली अपुली काया ?

आज बंदिनी अमुची राणी इडा या इथें
सांग यायावरा ! आतां, तव निस्तार कुठे ?"

" म्हणजे एकाकी मी पुनरपि या रणांगणीं—
घेरलें आज मज प्रकृतिच्या या पुतळ्यांनी !
ठीक ! साहसी विक्रमचिन्हें बघा निज तनीं,
राजदंड हा बघा होतसे वज्र त्रिभुवनी ! "

ऐसे वदुनी मनुने भीषण अस्त्र उचललें
' सुर–वन्हीतुन' त्याच क्षणाला डोंब उसळले !
शर सुटती अति तीक्ष्ण भयानक धनुषावरुनी,
जणु तुटती नभ–धूमकेतु शतरंगांनी !

वाढे रणधुमाळी, खवळली प्रजादलें तीं
समर पावसीं शस्त्रास्त्रांच्या विजा चमकती.
क्रूर मनू परि वारण करिती सकल शरांचें,
निज खड्गानें सडे शिंपिती जन-प्राणांचे !

तांडव झालें वेगवान अति, विकल परमाणु
नियति विकर्षणमयी त्रासले सकल अणुरेणु.
अग्नीचक्रासमान फिरती मनु घन तिमिरीं
तो रक्तिम उन्माद नाचतो निष्ठूर करीं !

उठे तुमुल रणनाद भयानक होइ अवस्था,
सरसावले विपक्ष मौन पददलित व्यवस्था.
आहत सरती मागे, स्तंभा टेकुनिया मनु,
लव विसावती, टणत्कारलें दुर्लक्ष्यी धनु.

वाहतात वेगात विषम, बोचरे मरुद्‌गण,
सत्र मृत्युचें, किलात आकुलि हे नेतागण--
गर्जुन वदले–" यास अतां कदापि सोडूं नका."
सावध मनु वदती सरसावून, " हा दंभ फुका !"

भ्याडांनो ! मी तुम्हास होते अपुले गणिलें
तुम्हीच दोघांनी परि येथें द्रोह मांडिले !
या तर, देती बळी कसा तें तुम्हा दावितो
पुरोहितांनो ! यज्ञ नव्हे हा, संगर असतो !"

आणि लोळले असुर पुरोहित निमिषार्धातच,
इडा अजुनही वदते-- "थांबां, रणात हित नच !
भीषण जनसंहार जगीं या स्वयेंच होतो,
वेडया प्राण्या ! उगा तूं कां प्राण गमवितो ?

गर्विष्ठा ! तूं थांब, कशाला इतका विक्रम
जगूं द्या आणि जगा स्वयेंही सुख–जीवनक्रम !"
ऐकणार परि कोण ! धगधगे वेदी–ज्वाला,
सामूहिक बलिपंथ आगळा असे निघाला.

रण आवेशें मत्त मनूचा कर न थांबतो,
प्रजा–पक्षही परंतु अपुलें धैर्य न त्यजतो.
तिथें घर्षिता उभी इडा सारस्वत राणी
सूड पेटला, रक्त वाहते बनुनी पाणी !

धूमकेतुसम निघे रुद्र नाराच भयंकर,
अपुल्या पुच्छीं घेउन ज्वाळा अतिप्रळयंकर,
अंतराळि त्या महाशक्ति हुंकार करितसे,
शस्त्रास्त्रांची फेक भयानक वेग धरितसे,

कोसळतां तीं, मनू मुमूर्षू पडति धरेवर,
रक्त–नदीचा पसरत होता पूर, भूमिवर.

• • •

## निर्वेद

क्षुब्ध क्लांत सारस्वत नगरी
काहीशी मूकच होती,
जिचियावरती विष–कर्मांची
विषाद–आवरणे होतीं.

उल्काधारी प्रहरींसह ग्रह
नक्षत्रें नभिं फिरत होतीं,
वसुधेवर हें काय होतसे ?
अणु रेणु कां व्याकुळती ?

जीवनांत वागृती सत्य, वा
सुषुप्तीच सीमांत असे
वारंवार कुणि सांगे गर्जुन
' ही भव–निशा विराट असे. '

विचार भीषण निशाचरांसम
गरुडझेप प्रचण्ड घेतीं,
सरस्वती ती वाहत होती
धापा टाकित एकांतीं.

घायाळांच्या हुंदक्यांमधुनी
होती जागी मर्म–व्यथा
पुरलक्ष्मी खग–विहग रवांनी
सांगत होती कर्म–कथा !

तिथिया दीपातून निघतसे
धूसरशी प्रकाश रेखा,
थांबत थांबत पवन वाहतो
पडे विषादाचा विळखा.

भ्यालेला जणु मौन निरीक्षक
जागरूक चुपचाप उभा,
असे गमे तम–निल–आवरण
जगा झाकुनी शिवे नभा.

मंडपात सोपान सर्वही
सुनेच, त्यावर कुणी नसे
इडा त्यावरी बसली होती
अग्निशिखा जणु जळत असे.

राजचिन्हविरहित तें मंदिर
समाधीसम उभें तिथें,
कारण मनु आहत होवोनी
तिथेंच कीं पडले होते !

कोमेजोनी इडा वैसली
स्मृतिलतेस घालित पाणीं,
घृणा आणि ममता यांमध्ये
निघून गेल्या किति रजनी.

नारीचें तें हृदय ! अंतरीं
सुधा सिंधु लाटा उधळी,
वडवाग्नी त्यांतची जळोनी
कांचन रंग जळीं मिसळी.

मधु पिंगट त्या तरलाग्नीत
शीतलता संसृति रचते
क्षमा आणि अतिक्रूर सूड ! या
दोघांची सृष्टि नाचते.

"त्यानें केलें प्रेम मजवरी
हो, परि तें अनन्य नव्हते,
सुलभच होती ती अनन्यता
स्थान कुठेही जरि तिज मिळतें.

लंघुन साऱ्या बाधा विपदा
धावे जे अबोध होउन,
तेंच प्रेम अपराध जाहले
जें जाई सीमा लंघुन !"

"हो, अपराध ! किती परी तो
एकटाच भीषण ठरला,
कोपऱ्यातुनी उठुन अचानक
आज किती असीम बनला.

आणि विपुल उपकार सर्व ते
ती सहृदयतेची माया,
शून्यच होतें ? केवळ तयांत
खेळत होती छलछाया ?"

"एक विदेशी म्हणुन पातला
तइं हा किती दुखी होता,
धराच नव्हती जरा जयाला
शून्य अनंतच वर होता.

सूत्रधार तो प्रशासनाचा
नियमांचा पाया बनला,
स्वरचित नव्या संविधानानें
मूर्तिमंत दंडच बनला !

" सागर-लहरींवरुनी उठुनी
नग-शृंगीं जो सहज चढे,
अखंड गतिनें संस्थांच्याही
नित्यच जो राहिला पुढे.

आज पडे तो जेवि मुमूर्षू
ते अतीत स्वप्नच ठरलें,
जो सर्वदा सखा सकलांचा
त्यां सर्व पारखे झाले ! "

" परंतु माझा उपकारी जो
तोच असे मम अपराधी,
जो सर्वां गुणकारी होता
तोच देई अतां व्याधी.

सर्ग-अंकुरांचे दोन्ही हे
पल्लव असती भले-बुरे,
एक असे दुसऱ्याची सीमा
उभयां घ्यावें कां न बरें ? "

" सौख्य आपुले वा इतरांचे
अति होतां दुःखच बनतें,
मग थांबावें कोठें याचें
ज्ञान भान जणूं हरपतें.

भविष्य-चिंता वाहत असतां
प्राणि आजचें सुख सोडुन,
स्वैर धावतो स्वयेंच पेरित
धोंड निज पथीं फिरुन फिरुन.

" त्यास दंड द्यावया बैसल्यें
वा करित्यें रखवाली मी,
कसलें बिकट कूट कोडें हें
किती बिकटतम झाल्यें मी ?

वास्तवाहुनी अधिक चांगली
उठे मनीं गोड कल्पना--
घडेल कांहीं याहुनसुंदर
मिळवील सत्व-वरदाना. "

विचार-तंद्रा क्षणीं भंगली
दूर कुठोनी येइ ध्वनी,
कापत, चिरीत स्तब्ध निशापट
देत हांक येई कोणी--

" दया करा हो, कुणी दाखवा
असे प्रवासी मम कोठे ?
त्याच बावळ्याला भेटाया
पहा घालित्यें मी खेटे !

रुसून गेला ममत्वावरी
ममता देउं न शकल्यें मी,
तो तर होता केवळ माझा
विनवावें मग कोणा मी !

भूल अतां ही शूल बनोनी
सल वाढवी माझ्या उरीं,
भेटेल कसा तो कुठे मला
सांगा सांगा कुणी तरी ! "

इडा उठतसे, राजपथावर
एक दिसे अंधुक छाया,
वाणींत जिच्या करुण वेदना
शोकविव्हळ सारी काया.

शिथिल शरीर, वसन ढळलेलें
केसांची वेणी सुटली,
गलित–पर्ण गंधा मुकलेली
जणुं कोमेजलेली कळी.

नवकोमल अवलंब बरोबर
एक किशोर बोट धरुनी,
चालत होता मूक धैर्य जणुं
अपुल्या मातेस खेटुनी.

थकले दुःखी वाट चालतां
माता–पुत्र उभयतां ते,
जखमी होवोनी पडलेल्या
भ्रांत मनुस शोधित होते.

इडा आज लव द्रवित होतसे
दुःखी जीवां पाहोनी,
समीप जाउन विचारीतसे––
" कोण विसरलें तुम्हां जनीं ?

अपरात्रीं या भटकत ऐसे
वदा, जाल तुम्ही कुठवरी ?
बसा ! आज बेचैन असे मी
सांगा मज जी व्यथा उरीं !

प्रदीर्घ जीवनयात्रेमाजीं
        हरपले जे तेहि मिळती,
जीवन असतां, निश्चित मीलन
        दुःख–रात्रि निघुनी जाती."

श्रद्धा थांबे, कुमार थकला
        इथें लाभते विश्रांती,
इडेसवें चालली त्या स्थळीं
        जेथें वन्हिशिखा जळती.

सहसा भडके वेदी–ज्वाला
        मंडपात प्रकाश पसरे,
कामायनीस दिसलें कांहीं
        क्षणात तिथवर जाइ त्वरें.

आणि तेच मनु ! खरेंच जखमी
        तें स्वप्न कां सत्यच होतें ?
"नाथ ! काय हे ! इथें तुम्हि असे !"
        नीर बनुन हृदय वाहतें !

इडा चकित, श्रद्धा तइं बसुनी
        मनूस गोंजारित होती,
अनुलेपासम मधुर स्पर्श तो
        व्यथा कशी मग राहिल ती ?

मूर्छित नीरवतेंत कांहिंसे
        स्पंदन हळूंच सुरू झालें,
नयनांच्या चारी कोन्यातुन
        चार अश्रुबिंदु तरळले.

कुमार होता पाहत मंडप,
भव्य, उंच प्रासाद, वेदिका,
नवें मनोहर सर्व काय हें
गमते, इथें निर्मिलें कां ?

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/२८५
१
मंत्रालय.

आई वदली— "ये इकडे, बघ,
तीर्थरूप तव पडलेले,"
" बाबा ! आलो " वदतां त्याचे
रोम रोम पुलकित झाले.

" पाणी दे, दिसती तहानेले
बसलीस काय अशी इथें ?
सुन्या मंडपा कंठ फुटे नव
ही सजीवता होति कुठे ? "

आत्मीयता विरघळे गृहिं त्या
एक सान परिवार बने,
एक मधुर स्वर भारी सकलां
श्रद्धा नव गीत गुणगुणे—

" तुमुल कोलाहलीं कलहीं
मी मनींची बात रे !

विकल चंचल नित्य होउन
शोधित्यें जइं सुषुप्ती–क्षण
चेतना जाई थकोनी
तइं, मी मलयवात रे !

चिरविषादलीन मनाची
या व्यथेच्या तम–वनाची
मी उषेसम ज्योति–रेखा
कुसुम विकसित प्रात रे !

जिथें मरुज्वाला धगधगे
चातकीचें मन तगमगे
त्याच जीवन–घाटातली
मी सरस बरसात रे !

पवन प्रस्तर–तटीं–थांबुन
दग्ध जीवन जात वाकुन
त्या करपल्या जग–दिनाची
मी कुसुम–ऋतु रात रे !

चिर निराशेच्या ढगातुन
मूर्त अश्रूंच्या सरींतुन
मधुप–मुखरित मधुर मुकुलित
मी सजल जलजात रे ! ''

स्वर–लहरीतिल अक्षर अक्षर
संजीवन बनुन विरघळे,
पूर्व अंचली प्रभा फाकली
मनुनी निज नेत्र उघडले.

श्रद्धेचा आधार पुनरपि
लाभे, हृदयीं कृतज्ञता,
सद्गदित मनु बसले उठुनी
प्रेमें फुलली शब्दलता––

"श्रद्धे ! तूं आलीस, बरें हें !
परि मी होतो इथेंच कां ?
सर्वत्र पसरली इथें घृणा
तेंच भवन, स्तंभ, वेदिका !"

डोळे मिटुन घेतले क्षोभें
वदले, "नेई दूर मला,
या भीषण अंधारांत अतां
अंतरो न मी पुन्हा तुला.

हात धरी ! मी चालूं शकतो
मात्र तुझा अवलंब हवा,
अन् तूं कोण ! सर मागे ; श्रद्धे !
ये, फुलव हृदय–ताटवा."

श्रद्धा मौनपणें गोंजारी
विश्वास लकाके नयनीं,
जणूं म्हणतसे " माझेच तुम्ही
कशास भ्यावें वृथा कुणी ?"

पाणी पिउनी येइ तरतरी
हळूहळू वदूं लागती,
"घेउन चल मज या छायेंतुन
नको इथें ठेवुं मागुती.

मुक्त निळ्या आकाशाखाली
वा कुठल्या गुहेंत राहूं
झेलित आलो सतत विपत्ती
पुढे येईल तें साहूं."

" थांबा थोडी शक्ति येऊ द्या
घेउन जाइन तुम्हां त्वरें
तोपर्यन्त इथें ह्या आम्हां
राहुं न देतिल काय बरें ?"

इडा उभी लव संकोचोनी
हा हक्क हिरावुं न शकली
श्रद्धा अविचल, मनू बोलती
भावनदी वाहुं लागली--

" जीवन होतें जइं आकांक्षी,
उच्छृंखल, अनुरागपूर्ण,
अभिलाषा होत्या जीवनांतरीं
ममत्वही होते संपूर्ण,

मी होतो, सुंदर कुसुमांची
सघन स्वर्ण छाया होती,
मलयानिलही होता लहरत
उल्हासी माया होती.

अरुण-पात्र घेऊनी येतसे
उषा सुरभित छायातलीं,
माझें यौवन सुखें पीतसे
मिटुन नेत्रदलें आळसलीं.

नवमकरंदें निथळत होती
शेफाली शरद-प्राप्तिची,
सुखच पेरती, सदैव सुंदर
कुरळी अलकें संध्येचीं.

तोंच अचानक तम–वादळ हें
उठलें वळें क्षितिजावरी,
त्या आघातें विक्षुब्ध विश्व
उद्वेलित मानस लहरी.

व्यथित हृदय त्या निळसर गगनीं
नभगंगेसमान खुलले,
जेव्हां मंगलमय देवी ! तव
मंद स्मित त्यामधें फुललें.

दिव्य तुझी ती अमर अमिट छवि
रस रंग खेळूं लागली,
अद्भुत हेम–रेघ जणुं माझ्या
उर–निकषावरी उमटली.

अरुणाचल मनमंदिरातली
मुग्ध माधुरी नव प्रतिमा,
शिकवूं लागे स्नेहभरानें
सौंदर्याचा मृदु महिमा.

त्या दिवशी तर उमजलें अम्हा
सौंदर्य कशासी म्हणती !
तेव्हां ओळखलें, कोणास्तव
प्राणी सुख–दुःख साहती.

जीवन सांगे यौवनास, ' तूं
वेड्या पाहिलेस कां कांहीं ?'
यौवन म्हणे उसासे टाकित
' पाथेया जोडी कांहीं !'

मानस असतां होत शिपलें
झालीस थेंब स्वातीचा,
हृदय-सुमन डोललें, जईं तूं
झालीस पराग तयाचा.

या शुष्क पानगळीमधें तूं
हिरवळ ही भरलीस किती,
मज गमे असे ही मादकता
बनली ती इतकी तृप्ती !

ज्या जगतीं दुःखाचें वादळ
पीडेच्या लहरी उठती,
जीवन मरणच बनलें होतें
भंगुरता नाचत होती.

तेंच विश्व उज्वल प्रशांतसे
मंगल भासे विश्वासें,
वर्षे कदंब तरुसमान
सृष्टिवैभव होत हरितसें.

शुभगे ! ती पावन मधुधारा !
बघुनी पयही मोहित व्हावें !
सौंदर्याच्या शैल शिखेसम
जिच्यांत जीवन धुवुन निघावें.

संध्या घेई माझ्याकडुनी
तारकांची अकथ्य कथा,
निद्रा सहजच जाई घेउन
सकल श्रमांची विकल व्यथा.

सकल कुतूहल आणि कल्पना
त्या चरणांवरी घुटमळे,
धन्य धन्य ही जीवन घटका
प्रसन्न हंसती कुसुम दळें.

मधु वाटिका फुलली स्मिताची
श्वासात पारिजात डुले
गति मकरंद–मंद मलयासम
स्वरांत वेणू मुळि न जुळे !

श्वासांच्या पवनावर माझ्या
वेणु–रवासमान चढुनी,
छेडलीस तूं विश्व–गव्हरीं
अभिनवशी दिव्य रागिणी.

तळातले जीवन जलधीच्या
सगळे मोती वर आले,
जग–मंगल संगीत तुझें तें
गातां रोम रोम फुलले.

आलोक–रश्मिसम आशेच्या
मम उरिचें कांहि घेउनी,
लघु जलधर येई आकारा
चंदेरी कडा लेवुनी.

विद्युन्मालेसम त्यावर तूं
चमकलीस निज तेजानें
आणि जलद तो झिमझिम बरसे
मन चिंब हरित मोदानें.

शिकविलेंस तूं हंसतां हंसतां
खेळ असे जग खेळत जा,
मेळ करोनी तूं सांगितलें
मेळ जगाशी घालत जा.

हृदय असे निधि, स्वेच्छेनें तो
दान करा हवें तयाला,
हा संकेतहि सौदामिनिच्या
चापल्यानें तूंच दिला.

तुमुल वृष्टि तूं सौभाग्याची
अन् मधु रजनी स्नेहाची,
जीवन जर चिरअतृप्ती, तर
तूं मूर्ती संतोषाची.

किती तरी उपकार तुझे हे
मम प्रणयां मिळे आसरा,
आभार किती तव मानूं मी
संवेदनमय हृदय–झरा.

अधम परी मी, कळली न मला
तव मांगल्याची माया,
आणि आज मी व्यर्थ धरितसे
हर्ष शोक यांची छाया.

मम सर्वस्व क्रोध मोहाच्या
उपादानें असे घडलें,
असाच येई प्रत्यय आतां
किरण अजुन तमां न शिवलें.

शापितसा मी जीवनिचा हा
कंकाल घेउन भटकतो,
पोकळ वाश्यामधें जणूं त्या
कांही शोधतां अटकतो.

अंधार–आंधळा असे परी
निसर्ग हा ओढ लावतो,
सर्वांवर, हो, स्वतःवरीही
मी खिजतो आणि कावतो.

नाहीं घेऊं शकलो जणुं मी
जें तूं मज देऊं इच्छिलें,
नरोटींत माझिया किती तू
मधुरिम रसराज ओतले.

गेले सांडुन गळून सगळे
ग्रहण करू ना मी शकलो,
तर्क बुद्धिचीं छिद्रें होतीं
हृदय–पात्र भरूं न शकलो.

हा कुमार माझ्या जीवनिचा
उच्च अंश, कल्याण–कळा !
जबर प्रलोभन माझें, जेथें
हृदय–निधी स्नेहें झरला.

सुखीं रहा, असोत सर्व सुखी
सोडा मज अपराध्याला."
श्रद्धा मौन निरखिते मनुच्या
अंतरीं उठल्या वादळा.

दिन सरला, रजनी घेवोनी
तंद्रा निद्रा येइ सवें,
उमेद हरुनी पहुडली इडा
कुमार होता तिच्यासवें.

श्रद्धादेखिल खिन्न श्रांतशी
हातांची उशी करोनी,
पडल्या पडल्या विचार करिते,
मनू मौन शाप प्राशुनी.

विचार करिती–" जीवन सुख कां ?
छे ! हें विकट रहस्य असे,
मनू ! धाव या मायेपासुन
काय व्यथा ही कमी असे ?

स्वर्णरश्मिसम ही प्रभातींच्या
झगझगते चंचल छाया,
श्रद्धेला दाखवूं कसे मी
कृष्णवदन, कलुषित काया !

अनु रिपु सगळे कृतघ्न, यांचा
पुन्हा कसा विश्वास धरूं ?
प्रतिहिंसा अन् सूड दडपुनी
मनोमनीं चुपचाप मरूं ?

श्रद्धेच्या सान्निध्यीं कांहीं
करतां येणारच नाहीं,
तर मग जाइन, जिथें कुठें मज
शांती मिळेल लवलाही."

जागे झाले सर्व प्रभातीं
परंतु तेथें मनु नव्हते,
' बाबा कुठें ? ' म्हणत शोधी जणु
कुमार–मन शांतच नव्हतें.

इडेस वाटे सकलांहुन मी
अधिकच अपराधी आहे,
कामायनी मौन बसलेली
मन संभ्रमीं बुडूं पाहे.

• • •

## दर्शन

चंद्रहीन होती एक रात
झोपली जियेंत स्वच्छ प्रभात

चमचमत्या ताऱ्यांची झळझळ,
प्रतिबिंबित सरिता–वक्षस्थळ,
धारा वाहे प्रतिबिंब अटळ,
उघडत होता हळु पवन–पटल,

चुपचाप उभे तरु–पर्णपात
ऐकिती जणूं मधु गुपित बात.

धूसर छाया करितात भ्रमण
लहरी येती चुंबिती चरण,

" आई ! तूं आलिस इथें दूर
केव्हांच बुडाला सांज–नूर
या विजनीं कुठला रुप–पूर
तुज दिसे ? परत, घर फार दूर

जिथल्या धूमीं पसरे चंदन "
श्रद्धा घेई सुत–मुख चुंबन.

" आई ! कां तूं इतकी उदास
नाहीं कां मी नित जवळपास,

अशी तूं किती दिसापासून
कसला विचार करितेस मौन ?
दुःख तुला वद कसलें दारुण,
उरीं बाहिरीं जाळी जें तन

टाकिती उसासे दीर्घ श्वास
चालवीस जणुं होत हताश. "

ती वदली, " नील गगन अपार
ज्यांत लोंबती घन सजलभार,

येती, जाती, सुख, दुख, दिस, पळ,
खेळतो शिशूसम खेळ अनिल,
झळाळे तारांनी नभस्थळ
नभ–रजनीचे उडुगण अविरल,

हे विश्व असे रे किती उदार
वाळा मम घरचें उन्मुक्त द्वार.

हे लोचन–गोचर सकल लोक
संसृतिचें कल्पित हर्ष–शोक

भाव उदधितुन किरण–पथांनी
भरती हे जग स्वाति–कणांनी
नित जागृत उत्थानीं पतनीं
निर्झर झरती नग आलिंगुनी

गुलावी कोडयाची मधु रोक
त्याचीच असे ही नोकझोक—

जग जागे चोळित नयन लाल
झोपे पांघरुन तमिस्त्रा–जाल

रंग बदलती इंद्रधनूसम,
स्मृति, संसृति, नति, प्रगतित हे सम,
निज सुषमेंत करितसे चमचम
त्यांत खुलती उडुदल अनुपम

अवकाश सरोवरिंचा मराल
किती सुंदरतम किती विशाल.

याच्या थरोथरीं मूक शांति
शीतल अगाधशी ताप–भ्रांति

परिवर्तनमय हे चिरमंगल
स्मित करिती येथें भाव सकल
हंसतो खळखळुनी कोलाहल
उल्हासें भरलें अंत:स्थल

मम निवासिची अति मधुर कांति
हे घरकुल माझी सुखद शांति."

"अंबे ! मग कां इतका विराग
मजवरी कां न तुझा अनुराग ?"

लगेच पाही श्रद्धा वळुनी
इडा उभी, वदनावर ग्लानी
चंद्रबिंब जणुं राहू–व्यसनीं
मळले विषण्ण विष–रेखांनी

कांही ग्रहण करि दीन त्याग
झोपलें भाग्य येउनी जाग.

वदली, "तुजशीं कुठली विरक्ति
तूं जीवनिची अंधानुरक्ति

मम वियोग्यास तूं अवलंबन––
देउन राखियलें तूं जीवन,
तूं आशामय ! चिर आकर्षण
मादकतेनें भरलेला घन

मनु–मेधेची चिर अतृप्ति
तूं उत्तेजित चंचल शक्ति !

मी द्यावें तुज काय मोल,
हें हृदय ! आणि दो मधुर बोल,

मी हंसत्यें, नी रडुनी घेत्यें
मिळवित्यें आणि उधळुन देत्यें
याचें घेउन त्याला देत्यें
दुःखासी मी सुखीं बदलत्यें

अनुरागपूर्ण मी मधुर घोल
चिरविस्मरणाचा ऊंच झोल.

तव प्रभापूर्ण मुख बघुन फार
मनु भुलले होते एक वार

नारी माया ममतेचें बल
शक्तिमयी ती छाया शीतल
क्षमा करावी कुणि मग निश्छल ?
जेणें धन्य बनावें भूतल,

'करशील क्षमा तूं' हा विचार
मी सोडूं केवी साधिकार !"

"आतां न मी राहणार मौन
परि अपराधी येथे न कोण ?

सुख दुःखें हीं सकल साहती,
परि सौख्यासच अपुलें वदती,
अधिकार न सीमेंत राहती,
आषाढ–ओढयांसम वाहती,

रोखील मग तयां कसे कोण ?
ते वदति जगा–' शुक्र आहां न !'

फूट इथें नित जाई वाढत
कृत्रिम सीमा तुटती तटतट

श्रम भागांचे वर्गच बनले
बल गर्वाचे कारण बनले
नियमांचें जग ज्यांनी रचलें
त्यांनींच स्वयें रण माजवलें

लालसा प्राशुनी सकल मत्त
माझें साहस जाहलें लुप्त.

मी जनपद कल्याणी प्रसिद्ध
अति अवनतिचें कारण निषिद्ध

मम सुविभाजन जाहलें विषम
मोडतात बनुनी नित्य नियम
नाना केंद्रांत जलधरांसम
वळत पळत वर्षत उपलोपम

ही ज्वाला इतकी असे क्रुद्ध
मागे आहुती सदा समृद्ध !

भ्रमांत होत्यें कां मी नितांत
संहारबाध्य असहाय दान्त,

प्राणी मृत्यु–दाढेत अविरल
जाती चुपचाप बनुन निर्बल !
संघर्ष कर्म हें मिथ्या बल,
ही बलचिन्हें, हे यज्ञ विफल,

ही भयोपासना ! प्रणति भ्रांत
अनुशासनाचें छत्र अशांत !

मी लुटलें तव सौभाग्य
आणि तुझा तो दिव्य अनुराग

मी आज अकिंचन झाल्यें ग
माझीच मला मी रुचते ना ग
जो कांहीं मी गातसे राग
माझा मज ही ऐकुं न ये ग

क्षमादान दे नको अनुराग
सुप्त चैतन्या येवो जाग !"

श्रद्धा वदे होत विषम ध्वांत !
" रुद्र रोष अजुनीही अशांत

चढलीस शिरीं, लाभे न हृदय
व्याकुळुनी तूं करिशी अभिनय
चेतन ममत्व हरपे सुखमय
अतां न उरला आलोक उदय

सकल चालले निज पंथी श्रांत
प्रत्येक विभाजन बने भ्रांत.

जीवन–धारा सुंदर प्रवाह
सत्, सतत, प्रकाश सुखद अथांग

तारा बिंबें घेउनी करीं
तर्कमयी ! मोजल्यास लहरी
थांबुनथांबुन अष्टौप्रहरी
जडताची ती, भूल ना करी

सुखदुःखांची मधु ऊन–छांव
सोडलास तूं हा सरळ ठाव.

चैतन्याचा भौतिक विभाग
करुन जगीं वाटलास विराग

चितिचें स्वरुप हें नित्य जगत,
रूपें बदलत जाई शत शत,
कण विरह–मिलनमय नृत्यविरत
उल्हासपूर्ण आनंद सतत

तल्लीन पूर्ण हा एक राग
झंकार एकची 'जाग जाग' !

मी लोकाग्नित तापुन नितांत
देत्यें आहुती प्रसन्न शांत

क्षमा न करतां कांहि चाहसी
जळत्या उरास अधिक दाहसी
घे तर हा निधि जो मजपाशी
असो मला मम वाट पुरेशी––

सुता ! अस इथें, कर सुखद प्रांत
विनिमय करुनी कर कर्म कांत––

दोघे सांभाळा राष्ट्रनीति
शासक बनुन पसरवा न भीति

मी मम मनुस शोधण्यां जात्यें
गिरि गव्हर घालीन पालथे
गवसतील ते भोळे तेथें
प्रेमस्नात मी, कपटी ना ते

मग पाहिन कैसी चाले रीति
मानवा ! पसरो तव यश कीर्ति ! "

बालक वदला, "तोड न ममता
आई ! फिरवी ना मुख आतां

तव आज्ञेचें करुनी पालन
तो स्नेह सदा करितो लालन—
मी मरो जगो परि ढळो न प्रण
वरदान बनो माझें जीवन !

तूं ऐसी मज टाकुन जातां
हीच कूस आसरा मज आतां !"

"इडेचें पावन प्रेम अपार
सौम्या ! वारिल तव व्यथा भार

ही तर्कमयी, तूं श्रद्धामय
तूं मननशील कर कर्म अभय
वार हिच्या तापांचा संचय
होऊं दे मानव भाग्योदय

समरसतेचा कर तूं प्रचार
बाळा ! ऐक आईची पुकार !"

"विश्वासपूर्ण अति मधुर वचन
कधी न यांचे घडो विस्मरण

हे देवि ! तुझा हा स्नेह प्रबल
बनुनिया श्रेयोद्‌गम अविरल
आकर्षण घनसम वितरो जल
जावो विलया संताप सकल."

वदुन इडेनें स्पर्शिले चरण
धरिला कुमार—कर मृदुल सुमन.

तीं तिघें होतीं क्षणभर मौन
विसरलीं आपण कुठे, कोण !

विच्छेद बाह्य, परि आलिंगन—
तें हृदयांचें, अति मधुर मिलन
भेटतात हत होउन जलकण
लहरींचें हें परिणत जीवन,

परतलीं दोघें नगर मौन
जातां दूर उरलें ना दोन.

निस्तब्ध गगन, दशदिशा शांत
अनंताचेंच तें चित्र कांत

कांहीं थेंब शून्य हृदयावर
घाम डंवरुनी निशा–शिरांवर
निथळतो, परी होइ न निर्झर
गंभीर मलिन छाया भूवर

सरिता–तट तरुंचा क्षितिज प्रांत
केवळ पसरवितो दीन ध्वांत.

शत शत तारामंडित अनंत
फुलला पुष्प ताटवा वसंत

हंसते वरचें तें विश्व मधुर
मंद प्रकाशें पूरित अंतर
वाहे माया–सरिता त्यावर
उठते किरणांची उंच लहर

थरीं खालच्या छाया अविरत
निघुनी जाते हलकेच येत.

निवांत होता सरितेचा तट
वारा होता झोके खेळत
हलके हलके लहरींचे दल
तटीं आपटुन होई निर्बल
'छप छप' हा ध्वनी होतो विरल
थरथरा कांपते दीप्ति तरल
संसृति भुलली स्वतः स्वतःतं
गंधविव्हळ जणु सुम प्रफुल्लित.

मग सरस्वतीसम घेत श्वास
श्रद्धा पाहतसे आसपास
तोंच खुले दो नयन चमकले
शिळेत पाचूं बिनगाठवले
तमीं काय हें क्षणि सळसळलें ?
कीं धाराजलची खळखळलें !
छे ! होता समीप गुहावास
ज्यांत घेइ कुणी श्वासोच्छ्वास !

तो निर्जन तट जणुं एक चित्र
होता किति सुंदर किति पवित्र !
होते कांहीं उन्नत गिरिगण
श्रद्धा घाली गगना गवसण
लोकाग्नित तावून सुलाखुन
सुवर्ण प्रतिमा ठरली पावन
मनू बघती ती किती विचित्र
मातृ-मूर्ति होती विश्व-मित्र.

" रमणी ती तूं नव्हेच, " वदले,
" जिचिया मनीं हव्यास भरले

वंचिते ! निज सर्वस्व दवडुन
मिळविलेस जें तूं रडरडून
पळून आलो मी ज्यांपासून
तयांसही तूं सारे देउन

निर्दय मन नाहीं कळवळलें ?
अद्‌भुत ! तव मन कैसे घडलें !

ते श्वापदाहुन हिंस्र अधीर,
कोमल शावक तो बालवीर,

ऐकत होता वाणी शीतल,
लोभस किती, किती तो निर्मल !
परि कठोर किति तव अंतःस्थल
त्या इडेनें रचिला पुन्हा छल

तरीही तूं राखलास धीर
गेला सुटून धनुवरुन तीर ! "

" अजुनही तुम्ही किती साशंक
दिल्यानें होई कुणी न रंक !

हा विनिमय अथवा परिवर्तन,
बनतें ऋण तुमचें अग्रिम धन
तुमच्या अपराधाचें बंधन---
बनतें मुक्ती, सोडून स्वजन

निर्वासित तुम्ही, कां हा डंक ?
द्या घ्या प्रसन्न मनें, निःशंक ! "

" हे देवी ! असशी किती उदार
तू मातृमूर्ति अति निर्विकार

हे सर्व मंगले ! तूं महान
करिशी सकल दुःखांचें त्राण
तव वाणीतुन स्रवे कल्याण
वसशी ज्यांत, तें क्षमावितान

मी भुलली पाहुन तुज अपार
नारीसम ! हा अति लघु विचार—

सोशितो तटाकीं या निर्जन
मी समीर, क्षुधा, व्यथा दारुण

भावनेचिया कांची कांचत
पुढेच आलो सदैव चालत
यांचिया विकारांसम विकृत
ठरलो शून्यच मी सत्ताच्युत

बघुं नकोस लघुता वक्ष चिरून
बसला अनुताप तींत रुतून. "

" ही रात स्तब्ध नत हे नाथा !
देतसे स्मरण निज गत गाथा

ती प्रलय शांति, तो कोलाहल,
अर्पण जईं जीवन अविकल
मी झाल्यें तुमचीं पूर्ण सकल
विसरेन कशी, मी कां दुर्बल ?

चला शोधुं या शांति–प्रभाता
सदैव तुमची मी चिर कांता.

सुर–द्वंद्वाचें प्रतीक बनून
मानव करो भूल–परिमार्जन

पसरलें हें विष महा विषम
निज कर्मानें जें करिती सम
सर्व होवोत मुक्त, सरो भ्रम
रहस्य त्यांचे होवो संयम

असत्य तें तें जाइल संपुन
मळवाटा पडतिल मिटुन मिटुन."

पसरला शून्य असत अंधार
अवकाशपटाच्या आरपार

अंतर्बाह्य उन्मुक्त सघन
अचल महान निळे अंजन
जाहली भूमिका स्निग्ध मलिन
मनुचे होते अनिमेष नयन

किती अनंत तें शून्य सार
कांहीं न दिसे त्या पैल पार.

सत्ता स्पंदन मग डगमगलें,
आवरणपटाची गांठ खुले,

तमोदधिचें बनुनी मंथन,
ज्योत्स्ना–सरितेचें आलिंगन,
रजत–गौर उज्वलतर जीवन,
आलोक पुरुष ! मंगल चेतन !

केवळ प्रकाश जणुं कल्लोळे,
मधु किरणांची लहर उफाळे.

तम बनला होता अलक–जाल,
अंग अंग ज्योतिर्मय विशाल,

अंर्तनिनाद ध्वनिनें पूरित,
ती शून्यभेदिनी सत्ता चित्त,
नटराज स्वयें नर्तनीं निरत,
अंतरिक्ष होते स्मित विखुरत,

स्वर लय बनुनी देतात ताल,
चालले लोपुनी दिशा काल.

लीलेच्या स्पंदनीं आल्हाद,
तो प्रभापुंज चितिमय प्रसाद,

आनंदपूर्ण तांडव सुंदर,
झरझरती उज्वल श्रम–सीकर
चंद्र तारका बनती दिनकर,
धूलिकणांसम उडती भूधर

संहार सृजन हे युगुल पाद
गतिशील अनाहत होइ नाद.

विखुरले असंख्य ब्रम्हाण्डगोल,
युग त्याग ग्रहण करितात तोल,

वळतांच विजेची क्रूर नजर,
कंपायमान होत चराचर,
चेतन परमाणु भंगुन प्रचुर,
विखुरत विलीन होती क्षणभर,

हें विश्व घेइ महा हिंदोल,
परिवर्तन–पट घेतसे झोल.

त्या शक्ति—स्वरुपाचा प्रकाश,
करी शाप—पापांचा विनाश,

नर्तनीं निरत निसर्ग गळून,
त्या कांतिसागरीं विरघळून,
सुंदर स्वरुप करितो धारण,
कमनीय होतसे अतिभीषण,

हीरक—गिरीवर विद्युत् विलास,
उल्हसित महा हिमधवल हास.

पाहती मनू नर्तित नटेश,
हतबुद्ध हांक देती विशेष,

"हे कांय ! श्रद्धे ! चाल नेउन
त्या चरणांवर, निज बल देउन,
जिथें अघ—पुण्य जळून जळून
जाते निर्मल पावन बनून,

मिटतें असत्य तें ज्ञान लेश
समरस अखंड आनंद देश !"

• • •

## रहस्य

ऊर्ध्व देशिं त्या नील तमांतरिं
स्तब्ध होतसे अचल हिमानी,
पथ थकोनिया लीन, चतुर्दिक
अवलोकी तो गिरी अभिमानी.

दोघें पथिक चालती कधिचे
उंच उंच ते चढतांच जाती,
श्रद्धा पुढती मागुतां मनू
उत्साहें साहसी चालती.

होता सुसाट वारा उलटा
सांगे 'फिर माघारा पथिका
भेदुन मजला निघाला कुठें ?
प्राणांचाही नसे मोह कां ?'

आकाशाला शिवूं पाहते
उंचच उंची वाढत जाई,
अंग अंग क्षतविक्षत होतें
भीषण गर्त ! भयंकर खाई !

रविकिरणें हिमखंडांवरती
पडतां किती चंद्रमा बनती,
पवनीं फिरूनी चक्रगतीने
पुन्हा पुन्हा तेथेंच परतती.

जलधर खाली धावत होते
घालुन इंद्रधनुची माला,
कुंजर–कलभच ठुमकत होते
साज पुरवी ज्यां चंचल चपला.

खाली भूवर होते वाहत
शीतल शत शत निर्झर एवी,
महाश्वेत गजमस्तकांतुनी
विखुराव्या मदधारा जेवी.

उंच तरूंची कंच वनश्री
गमे सपाट जणु मखमल हिरवी,
नद्या रेखिती असुन वाहत्या
चित्रकृती जणु रेखिव बरवी.

सारी धरणी लघुतम भासे
वरती घेरा महाशून्याचा,
आज होतसे उष:काल जणु
उंचच चढण्याच्या रजनीचा.

" कुठे चाललिस घेउन मजला
श्रद्धे ! आतां थकत चाललो.
सरली हिंमत या पथिकाची
निराधार मी हताश ठरलो.

चल माघारी या चकरीतुन
दुबळा मी, आतां न लढणार,
दमछाकीचा गार वात हा
मी न यापुढे मुळी टिकणार.

माझे, हो, ते सारे होते
माझेच, जयांवर रुसून आलो,
ते खाली दूर राहिले मागे
परी न त्यांना विसरुं शकलो. "

श्रद्धा–वदनीं निष्कपट हास्य
विश्वास दिलासा देत खुलें,
सेवा होती तिच्या अंजलित
कांहीं करण्या कर आसुसले.

विकल सख्याला आधार देत
कामायनि मधुस्वरांत वदली,
" आलों खूपच दूर निघोनी
थट्टेची ना वेळ राहिली.

दिशा विकंपित, पळ असीम हे
माथ्यावरती विशाल अनंत,
जाणवतें कां कांहीं, बोला
खरेंच कां निज चरणीं पर्वत ?

निराधार जरि असूं उभयतां
इथेंच आहे आज राहणें,
नियतीचा खेळ असो कांही
उपाय दुसरा कांहिच नेणे.

नयनांपुढची ही काळोखी
तुम्हांस सांगे गाठा ऊंची,
सुसाट वारा सोसत असतां
धैर्य न तुमचें व्हावें खच्ची.

श्रांत परांनी डोळे मिटुनी
विहंग-युगुलासमान राहूं,
शून्य पवन हा पंख बनूनी
देइल थारा, टिकून राहूं.

नका घाबरूं, सखल सकल हें,
कुठे पातलो ! बघा तर जरा, "
मनू पाहती नेत्र उघडुनी
जणूं मिळाले त्राण लव जरा.

नवशक्तीचा अभिनव अनुभव
ग्रह, तारे, नक्षत्र, लोपले
दिन-रजनीच्या संधिप्रकाशीं
कुणीच नव्हतें अतां गुंगलें.

ऋतुचक्रांची माया नुरली
रेख मेदिनीची विलोपते,
निराधार त्या महान लोकीं
नवचेतनता उदया येते.

तिन्हीं दिशांना प्रकाश—बिंदू
तीन वेगळे दिसूं लागले,
जणूं प्रतिनिधी त्रैलोक्याचे
विलग असूनी सजग जाहले.

मनु विचारती—"कुठले नव ग्रह
हे, श्रद्धे ! मज सांग सत्वरीं,
कुठल्या लोकीं आलो मी ह्या
मयलोकातुन ने मज दूरी."

"मध्य बिंदू या त्रिकोणाचा
विपुल शक्तिक्षमतायुत तुम्ही,
प्रतीकें इच्छा, ज्ञान, क्रियेचीं
एकेका बघा नीट निरखुनी.

तो बघा त्या तिथें रागारुण
उषा—कंदुकासमान सुंदर,
छायामय कमनीय कलेवर
भावमयी प्रतिमेचें मंदिर.

शब्द, स्पर्श, रस, रूप, गंधाच्या
सुडौल पुतळ्या सुपारदर्शी
जणु नर्तन करितात चतुर्दिक
फूलपांखरें विचित्रदर्शी.

वसंत ऋतुच्या काननांत या
अरुण परागपटाच्या छायीं,
झोपत जागत थिरकत येती
भावपूर्ण निज मायामोहीं.

तो संगीतात्मक ध्वनि यांचा
लचकत हळूंच आळस देतो,
मादकतेच्या लाटा उधळित
निज अंबरास न्हाऊं घालतो.

अलिंगनाची मधुर प्रेरणा
स्पर्शानें रोमांच फुलविते,
लाजाळूच्या नव लतिकेसम
क्षणीं उमलते, क्षणात मिटते.

जीवनिची ही केंद्रीय भूमि
रसधारांनी सिंचित होते,
मधुर लालसेच्या लहरींनीं
ही प्रवाहिका स्पंदित होते.

जिच्या तटावर तडितांचे कण
नयन मनोहर धरुन आकृती,
छायामय सुषमेंत न्हाउनी
सुंदरशा धुंदीत विचरती.

सुमें बहरल्या मातीमधुनी
मधुर गंध येई भिजलेला,
अदृश्य बाष्प–कारंजातुन
बहर बहरतो तुषारलेला.

इथें हिंडते पहा चतुर्दिक
चलचित्रासम संसृति–छाया,
प्रकाश बिंदू सभोंवतालीं
स्मित करीत बसलेली माया.

तीच चालवी भावचक्र हें
आसऱ्याच्या आसावरती,
नवरसयुक्त आरे अविरल
चकित चक्रवालास स्पर्शती.

इथें मनोरम विश्व करितसे
रागारुण–उपासना चेतन,
मायावी परंपरा ऐसी
जाळें पेरून जिवास वेसण.

ही अमूर्त रूपें पुष्पांसम
केवळ वर्ण गंधात फुलतीं,
या किन्नरिंच्या आलापांचे
सुंदर झूले येथे झुलती.

भावभूमिका याच लोकिंची
जन्मदायिनी अघ–पुण्याची,
स्वभाव–सांचे मूर्त ओतती
सोसुन ज्वाला मधु तापाची.

यमी संयमी व्याप लतेचा
भावतरूला सहज बिलगतां,
जीवन–वनिंचे कोडें बनतें
आशेचीं नभ–पुष्पें फुलतां.

सरे पानगळ एक बाजुला
चिर वसंत ऋतुचे उगम जनन,
एकच बंधन सुखदु:खांना
अमृत हलाहलाचें मीलन. ”

“ दाविलेस हे अति सुंदर तूं
परि हे श्यामल विश्व कोठले ?
कामायनी ! सांग त्यामधें
दडले भेद–रहस्य कोठले ?”

" आहे हा श्यामल कर्मलोक
अंधुक अंधारा कांहींसा,
सघन होतसे अविज्ञात हा
धूमपटासम देश कांहिंसा.

अविरत फिरे कर्मचक्रासम
हा, बनुनी नियति-प्रेरणा,
सर्वांपाठीं असे लागली
व्याकुळलेली नवी ईषणा.

श्रम-कल्लोळ असे पीडामय
हे प्रवर्तन महायंत्रांचें,
क्षणभरही विश्राम नसे लव
प्राण गुलाम क्रियातंत्रांचे.

भाव-जगाचे सकल नागरिक
सुखास दुःखीं असे बदलती,
हिंसा गर्वोन्नत हारातुन
ठाठरले अणु जेवि भटकती.

भौतिकवादी सदेह कांहीं
करुनी येथें जगूं चाहती,
नियम भाव-राष्ट्राचे येथे
दंड जाहले; सर्व विव्हळती.

करिती कर्म, संतोष ना परि
आसूडानें प्रेरित होउन,
कर्म आचरत जाती अविरत
भीतिग्रस्त-से कंपित होउन.

नियति चालवी कर्मचक्र हें
तृषाजनित ममत्व-वासना,
पाणि-पादमय पंचभुतांची
इथें चालते नित उपासना.

इथें सतत संघर्ष, विफलता
राज्य चालतें कल्लोळांचें,
शर्यत अंधारीं पळण्याची
चळलेलें चित्त समाजाचें.

स्थूल जाहले रूप धरोनी
ही कर्माची भीषण परिणति !
आकांक्षेची तीव्र पिपासा
ही ममतेची अति निर्मम गति.

इथें शासनादेश घोषणा
विजयाचा हुंकार ऐकवी,
इथें भुकेनें पिडलेल्यांना
पुन्हा पुन्हा चरणींच लोळवी.

इथें उन्नतीच्या भोक्त्यांनीं
दायित्व ओढलें कर्माचें,
जळून जाळुन विखरून पडले
फोड वाहते दीन जिवांचे.

ऐश्वर्याचे साठे सारे
इथें मृगजळासमान दिसती,
क्षणिक भोगभोगात लीन–से
भाग्यवान जन पुन्हा अडकती.

महालालसा इथें यशाची
अपराधांची दुनिया रचिते,
अंधप्रेरणेनें प्रेरितशी
कर्त्यांमध्यें स्वतःस गणते.

प्राणतत्त्वाची सघन साधना
जल, हिम–उपल इथें बनतसे,
तृषार्त आहत होउन जळती
मर मरून जगणें शक्य असे !

लाल निळ्या ज्वाला कांहींसें
जाळुन गाळुन इथें ओतती,
ऐरणीवरी घणाघात ते
साहुन धातु अमरता घेती.

वर्षा–घन गर्जून कोसळे
तडी थडी हर घडीस पडती,
कुंज-कानना तुडवित बुडवित
सरिता सागर–भेटिस पळती."

"पुरे! दाखवूं नकोस आणिक
हें अतिभीषण कर्म–जग असे,
श्रद्धे! उज्वल असे, काय तें?
जणु रजताचा पुंजच भासे?"

"ज्ञानक्षेत्र तें, जेथें नाथा!
सुख–दुःखांप्रत मोह खंत ना,
न्याय येथला अतिशय निर्मम
ठावें बुद्धिचक्रास दैन्य ना—

अस्ति–नास्तिचा भेद, निरंकुश
करिती हे अणु तर्क–युक्तिनें,
हे निःसंग, परी मुक्तीशी
जोडिति नातें अनुष्ठानानें.

प्राप्यच लाभे, नव्हेच तृप्ती
बुद्धी रचुनी भेद वाटते,
सकल विभूती वाळूसमान
तृषार्त देहिवर इथें चाटते.

न्याय, तपस्या, ऐश्वर्य, श्रांत
मुरले सारे जीव भासती,
या ग्रीष्मी मरुदेशीं सुकल्या
निर्झर–कांठासमान गमती.

मनोभावें कार्य कर्माचा
एकचित्तें समतोल साधती,
हे निस्पृह न्यायासनवाले
निज कर्तव्या कधी न चुकती.

थेंब थेंब वाहत्या झऱ्यासम
अपुले सीमित पात्र घेउनी,
हे जीवनरस मागत फिरती
अजरामरसे इथें बसोनी.

इथें विभाजन धर्मतुळेचें
अधिकारांची व्याख्या करिती
हे निरीच्छ, परि कांहीं जोडुन
सैल उसासे इथें टाकिती.

कमलसरासम निजत्व यांचें
उत्तम सात्विक तें तें घेतें.
जीवनातला मधुरस जेवी
मधमाशी ती जमवित असते.

टिपूर ज्योत्स्ना शरद ऋतूची
अंधारासी भेदुन उजळे,
ही अनवस्था, युगुल–मीलनीं
विकल व्यवस्था सदैव उधळे.

पहा सर्व ते सौम्य जाहले
साशंक परी निज दोषांनीं,
सकेत चालती दंभाचे
भुवई चढता परितोषांनी

इथें अस्पर्श रस जीवनिंचा
नकाच स्पर्शू नित साठूं द्या,
एवढेच बस, नशिबीं तुमच्या
तृषा ! मृषा वंचित होऊं द्या.

समन्वयास्तव जरी निघाले
पसरविती हे घोर विषमता,
स्वत्व एक परि दाविति दुसरें
अभिलाषांना ये असत्यता.

व्यग्र आंत, परि शांत बनोनी
रत शास्त्रांच्या नित्य रक्षणी,
विज्ञानपूर्ण हें अनुशासन
बदलत जाई हर क्षणोक्षणीं.

हेंच त्रिपुर, जें तुम्ही पाहिलें
तीन बिंदु ज्योतिर्मय इतुके,
सुख–दुःखातिल केंद्रच अपुले
भिन्न सर्व हे झाले कितुकें !

ज्ञान दूर अन् भिन्न कृतीही
पूर्ण मनीषा व्हावी कैसी ?
परस्परांची भेंट न होते
ही विडंबना आहे ऐसी !"

महाज्योतिची उमटे रेखा
श्रद्धेचें स्मित तींत तरळतें,
दोघें सुबद्ध झालीं सहसा
पुनरपि ज्वाला ज्यांत जागते.

खाली वरती लवलवती ती
विषम हवेत भडकत होती,
अनंत शून्यीं स्वर्णिम ज्वाळा
सकला 'नम्रा' देतच होती.

प्रलय–पावकाची शक्ति–लहर
त्रिकोणात त्या उठे उफाळून,
ब्रह्माण्डांत शृंग डमरूचा
निनाद टाकी अगजग व्यापुन.

चितिमय चिता भडकते अविरल
नृत्यविन्यास महाकालाचा,
विश्वरंध्र ज्वाळांनी भरुनी
खेळे खेळ विषम कृत्याचा.

विलीन इच्छा, कृती, ज्ञान, हे
स्वप्न, झोप, जागृती, जळाले,
दिव्य अनाहत निनादांत त्या
श्रद्धेसह मनु तन्मय झाले.

• • •

# आनंद

चालत होते हळू हळू
तें एक पथक पथिकांचें,
नद, तटीं गिरिपथावरुनी
घेउन पाथेय स्वत:चें.

सोमलता पांघरलेला
धर्म प्रतिनिधी वृषभ धवल,
घांट किणकिणत तालबद्ध
ऐटित धरी मंथर चाल.

वाम करीं नव वृष–रज्जू
दुजा करीं त्रिशूल घेउन,
मानव होता येत सवें
जणु कांतीच निघाला लेवुन.

सिंहशावकासम अभिनव
सुडौल होते अंग अंग,
यौवना ये गंभीरता
भाव उधळती नवल रंग.

वृषामागुन इडा चाले
कांहींच ना हुंकारतां,
अरुणवसना संध्याच जणुं
मौन सर्व सुर हरवतां.

उल्हास उसळतो तरुणांचा
मृदु किलकिल तशी शिशूंची,
महिलांची मंगल गाणीं
रिझवितीं मनें पथिकांची.

वनगाईपृष्ठीं ओझीं
वाटचाल खेळतमेळत
कांही शिशु धेनूपाठीं
बसले, तरी होते चकित.

माता सांवरीत त्यांना
सुख वार्तालाप करोनी,
'कुठे चाललो आपण' तें
सांगत होत्या समजवुनी.

एक म्हणत होता–" आई !
तू कधीची हेंच सांगते
आलीच बघा ती जागा
जेथ मी तुम्हाला नेते.

परि वाट न सरते अजुनी
विश्रामाचें नसे नाम,
तें तीर्थ असे तरि कोठे,
ज्यास्तव्रें प्रवास अविराम ? "

" ते पुढचे पठार बघ ना
जियें देवदारांचे वन,
घन घेती भरूनी प्याला
घेउनी जयाचे हिमकण.

हा उतार आपण जेव्हां
सहजच जाऊं उतरोनी,
मग समोरीच अपुल्याला
येईल तीर्थ तें दिसुनी. "

तो इडे समीप जाउनी
विनवितो तिला थांबाया,
पोरच तो, उत्सुक होता
आणिक कांहीं ऐकाया.

ती निज अनिमिष नयनांनीं
पादाग्र निहाळित होती,
जणुं पथदर्शिका बनोनी
हळू हळू चालत होती.

वदली, " जात असूं आपण
तो या जगताचा पावन
साधना–प्रदेश, कुणाचें
शीतल अति शांत तपोवन. "

" कैसे ? कां शांत तपोवन ?
नीट कां नाहींस सांगत ? "
बालक विचारी इडेला
ती सांगे लव संकोचत––

" एकें दिनीं कुणी मनस्वी
त्या स्थळीं पातला होता.
म्हणे जगाच्या ज्वाळांनी
तो अति पोळला होता.

होरपळ तयाची भीषण
पसरली गिरी प्रांतांत,
त्या वणव्याच्या ज्वाळांनीं
झालें हें कानन अशांत.

मग त्याची अर्धांगिनि ती
धुंडीत पातली तयास,
पाहुनी अवस्था त्याची
नयनीं करुणेचा पावस.

तीं आसवेंच झाली मग
वरदान करित जग–मंगल,
निमाले सारे ताप, वन
जाहलें हरित सुख–शीतल.

गिरी निर्झर पुन्हा खळाळुन
फुलविती वनश्री हिरवी,
शुष्क तरू येती बहरुन
लाल लाल फुटे पालवी.

तें युगुल तेथें बसोनी
संसृतिची सेवा करितें,
संतोष समाधानानें
सकल दुःख तापा हरितें.

तिथें महान्हद अति निर्मल
जे मनिची तृषा भागवी,
मानस म्हणती म्हणुन तया
तिथें जाइ तो सुख मिळवी."

" मग या वृषास कां उगाच
करिं धरून असें चालविसी,
कां न बैसशी याच्यावर
कां उगाच देह शिणविशी ? "

" सारस्वत नगर निवासी
आपण आलों यात्रेला,
हा व्यर्थ रिता जीवनघट
पीयूष जलें भरण्याला.

असे वृषभ धर्मप्रतिनिधी
यास देऊं तेथे सोडुन,
चिरमुक्त असो हा निर्भय
स्वच्छंद सदा सुख पावुन."

आवरले सकल प्रवासी
होता पुढे उतार फार,
समतल घाटामधून त्या
वनसंपदा हिरवीगार.

श्रम, ताप, आणि वाटशीण
क्षणार्धात झाले प्रसार,
समोर विराट धवलगिरी
विलसे निज तेजें अपार.

पायथा मनोहर त्याचा
श्यामल तृणराजी लहरे,
नव कुंज गुहाघर सुंदर
त्या सरोवरानें बहरे,

काननीं मंजरी नाना
हिरवी, पिवळी, रांगोळी,
ऋतुकालोद्भव सुमनांनी
झाकियल्या लता डहाळी.

पाहती प्रवासी थांबुन
तें अनुपम मानसरोवर,
मृग विहगा अतिसुखदायी
छोटेसें विश्व मनोहर.

जणु पाचूच्या कोंदणात
बसविले हिऱ्याचें पाणी,
लघु आरसा निसर्गाचा
वा निद्रित राका राणी.

दिनकर दडे नगामागे
शशिबिंब चढे गगनांत,
अज्ञात आस धरूनी स्थिर
कैलास संधिप्रकाशांत.

वल्कलवसना संध्या ती
सराजवळ आली होती,
कदंब रसना लेवुन जणुं
तारे माळुन घाली होती.

विहगवृंद करिती किलबिल
हंसाचा चाले कलरव,
किन्नरींचा स्वर निनादे
नभीं घुमते तान अभिनव.

मनू बैसले ध्यानमग्न
त्या मानसतीरीं निर्मळ,
सुमनांची ओंजळ भरुनी
श्रद्धा उभी होती जवळ.

श्रद्धेनें फुलें उधळतां
शत शत मधुपांचें गुंजन
व्यापितें मनोरम गगना
मनु तन्मय, परी बेचैन.

मग सोमवाही वृषभही
मंजुळ घंटानाद करित
निघाला इडेच्या संगें
मानवही निघे घाईत.

होय, चुकली होती इडा
परि क्षमा न चाहत होती,
तें दृश्य डोळे भरोनी
पाहण्यास आतुर होती.

प्रकृति मीलनें पुलकित
तो चेतन पुरुष पुरातन,
निज शक्ति–तरंगीं उसळे
हर्ष–सागरीं उद्वेलन.

श्रद्धेच्या मांडीवरती
बैसे मानव जावोनी,
ठेविते इडा चरणांवर
माथा पुलकित होवोनी.

गहिंवरुनी वदे, " मम भाग्य
मी आल्यें येथे चुकुनी,
हे देवी ! तुझीच ममता
आणी मज इथें खेंचुनी.

भगवती ! अतां कळलें ग
खरेंच मी होत्यें अजाण,
सकला मी विसरत होत्यें
हा एकच मला अभिमान.

बनवोनी एक परिवार
योवेसी आम्ही आलों,
ऐकुन हें दिव्य तपोवन
अघ वारिल म्हणुनी धालों."

मनु किंचित मंद हंसोनी
कैलास तिला दाखविती,
वदती, " येथें कोणीही
परका न कुणाला गणती.

मी न अन्य, स्वजन ना कुणी
सकल असु अपुले आपण.
तुम्ही सर्व अवयव माझे
यांत तरतम भेद मुळी न.

शापबद्ध ना कुणी इथें
तापदग्धही नसे कुणी,
जीवनधरा समतल येथें
सारे असती समरसुनी.

चैतन्य–सागरी जीवन हें
लहरींसमान विखुरित,
व्यक्तित्व छाप घेउन लव
उभे आकार निज निर्मित.

या ज्योत्स्नेच्या सागरात
बुडबुड्यांसम रूप धरोनी,
नक्षत्रें दिसतीं येथें
अपुली आभा चमकवुनी,

तैसा अभेद सागरात
प्राणांचा सृष्टिक्रम हा,
सर्वात मिसळुनी रसमय
राहतो भाव असीम हा.

निज सुखदु:खांनी पुलकित
हे विश्व मूर्त सचराचर
चितिचें विराट तन मंगल
हें सत्य सतत चिर सुंदर

सेवा न कधीही परकी
ती निज सुखसृष्टी आहे,
अपुल्याच अणुरेणूत
द्वैत हीच विस्मृति आहे.

मम जाणीव मीपणाची
सर्वस्पर्शी झालेली,
सर्व भिन्न परिस्थितींची
मदिर घोट ती प्यालेली.

निशा–नेत्रपुटीं सुषुप्ती
उषा–नयनांत घ्या जागुन,
दिसावीत सुंदर स्वप्नें
गुंता झाल्या अलकातुन.

चेतनाचा साक्ष मानव
निर्विकार व्हावा हंसुनी,
खोल खाली रुतत जावा
मानसाच्या मधुमीलनीं ?

विसरून सकल भेदभाव
सुखदु:खाच्या अभिव्यक्तीत
मानवा वद ! ' हा मी असा '
विश्व पाही घरकुल होत."

श्रद्धेच्या मधु अधरींच्या
सान छानशा त्या रेखा
रागारुण किरणकलांसम
उमलल्या बनुन स्मितलेखा

ती कामायनी जगाची
मंगल कामना एकली
दीप्तिमान होती प्रमुदित
मानस–तटिची वनवेली.

ती विश्वचेतना पुलकित
प्रतिमात्र पूर्ण कामाची,
जणु अथांग महाऱ्हदात
विपुलता निर्मळ जलाची.

ज्या मुरलीच्या नादानें
हें शून्य होतें रागमय,
ती कामायनी विहसते
चराचर होतसे तन्मय.

क्षणात होती परिवर्तित
अणु अणू विश्वकमळाचे,
हिंदळती पिंगट पराग
आनंद–सुधा–हर्षाचे.

अति मधुर वाहतो वारा
गंध तुषारुनी थेंबात,
केसरा स्पर्शुनी आला
रज झाले सुखकर रंजित.

जणु तो मादक मुकुलांचा
मादक विकास करोनिया
आला अस्पृष्ट अधरांचीं
किती चुंबनें घेउनिया.

थिरकतो, थांबतो मुरकत
जणुं कांही असे विसरला,
नव कनक–कुसुम–रज धूसर
मकरंद जलदासम फुलला.

वनलक्ष्मीनें जणु शिंपिले
सडे पराग केसराचे,
वा हेमकूट हिमजलात
प्रतिबिंब पाही स्वतःचे.

संसृतिच्या मधु मिलनाचे
उच्छ्वास एका सुरात,
नील नभांगणीं निघाले
नवी मंगल गाणी गात

वल्लरी नर्तनीं रमल्या
पसरल्या लहरी सुगंधी,
मुरलीच्या रंध्रामधुनी
सर्वांवर चढली धुंदी.

मदमस्त होउनी मधुकर
नुपुरांसम गुंजन करिती,
झंकार वाणि–वीणेचे
शून्यास भरून झिरपती.

उन्मादक वसंत वारा
वाहतो, थांबतो मधुनी,
परिमळात न्हातो पिकरव
अन् धरा सुमन–वृष्टींनी.

रेशमी वसन झुळझुळते
विश्वसुंदरीच्या तनुवर,
वा मादक गोड शिरशिरी
येते संपूर्ण धरेवर.

सुख सहचर दुःख विदूषक
करुनिया विनोदी अभिनय,
विस्मृतीपटाच्या मागे
दडला होता जणु निर्भय.

शाखाशाखांवर मधुमय
मृदु मुकुलांची जणुं झालर,
रसगंधांनी प्रफुल्ल सुम
हळूहळू बरसती भूवर.

हिमखंड रश्मियुत होउन
मणि–दीप प्रकाश पसरवी,
आदळून समीर तयांवर
अति मधुर मृदुंग वाजवी.

संगीत निनादे मनहर
मुरली वाजे जीवांनिची,
संकेत कामना बनुनी
दाखवी दिशा मिलनाची.

रश्मी जणुं होत अप्सरा
नाचतात अंतरिक्षात,
गंधाचा कणकण वेचुन
नवल रंगमंच रचतात.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/२६५
१
मंत्रालय.

जणुं मांसल झाली होती
हिमवती प्रकृति पाषाणी,
त्या रसावर्तनीं विव्हळ
होती हांसत कल्याणी.

तो चंद्रकिरीट हिमालय
स्पंदितसा पुरुष पुरातन,
मानसीं लहर–गौरीचें
पाहतो सुकोमल नर्तन.

पारणें फिटे नयनांचें
त्या विमल प्रेम ज्योतीतें,
सकलांची ओळख पटते
आपुल्याच कलाकलानें.

जड चेतन सारा समरस
सुंदर साकार जाहला,
चैतन्य एकची विलसे
आनंद अखंड दाटला.

● ● ●

शामुको–वाय ३३–१११५ पु.–७.८५